
# दिवेलागणीची वेळ

ना. धों. महानोर





# दिवेलागणीची वेळ

ना. धों. महानोर

दिलीपराज प्रकाशन प्रा. लि.®
२५१ क, शनिवार पेठ, पुणे-४११०३०.

# दिवेलागणीची वेल

Divelaganichee Vel

**प्रकाशक :**
राजीव दत्तात्रय बर्वे, मॅनेजिंग डायरेक्टर,
दिलीपराज प्रकाशन प्रा. लि.
२५१ क, शनिवार पेठ, पुणे - ४११०३०.
( २४४९५३१४, २४४८३९९५,२४४७१७२३
(सर्व फॅक्ससहित)

**© लेखक : ना. धो. महानोर**
मु. पो. पळसखेड, पो. फर्दापूर, अजिंठ्याजवळ,
ता. सोयगाव, जि. औरंगाबाद

**प्रकाशन दिनांक** : १६ सप्टेंबर २०१८

**प्रकाशन क्रमांक** : २४१२

**ISBN :** 978-93-84171-55-1

**मुद्रक :**
मधुराज प्रिंटर्स प्रा. लि.
स. नं. २९/८-९, पारी कंपनीजवळ,
धायरी, पुणे-४११ ०४१.

**टाइपसेटिंग :**
सौ. मधुमिता राजीव बर्वे,
पितृछाया मुद्रणालय, ९०९, रविवार पेठ,
पुणे - ४११००२.

**मुद्रितशोधन** : निलिमा साने

**मुखपृष्ठ** : संतोष घोंगडे

**मूल्य** :₹ एकशे साठ रुपये मात्र.





गोविंदबागेतल्या घरात व शेतीत रममाण होऊनही
मानवी ऊब आणि ओलावा जपणाऱ्या
**श्रीमती प्रतिभा शरद्‌चंद्र पवार**
यांना...



# ऋणनिर्देश

श्रीमती विजया पाटील
डॉ. संजय वोरा
श्रीमती नयना पाटकर
श्री. अनिल पाटकर
आयुष्यातील कठीण आणि नाजूक काळात
तुम्ही जगण्यासाठी बळ दिलेत..





# माझे दोन शब्द

साहित्य, कविता, कला यांच्याइतकंच प्रेम मला शेती, पाणी व खेडी यांसंबंधी आहे. कविता-लेखन व साहित्यनिर्मितीइतकंच मला नवं पीक, पाण्याचा शोध, लदबदलेली फळझाडं, झाडं यासाठी नवं काही शोधून नवनिर्मिती करण्यात आनंद आहे. कधी कवितेतून खूप प्रसन्नता मिळते, कधी सुंदर उभ्या राहिलेल्या शेतमळ्यातून. दुःख संपत नाहीच, पण हलकं तरी होतं. शेतीच्या अशा या कष्टकरी जगण्यात मला मजा वाटते. शेतीत प्रत्यक्ष केलेल्या पिकांचे व पडझडीचे अनुभव ‘शेतीसाठी पाणी’ या माझ्या पुस्तकात एकत्र केलेले आहेत. हे पुस्तक शेतकऱ्यांमध्ये अतिशय प्रिय आहे. तसंच ‘सीताफळ बागेची गोष्ट’ हे पुस्तकसुद्धा. ‘शेतीसाठी पाणी’ची इंग्रजी, हिंदी भाषांतरं होत आहेत. त्याशिवाय ‘शेतकरी दिंडी’ असं लहानसं पुस्तक आहे. ६ डिसेंबर १९८० रोजी जळगाव ते नागपूर पायी काढलेल्या ‘शेतकरी दिंडी’चा वृत्तांत थोड्या थोड्या टिपणांमधून दररोज ‘महाराष्ट्र टाइम्स’मधून येत असायचा.
पंचाऐंशी टक्के कोरडवाहू शेतीचे प्रश्न व दुष्काळ, खेडी दुबळी होत असताना झड होणारी माणसं, पिण्याचं पाणी, आठमाही शेतीसाठी पाणी याचं भयानक चक्र राज्याला चक्रावून टाकत आहे. शासनाच्या चांगल्या योजनांना मंद गती व

भ्रष्टाचारानं गिळंकृत केलं जात आहे. म्हणून आता ठोसपणानं या प्रश्नांची संपूर्ण पुनर्बांधणी व दीर्घकालीन नियोजन आवश्यक आहे. नाहीतर माणसं सरळ सरळ अंगावर येतील, खायला उठतील. आत्महत्या कोणी फार सुखासुखी करतो का? हजारो माणसं त्या भयावह काळोख्या रस्त्यावर मी पाहतो आहे.

आज धडाक्यानं मोठ्या प्रमाणावर राजकीय बदल झालाय, तो शेतीकडे व सामान्यांकडे दुर्लक्ष करण्याच्या धोरणामुळे. नव्या शासनानं हे ओळखून 'शेती' केंद्र करून बोलायला सुरुवात केलेली आहे. पंतप्रधान व महत्त्वाचे मंत्री 'शेती'चा नवा आराखडा तयार करताहेत. हे लवकर व कालबद्ध नियोजनानं व्हावं एवढीच इच्छा आहे. खेड्यांमधल्या काळोख्या दुनियेत ही नवी दिवेलागणीची वेळ आहे, असं आम्ही मानतो. बळिवंत शेतकरी, लहान लहान शेतकरी आता खूप कष्ट करून नव्या तंत्रशास्त्रानं शेती करतोय. त्यासाठी शासनाची त्याला आणखी साथ हवी. दहा वर्षांत संपूर्ण धरणयोजना व जलसंधारण व्हावं. शासन कुणाचंही येत राहील, त्यात खंड नको, बदल नको. एवढंच.

मी शेतीशास्त्राचा पदवीधर नाही, तसा फार जाणकारही नाही. शेती करतानाचे प्रत्यक्ष अनुभव कधी लिहितो, बोलतो. शेतीसंबंधी छान मनमोकळ्या गप्पा मारणं, लिहिणं माझा आवडीचा छंद आहे. गेल्या वर्षभरातल्या त्या त्या वेळच्या काही प्रश्नांवर, घटनांवर, व्यक्तींवर मी बोलत असताना हे लिहून द्यावं म्हणून मित्रांनी आग्रह धरला. माझे मित्र विजय बाविस्कर यांनी 'लोकमत'मधून व माझे दुसरे मित्र अनंत दीक्षित यांनी 'सकाळ'मधून हे माझे शेतीवरले ललित लेख प्रकाशित केले. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. 'दिवेलागण' या नावानं हे लेख पुस्तकरूपानं येत आहेत. त्यात दोन वर्षांपूर्वी नागपूरला संपन्न झालेल्या 'पहिल्या अखिल भारतीय जलसाहित्य संमेलनाचं' माझं अध्यक्षीय भाषण घेतलेलं आहे. नकार देऊनही कोणीही ऐकेना, तेव्हा हे अध्यक्षपद मी स्वीकारलं होतं. प्रत्येक राज्यातून, देशभरातून जाणते अभ्यासक तज्ज्ञ आलेले होते, साहित्यिकसुद्धा. तिथलं माझं अध्यक्षीय भाषण अनेकांना पाहिजे होतं. या लहानशा पुस्तकाला ते जोडलं. माझं भाषण गाजलं ते उत्स्फूर्त सहज बोलण्यानं. या लिखित भाषणाच्या तिप्पट तरी ते होतं. आज आठवत नाही. श्री. माधवराव चितळे, श्रीमती अरुणा सबाणे व त्यांची संस्था, देशभरातल्या पाणी प्रश्नाच्या अनेक जाणकारांनी हे संमेलन यशस्वी केलं. श्री. दि. मा. मोरे, श्री. मोरवंचीकर यासारखे शंभरपेक्षा अधिक जाणकार दोन दिवसांच्या चर्चेत प्रत्यक्ष सहभागी होते. त्यासोबत साहित्यिकही सहभागी होते, चर्चासत्रात होते. श्री. राम शेवाळकर, श्री. सुरेश द्वादशीवार, श्री. भास्कर लक्ष्मण भोळे, सौ. विजया भोळे, श्री. द. भि. कुलकर्णी, श्री. अक्षयकुमार काळे, श्री. गिरीश गांधी, श्रीमती आशा सावदेकर,

श्रीमती सीमा साखरे, श्री. वसंत वाहोकार असे शंभरापेक्षा अधिक साहित्यिक होते. प्रमुख पत्रकार, संपादक व कृषी संस्थांचा सहभाग होता. आदिवासी जीवनातून अनुभवसंपन्न लोकगीत घेऊन आलेले रामटेक-भंडारा इथले अडाणी; पण तलाव पाटबंधारे स्थापत्य शास्त्रातले निपुण विशारद होते. अशी सर्व क्षेत्रातली छान सरमिसळ आज हवी. 'अभी भी तालाब खरे है', 'डार्इंग विजडम' ते श्री. माधवराव चितळे साहेबांच्या अध्यक्षतेखाली पाच वर्षे केलेल्या 'पाणी आयोगाच्या' पुस्तकांवरही ससंदर्भ व मूलभूत चर्चा झाली. पहिल्या
अखिल भारतीय जलसाहित्य संमेलनाचं अध्यक्षपद मला देणाऱ्यांचे व हे शेतीचे ललित लेख वृत्तपत्रांतून प्रसिद्ध करणाऱ्या मित्रांचे (ज्यांचे निर्देश वर केलेले आहेत) खूप खूप आभार. माझी मरगळ घालवून मला नवी दृष्टी व शक्ती ही माणसं, संमेलनं देतात.

प्रार्थना दयाघना कवितासंग्रहातील एका प्रदीर्घ कवितेतला शेवटचा एकचतुर्थांश भाग पुस्तकात शेवटी जोडलेला आहे. श्री. शरद्चंद्र पवार यांचा माझा पहिला परिचय व स्नेह कविता व साहित्यामुळे झालेला आहे; परंतु स्नेह व जवळीक अधिक वाढली ती शेतीच्या समान आकर्षणामुळे. गेल्या कित्येक वर्षांत हा स्नेहभाव- जवळपास तीस वर्षे - आम्ही एकमेकांनी जपला. त्यात आणखी जिव्हाळा व निर्मळ प्रेम वाढविलं ते श्रीमती प्रतिभा वहिनींनी. आम्हा सगळ्यांना त्यांच्या कुटुंबातलंच करून टाकलं. सगळ्या आनंदाच्या क्षणांच्या व दु:खाच्या त्या वाटेकरी आहेत. विशेषत: अडचणीच्या, दु:खाच्या अतीव संवेदन क्षणी दोहोंनी मोठा आधार दिला. असा आधार आज स्वच्छपणानं क्वचितच कुठे मिळतो. श्री. शरद्चंद्र पवार यांचा जसा शेतीनिर्मितीचा आनंद आहे, तेवढाच आनंद आज चार-पाच वर्षांत उभारणी केलेल्या बारामतीच्या गोविंद बागेल्या शेतीत व घरात श्रीमती प्रतिभा वहिनींना आहे. त्यात त्या खूपच रममाण झाल्या, त्या ठिकाणी त्या खूपच प्रसन्न आहेत. त्या तिथल्या शेतीचं पाहतात आणि अनेक प्रश्नही विचारतात. हे शेतीवरलं नवं पुस्तक श्रीमती प्रतिभा वहिनींना अर्पण करताना खूप आनंद वाटतो.

माझे मित्र श्री. बाबा भांड हे नेहमीच माझी शेतीवरची पुस्तकं प्रकाशित करतात. चांगल्या लेखकांची शेतीची पन्नासपेक्षा अधिक पुस्तकं त्यांनी प्रकाशित केली, याचा मला विशेष आनंद वाटतो. त्यांचे आभार.

ना. धों. महानोर
पळसखेड

# सामग्री


ऋणनिर्देश

माझे दोन शब्द

१. पाणी पाणी पाणी

२. हो घराघरातून देव आता ग्रंथांचे

३. कशी गं गर्द झाली सोन्याची आंबराई

४. पंख इवलाले देवा, आम्ही बांधू देश नवा

५. थेंब थेंब पाण्याचे, वृक्ष अमृताचे

६. सुन्या माळरानी दिवे लावू या गा

७. त्या अनाथांच्या उशाला दीप लावू झोपताना

८. तो पुन्हा ऋतुगंध देऊ या भुईला

९. मी मरवठ भरला लाल मातिचा भाळी

१०. चिरगुटे बांधून न ये गर्भारपण

११. रहिमन पानी राखिये, बिन पानी सब सून

१२. गंगा वाहू दे निर्मळ

१३. हवा स्तनातला पान्हा

१४. बंडी झाली उलटी पालटी, तरी पेरतो पऱ्हाटी


१५. वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे...

१६. असो नसो पाणी, आम्ही कापसाचे धनी

१७. झाडातुन लदबदले बहर कांचनाचे

१८. रानातली झाडे मला फुले अंथरून
१९. इथे तणकट स्वार्थाचे ज्याचे गल्लोगल्ली फासे
२०. केळीचे असुनी बाग, आम्हा ना वाली
२१. आज गोकुळात रंग खेळतो हरी
२२. दिवे दूरात तेजाचे, उरी आनंदले लोट
२३. गुलाबाची शेती, स्वर्ग इथेच नांदती
२४. सुंदरतेच्या सुमनावरले, दव चुंबुन प्यावे
२५. या मातीचे पांग फेडण्या उन्नत हा माथा
२६. हा दीपोत्सव पाण्याचा, जागरणाचा
२७. एका बीजापोटी, तरु कोटी कोटी
२८. या खानदेशच्या मातीमधली सुवर्णकांचन लेणी
२९. हातात गुंफिले हात नदीच्या काठी
३०. या तरुणाईचे हात हवे झाडांना
३१. नवी लवलव कोंभांची, नवी पालवी झाडांना
३२. हे डोंगर होतिल नवी अजिंठा लेणी
३३. प्रार्थना, दयाघना

# दिवेलागणीची



# वेळ

# १. पाणी पाणी पाणी

मित्रहो,

'पाणी' हा लहानसा शब्द; परंतु अवघं विश्व व्यापून टाकणारा शब्द आहे. जगातल्या प्रत्येक जीवन घटकाशी बांधून असलेला 'पाणी' हा शब्द. त्यासाठी 'माहेर सामाजिक व शैक्षणिक संस्थेनं', 'आकांक्षा'च्या संपादिका श्रीमती अरुणा सबाने यांनी व 'महिला मंच' यांनी मिळून घेतलेलं हे पहिलं महत्त्वपूर्ण साहित्य संमेलन. सबंध महाराष्ट्राला पाण्याच्या प्रश्नांमधलं, साहित्यामधलं पुष्कळ काही नवं देऊन जाईल. चालना मिळेल. अशा प्रत्यक्ष काळजाला हात घालणाऱ्या, पाण्यासंबंधी घेतलेल्या या संमेलनाचं अध्यक्षपद मला दिलं, यासाठी मी संस्थेचे खूप खूप आभार मानतो. रहिमन पानी राखिये, बिन पानी सब सून । पानी गये न उबरै मोती मानुस चून । असा रहीमचा दोहा आहे. मोत्याचं, माणसाचं, चुन्याचं पाणी उतरलं की, ते पुन्हा पहिल्यासारखं उभं राहू शकत नाही. पाण्याच्या संबंधी भारतीय साहित्यात कितीतरी कविता, कथा, कादंबरी असं विपुल साहित्य असणार. ते माझ्या फार वाचनात नाही. संस्कृत, हिंदी साहित्यातलंही थोडं वाचलेलं आहे. इथे थोडंबहुत मराठीचं तेवढं सांगायचा विचार आहे. कालिदासाच्या 'मेघदूता'ला भरलेलं पाणी घेऊन जाणारा आषाढातला मेघ लिहितं करतो व अद्वितीय असं दीर्घकाव्य लिहून होतं. मराठीमध्ये गद्यापेक्षा पद्यलेखनात, कवितेत पाणी याविषयी बरंच काही लिहून झालेलं आहे. ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, सावता, चोखा यांच्या कवितांमधून तर 'पाणी' अडविण्यापासून, तर तलाव बांधून पाण्याला जिवंत कसं ठेवता येईल, असं लेखन आहे. 'दुष्काळ व पाणी' असे शब्द आता व पूर्वापार एकत्रच झालेले आहेत. १६३० च्या प्रचंड अशा दुष्काळाचं दीर्घ असं वर्णन कवी रामदासांनी आपल्या काव्यात केलेलं आहे. ते वाचताना आजही भयावह वाटतं.

"शेत पिकेना, पिकेना, पिकेना उदंड । कष्ट करूनी करूनी शेत आहे भंड।

अवघे जाहले जाहले जाहले थोतांड । दुनिया पाहता पाहता जाहली उदंड ।"

शिवाजी महाराजांच्या त्याच काळात भीषण पाणी टंचाईनं महाराष्ट्राची व सगळ्याच संसाराची, शेतीबाडीची कशी वाताहत झाली, याचं हृदय कुरतडणारं चित्र

तुकारामांच्या अनेक अभंगांमधून आहे. उदाहरणार्थ :

"दुष्काळे आटले द्रव्य, गेला मान । स्त्री एकी अन्न अन्न करता मेली ।
लज्जा वाटे जीवा यासाठी या दु:खे । वेवसाय देखे तुटी आली ।"
"नगरेची रचावी । जलाशये निर्मावी । महावने लावावी । नानाविधे ।"
असं संत कवी ज्ञानेश्वरांनी सातशे वर्षांपूर्वी लिहून ठेवलेलं आहे.

महात्मा जोतिबा फुले यांचं शेती, पर्यावरण, पाणी, पाणलोट, दुष्काळ यासंबंधीचं लेखन त्यांच्या समग्र ग्रंथात आहे. त्यांच्या बरोबरीच्या काळातल्या अनेक मासिकांमधून व नंतर पुस्तकरूपानं ते ग्रंथांमधून आलेलं आहे. त्याचवेळच्या कवी दत्त यांच्या 'बा, नीज गडे'सारख्या कवितेत पाणी व दुष्काळानं ग्रासलेल्या संसाराचं तीव्र असं वर्णन आहे.

रवि गेला रे सोडून आकाशाला, गणगोत जसे आपणाला ।
खडबड हे उंदिर करिती । कण शोधाया ते बघती । परि अंती निराश होती ।

गिरीश, यशवंत, ग. ल. ठोकळ, ग. ह. पाटील यांचं प्रत्यक्ष शेतकरी जीवनातलं दु:खाचं, त्याच्या मीठ-भाकरीचं व बहरण्याचंही लेखन आहे. कथा कादंबऱ्यांमधून खेडं, त्याची अवकळा व पाण्याशिवायचा नापीकपणा र. वा. दिघे यांच्या सराई, आई आहे शेतात, पाणकळा या कादंबऱ्यांमधून फार ताकदीनं पहिल्यांदा आला. लोकजीवनातल्या लोकगीतांच्या स्त्रियांच्या ओठी, शेतकऱ्यांच्या ओठी कविता, गीत व गद्यलेखनाचा काव्यात्म आलेख अशी सिरमिसळ करून र. वा. दिघे यांनी समृद्ध असं लेखन केलेलं आहे.

"पड रे पान्या, पड रे पान्या । कर पाणी पाणी
शेत माझं लै तान्हेलं चातकावाणी ।"

"निढळावरती हात ठेवुनी वाट किती पाहू ?
खिंडीतोंडी हृदवाद्या तू नको उभा राहू ।"

"आधी रोटी बगल में, पाणी आया जंगल में."

- अनेक लोकगीतं शिवारभर - अनेक कविता ओठांवर - तो काळ
"या नभाने या भुईला दान द्यावे"
"पक्ष्यांचे लक्ष असे गगनाला पंख नको"

शंकर पाटलांच्या टारफुलापेक्षाही कित्येक वर्षांत बरा हंगाम आला, पीक खळ्यात आलं, घरात यायच्या आधी अशी वावटळ- कभिन्न पाऊस आला, त्यानं सगळं काही मातीमोल झालं. असा नेस्तनाबूत करणारा, नागवणारा पाऊस. खेड्यातल्या दीर्घकालीन सुख-दु:खाच्या जीवनात गीत, कहाणी, गोष्टी कितीतरी अस्सल असं हे साहित्य थेट पाण्याशी, शेतीबाडीशी बांधलेलं आहे. लहानपणापासून.

"ये रे ये रे पावसा, तुला देतो पैसा,
पैसा झाला खोटा, पाऊस आला मोठा"
"ये गं ये गं सरी, माझे मडके भरी,
सर आली धावून, मडके गेले वाहून"

या सार्वत्रिक ओठांवर असलेल्या गीतांमधूनच आम्ही वाढलो, मोठे झालो आणि शेतकरी म्हणून दोन नक्षत्रातही पाणी नाही म्हणून नाचगाणं करून भीमदेवाला प्रार्थना करून

"धोंडी धोंडी पाणी दे, साय माय पिकू दे ।
दगडाचा देव पाणी मोठा येव"

देवळाभवती व गावभर स्त्री-पुरुषांच्या प्रार्थनेच्या या कविताच होत्या आणि आहेत. यासारखीच गीतरचना जास्त करून आदिवासी जीवनात महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, पंजाबात खूप आहे. अलिखित जिवंत असं साहित्य आहे. एका बाजूला दुष्काळाची करुणार्त गीतं साहित्यात आहेत, तशी आनंदघन अशीही आहेत. बिहारमधल्या महापुराचं थैमान, उद्ध्वस्त झालेलं जीवन, त्यातल्या यातना 'ऋणजल धनजल' सारख्या फणीश्वरनाथ रेणू सारख्यांच्या साहित्य कृतीतून, लेखनातून वाचताना आपण अस्वस्थ होतो. त्यासारख्याच लेखनाची एक प्रेरणा निर्माण होते. हे असं लिहिलंच पाहिजे. अगदी आजच्या काळातलं लक्ष्मीकांत देशमुख यांचा केवळ पाण्याच्या संबंधीचा कथासंग्रह, तहान ही सदानंद देशमुख यांची कादंबरी, दुष्काळदेशी असं अमर हबीब या पत्रकाराचं लेखन मराठीतूनही भेटू लागलंय असं मला वाटतं. दत्ता देशमुखांचं दुष्काळ व पाणी, अप्पासाहेब पवारांचं पाणी असं सगळं नव्या मांडणीतून आलेलं ललित लेखन, गद्य लेखन, वैचारिक लेखन हे 'पाणी' या शब्दाला, त्याच्या वलयाला केंद्र करून लिहिलेलं आहे. वेगळं असं आहे. यशवंत मनोहर यांना त्यांचा पिळवटणारा अनुभव मांडताना 'पाऊस' प्रतिमाच महत्त्वाची वाटते, म्हणून कालचा 'पाऊस' आमच्या गावात झालाच नाही, असं ते लिहितात. त्याचवेळी

"हा श्रावण गळतो दूर, नदीला पूर तरुवर पक्षी
घन ओले, त्यातून चंद्रदिव्यांची नक्षी",
असं ग्रेस लिहून जातात.
"ये रे घना ये रे घना, न्हाऊ घाल माझ्या मना ।"
असं आरती प्रभूंना लिहावं वाटतं.
"जलधारात तारा छेडीत आला श्रावण छंदीफंदी,
त्याची चढते गीत धुंदी"
असं लिहिणारे ना. घ. देशपांडे.

यांसारख्या कवींच्या अनेक पावसाच्या ओळी आठवतात व इंदिरा संतांपासून शहर-खेडी सगळ्यांना पाऊस लपेटून राहतो.

"नको नको रे पावसा... असा घिंगाणा घालू ।
घर माझे कौलारू । नको नको पावसा ।"

अशी सुंदर कविता ओठांवरून भिरंगत राहते. माझा तर कवितासंग्रहच 'पावसाळी' कवितांचा आहे व पन्नास-साठ तरी कविता पाऊस पाण्याला बिलगून आहेत.

"हे छळकऱ्यांनो,
पाण्यासारखं सुंदर कर्तव्य दुसरं कुठलंच नसतं
पाणीटंचाई आली तर तुम्ही शर्टासारखी शहरं बदलता
मग सांगा पाण्यावाचून तडफडून मरणाऱ्यांनी काय बदलावं ?"

नामदेव ढसाळ यांची ही कविता आहे दलितांच्या दु:खाची व्याकुळता सांगणारी. तुळशी परब यांची एक मोठी कविता यासारखीच; पण वेगळी आहे. तिची सुरुवात अशी-

"पाणी : निळेभोर, काळे सावळे, दाटत जाणारे;
डोळ्यातल्या पाण्यासारखे, बंदिस्त, वाहते
ज्यातून हाकाच हाका ऐकू येतात
जुन्या नि घुसमटल्यासारख्या
पाण्याच्या पातळ्याच पातळ्या दिसतात."

चंद्रकांत पाटील यांच्या 'पाण्यावरल्या नोंदी' अशाच खूप काही नवं देऊन जाणाऱ्या जाणिवांच्या नव्या अनोख्या अनुभवांच्या. एक दीर्घ कविता. अशी -

''जन्मापासूनच जन्माची सोबत करतं पाणी
जगण्याच्या काठावर अखेरचं आचमन असतं पाणीच''

भुजंग मेश्राम यांच्या 'उल्गुलान' या कविता संग्रहात पाण्याच्या संबंधात खूप कविता आहेत. 'नर्मदेशी बातचीत' अशी एक चांगली कविता आहे. मेश्राम यांच्या पाऊस या कवितेची सुरुवात अशी -

''लोक म्हणाले, ''भीमा हे गंगाळ फोड रे,
फार वाट पाहिली पावसाची,
ना आभाळ भरलं ना गडगड,
लवनाच्या खोकडात तेव्हा बांधला भीमदेव,
ढोल वाजवत नाचत गेलो, नाचत गेलो... नाचत... नाचत...
पाऊस पाणी, त्याच्या सुखदु:खाची कहाणी''

अशी आणखी मनोरम गाणी मराठी साहित्यातून येत आहेत. पाऊस मराठी साहित्यातून, भारतीय साहित्यातून अनेक ठिकाणी आहेच; परंतु बदलत्या अनेक पदरी अनुभवांनी, प्रश्नांनी शहर-खेडी, शास्त्रज्ञ-चिंतक या सगळ्यांचा होऊन लेखनातून नवी नवता घेऊन येतो आहे. या सगळ्यांची समृद्धता व त्यासंबंधीचं लिहिणं माझ्या सामान्य हातानं व मर्यादित अशा या निमित्तानं संपूर्ण लिहिणं शक्य नाही. तरीही थोडा ऊहापोह माझ्या परीनं केला. यापेक्षाही पाणी या प्रश्नासंबंधी चर्चा इथे त्यातल्या जाणत्या अभ्यासकांकडून, प्रत्यक्ष त्यासाठी काम केलेल्या कार्यकर्त्यांकडून व्हावी, साहित्यिकांकडून व्हावी व मी ती ऐकावी अशी भावना आहे. तरीही अध्यक्ष म्हणून पाण्यासंबंधी जे माझ्या वाचनात आलं, ऐकण्यात आलं, पाहण्यात आलं त्यासंबंधीचा थोडाफार ऊहापोह इथे करून मग आपण पुढे जाणार आहोत.

कित्येक हजार वर्षांपूर्वीची गोष्ट. पृथ्वीवर केवळ पाणी होतं. पाणी होतं, पाण्याशिवाय फार काही नव्हतं. पाणीच पाणी. पाण्यातलं शेवाळ. त्यातून अमिबाचा जन्म. पुढे मनुष्य, माणसातला इथपर्यंतचा उत्क्रांतीतला आलेख. या सगळ्याच पुराण इतिहासाची आवश्यकता नाही. अश्म युगापर्यंत जायची आवश्यकता नाही, तरीही मागे जाताना अमिबाचं स्मरण झालं एवढंच. एवढी मोठी-प्रचंड पृथ्वी. पृथ्वीवरलं बहुतांश पाणी खारं पाणी आहे. पृथ्वीवरलं वापरता येणाऱ्या पाण्याचं प्रमाण फक्त ३ टक्के आहे. त्यातलं पुन्हा चांगलं पाणी, साधं पाणी (बर्फाशिवायचं वगैरे) एक टक्का आहे. भारतात उपलब्ध पाण्यापैकी ८० टक्के पाणी शेती सिंचनासाठी वापरलं जातं.

त्यातलं अर्ध पाणी पिकापर्यंत पोहोचण्याआधीच वाया जातं. आज अपुरं तंत्रज्ञान व सिंचनाच्या जुन्या कालबाह्य पद्धती यानं पाण्याचा घात केला. ओबडधोबड, धसमुसळेपणानं पाणी वापरण्याच्या वेडेपणामुळे पाण्याचा अनाठायी वापर वाढत चालला. तज्ज्ञ म्हणतात त्याप्रमाणे ६५ टक्के तरी पाणी वाया जातं. शेतीसोबतच पुन्हा मग पिण्याच्या पाण्याची परवड होऊन बसते. पाण्याशिवायचा हाहाकार सर्वत्र सुरू होतो. पाण्यासाठी वाद होतात. भांडणं वाढतात. दरी निर्माण होते. उद्या पाण्याच्याच प्रश्नावरून युद्धं होतील, असं काहींचं मत आहे. ते अतिरेकी मत आहे, असं म्हणता येणार नाही, इतकं त्यात तथ्य आहे. वाढती लोकसंख्या, देशाला पेलता येणार नाही एवढी वाढती लोकसंख्या, त्या लोकसंख्येला, माणसा-माणसाला दररोज लागणारं पिण्याचं पाणी, जीवन व्यवहाराला लागणारं पाणी, घरं, भौतिक गरजा, बांधकाम, यंत्रसामग्री, कारखाने अशा रोजच्या दैनंदिन गरजांसाठी किती पाणी लागतं, त्याला अंत नाही. पशुपक्षी, प्राणी, किडा, मुंगी सगळ्यांसाठीच पाणी हवं. सगळ्याच प्राणिमात्राला, माणसाला अन्नधान्य, कापड या सगळ्याच गोष्टींसाठी, शेतीला पाण्याशिवाय चांगलं उत्पादनच नाही. कोरडीची शेती निव्वळ १ टक्काही नफ्याची राहिलेली नाही, अशी परिस्थिती आहे. म्हणून किमान दोन पाण्यासाठीचं धरणाचं, तलावाचं, विहिरीचं पाणी पाहिजे. हे उदरभरण होणार कसे? दक्षिण अमेरिकेचं सरासरी पर्जन्यमान ६३.८४ इंच, भारताचं ४६ इंच, उत्तर अमेरिका ३२.३२ इंच, युरोप ३० इंच, ऑस्ट्रेलिया १८ इंच असं सरासरी वार्षिक पर्जन्यमान आहे, तरीही भारताला आज सगळ्यात मोठा चिंतेचा विषय पाण्याचा, शेतीचा, त्याच्यावर आधारित ७० टक्के ग्रामीण जीवनातल्या जीवन व्यवहाराचा व भारतीय अर्थव्यवस्थेचा आहे. दर दोन-तीन वर्षांनी प्रचंड भेडसावणारे दुष्काळ व आता तर बारा-चौदा राज्यांतील तीव्र दुष्काळ, मोडलेली अर्थव्यवस्था, पर्यावरण व देशाला भेदरवून टाकणारे व त्यानिमित्तानं उभे राहिलेले प्रश्न आहेत. दरवर्षी भेडसावणारे नवे प्रश्न. वाळवंटाच्या दिशेनं निघालेली अनेक राज्ये, पाण्याचा नको तेवढा, नको तसा वापर केल्यानं, जमिनीतलं पाणी राक्षसी वीजपंपांनी, अन्य मार्गांनी उपसा करून भूगर्भातले पाणीसाठे, जे वर्षानुवर्षांनी उभे राहिलेले होते, ते नष्ट करून टाकलेले आहेत. जंगलतोड करून पाणी सरळ समुद्राला जाण्याची मोठी वाट निर्माण करून दिली. माती, झाडं जमिनीतलं सगळं सत्त्व नव्वद टक्के समुद्राच्या दिशेनं वाहून गेलं. १९व्या शतकात पाणीपुरवठ्याची व योजनांची जबाबदारी शासनानं अंगावर घेतली. त्यामुळेही भूजलाचा वापर खूप वाढला. पद्धती बहुतांश चुकीच्या वापरल्यानं समस्या वाढल्या. सगळं सरकारचं म्हणून अंग झटकून लोकांचा त्यात सहभाग राहिला नाही. परंपरागत जुन्या पद्धती बाजूला सारल्या गेल्या. बहुसंख्य ठिकाणी अलीकडे

भ्रष्टाचारानं योजनांना पोखरून टाकलंय. त्याला पाहिजे तसा अटकाव निर्माण होत नाही, अशा अनेकविध गोष्टींनी हा प्रश्न व्यापलेला आहे. म्हणून छाताडावर हादरा देणारा हा पाण्याचा, दुष्काळाचा प्रश्न आता सकलांचा झाला पाहिजे. सगळ्यांनी मिळून पाण्याच्या स्रोताचे वेगवेगळ्या पद्धतींनी रक्षण करून वाढविणे, जिथे सरकारच्या मर्यादा संपतात तिथे समाजाचा भक्कम सहभाग जरुरी आहे. केवळ सरकारकडून आता हे ठिकाणावर येणं, पुन्हा सुजलाम् सुफलाम् करणं शक्य नाही.

भारतातील खेड्यांची लोकसंख्या सरासरी १२०० असून, सरासरी पाऊस ११७ मिलिमीटर आहे. यातले अर्धे पाणी जरी वाचले, तरी वर्षभर पिण्याचं पाणी व आठमाही पिकाचं भरण होईल. 'सेंटर फॉर सायन्स अॅण्ड इन्व्हायर्नमेंट' या (सी.एस.ई.) संस्थेच्या एका सर्वेक्षणात असे दिसून आले की, ज्या गावांनी जलसंचय, पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम राबविले त्यांना दुष्काळातही पिण्याचं पाणी कमी पडलेलं नाही. आठमाही पिकांनाही पाणी कमी पडलेलं नाही. त्यांनी दुष्काळावर मात केली. डॉ. ए. एन. खोसला यांच्या अनुमानानुसार नदीनाल्याच्या स्वरूपात सुमारे १७० दशलक्ष हेक्टर मीटर पाणी दरवर्षी उपलब्ध होते. ते पाणी पूर्णत: समुद्रात न जाऊ देता, पर्यावरणाचा समतोल बिघडणार नाही, एवढ्या प्रमाणात ते अडवून त्याचा सिंचनासाठी वापर करायला हवा. सुमारे २० दशलक्ष हेक्टर मीटर पाणी अडविण्यासाठी पुढील काळात युद्धपातळीवर प्रयत्न करण्याची नितांत गरज आहे. श्री. माधवराव चितळे यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्रातल्या पाणी आयोगाच्या निष्कर्षात ही मांडणी व तपशील अधिक विस्तारानं व सूत्रबद्ध आलेला आहे. मोठी-लहान धरणं, पाणलोट क्षेत्रविकास, खोरेनिहाय कालबद्धता व नवीन तंत्रज्ञान, ठिबकचा वापर व पीक पद्धतीत कालानुरूप उपलब्ध पाण्याप्रमाणे बदल हे सगळं काही विस्तारानं मांडलेलं आह.े त्याचा स्वीकार प्रामुख्यानं आवश्यक आहे. मी १९ जुलै ८३ रोजी 'पाणी अडवा-जिरवा' अशी मोठी चर्चा विधान परिषदेत केली. तिथपासून जलसंधारणापर्यंत शासनात बरंच झालं - जास्त करून कागदावर - प्रत्यक्षात कमी. १९९० मध्ये फलोद्यान विकास, १९९३ मध्ये सामाजिक वनीकरण मांडलं; परंतु शासनात वेग नाही. मुख्यमंत्र्यांना भेटून आयोगानं चर्चा केली. त्यानंतर काहीच नाही.

सगळ्या जगामध्ये भारतीयच अधिक जलसंधारण करायचे. आपल्याकडे तशा शास्त्रशुद्ध पद्धती व जाणकार लोक होते. इंग्रजांनी १९२०मध्ये दुष्काळावर उपाय म्हणून विल्यम विलक्रॉक्स या तज्ज्ञाला भारतात बोलाविले. त्यांनी सांगितले 'खरं जलसंधारण व पाण्याच्या उपलब्धतेसाठी भारतीयांचीच पद्धत स्वीकारली

पाहिजे.' महात्मा गांधींच्या १९१० च्या हिंद स्वराज्य या लहानशा ग्रंथातून या जाणिवा स्पष्ट आढळतात. भारतीय स्वातंत्र्याचा प्रश्न हा विकासाच्या निवडीचा प्रश्न आहे. हा विचार गांधीजींच्या लेखनातून-कृतीतून आढळतो. त्यातील सखोल पर्यावरणीय जाणीव हे त्याचे वैशिष्ट्य आहे. भारतीय लोकपरंपरा व तत्त्वज्ञान यातून ज्या सहजप्रेरणा येतात, त्या गांधीजींच्या लेखनातून प्रतिबिंबित होतात. गांधींनंतर त्या विचाराला पुढे नेणाऱ्यांमध्ये अनेक सर्वोदयी कार्यकर्ते व विचारवंत होते. त्यात कुमारप्पा, विनोबा भावे यांचे योगदान विशेष होते. इकॉनॉमी ऑफ परमनन्स (टिकाऊ अर्थव्यवस्था) या ग्रंथाद्वारे या अर्थव्यवहाराची मांडणी केलेली आहे. विनोबांची मांडणी आधुनिक आहे. विज्ञानाचे त्यांनी स्वागतच केले. स्वदेशी-विदेशी व तंत्रज्ञानाच्या संदर्भात त्यांचे विचार गांधीवादी म्हणवल्या जाणाऱ्या विचारांपेक्षा वेगळे होते. स्वदेशी धर्म मध्ये त्यांनी हे सविस्तर मांडलेलं आहे. महात्मा गांधींनी प्रार्थना सभेत सांगितलं होतं, 'नैसर्गिक साधन संपत्तीने पूर्ण अशा आपल्या देशात उत्तुंग हिमालय असून, डोंगरदऱ्यांत विश्वदेवता राहते. गंगेसारख्या अनेक मोठ्या नद्या आहेत. आपण दुर्लक्ष केल्याने वर्षानुवर्षे पावसाचे पाणी बंगालच्या उपसागरात व अरबी समुद्रात वाहून जाते आहे. हे पाणी लहान बांध व तलावांमार्फत अडवून सिंचनासाठी वापरले, तर भारतात कोठेच दुष्काळ राहणार नाही. पाणी कमी पडणार नाही.'

धरणे बांधून नाल्यांमार्फत पाणी पुरवूनही पाहिजे तसे परिणाम दिसून आलेले नाहीत. (उत्पन्नात वाढ झाली नाही असं नाही) म्हणून केवळ मोठे धरण प्रकल्प जलसंधारणाला पर्यायी ठरू शकत नाहीत. मोठ्या सिंचन प्रकल्पांमुळे मोठ्या लोकसंख्येला पिण्याचं पाणी, मोठ्या कारखान्यांसाठीचं मुबलक पाणी, वीजनिर्मिती असं पुष्कळ जमेचं झालं. सिंचन प्रकल्पांमुळे केवळ हरितक्रांती स्वरूपाचे शेतीचे भाग तयार झाले, होतीलही; परंतु दुष्काळापासून ते उरलेल्या दुष्काळी भागाला वाचवू शकत नाहीत; आणि तोच मोठा प्रश्न आहे.

पाणी व पर्यावरणीय जाणीव, भारतातील विकासविषयक राजकीय विचार १९व्या शतकात काही प्रमाणात येऊ लागला होता. महात्मा जोतिबा फुले यांच्या 'जंगल, पाणी व जनाधिकार' याविषयीच्या लिखाणातून ती जाणीव आढळते. मोठ्या धरणांपेक्षाही लहान लहान पाणलोट उभे करावेत, ही संकल्पना अतिशय नेमक्या शब्दात १८८३ला शेतकऱ्याचा आसूडमध्ये त्यांनी लिहून तो खलिता पुण्याला, शासनाला, कृषी खात्याला (कृषी खात्याच्या स्थापनेच्या वेळी) दिला. त्याला भारतीय पाणी परंपरेचा आधार आहे. त्यांनी लिहिलंय, ''एकंदर डोंगर पर्वतावरील गवत-

झाडांच्या पाना-फुलांचे व मेलेल्या कीटक श्वापदांचे मांस, हाडांचे कुजलेले सत्त्व, वळवाच्या पावसाने धुऊन पाण्याच्या पुराबरोबर वाहून ओढ्याखोड्यात वाहून जाऊ नये. जागोजाग तालीवजा बंधारे असे बांधावे की, वळवाचे पाणी एकंदर शेतावर मुरून, नंतर नदी नाल्यास मिळावे. असे केल्याने शेते फार सुपीक होतील. सर्व डोंगरटेकड्यांमधील तलाव, तळी जितकी होतील तितकी सोयीसोयीनं बांधून काढावीत, म्हणजे त्यांच्या खालच्या प्रदेशात ओढ्याखोड्यांनी भर उन्हाळ्यात पाणी असल्यामुळे जागोजाग लहान धरणे घालून एकंदर सर्व विहिरीस पाण्याचा पुरवठा होऊन त्याजपासून सर्व ठिकाणी बागायती होऊन शेतकऱ्यांसहित सरकारचा फायदा होणार आहे. पाणलोटच्या बाजूने वरचेवर ताली दुरुस्त कराव्यात, एकंदर सर्व नदीनाले व तलावातील साचलेला गाळ शेतक◌ंनंा फुकट नेऊ द्यावा.’’

महाराष्ट्रात व भारतभर हजारो-लाखो तलावांचं पाणी अडवण्याचं जाळं, डोळसपणाने भूगर्भशास्त्राचा, पाण्याचा, भौगोलिक रचनेचा विचार करून तयार केलेलं आहे. त्याचा दस्तावेज आजही इतिहास, गॅझेटमध्ये आहे. ते पाहून, वाचून आपण थक्क होतो. चंद्रपूर, नागपूर, भंडारा, रामटेक नजीकच्या जमिनीतील व जमिनीवरील जलाशयांचे गुंतागुंतीचे जाळे निर्माण करून पाण्याचा चांगला, मोठा जलसंचय केला. त्याला ‘रामटेक पॅटर्न’ म्हणतात. एकूण १४४ तलाव, बांध, टाकी, विहिरी, कूपनलिका व दगडी कुंड यांचा उपयोग करून जलसंधारण केलं. भोसले, गोंड यांनी पाणी व वनश्री, जंगलं हिरवी ठेवली. त्यामुळे नाग, पिलीसारख्या बारमाही वाहत्या नद्या होत्या व दहा उपयुक्त असे पाण्याचे तलाव होते. महाराष्ट्रात धुळे, नाशिक जिल्ह्यांत पांजरा नदीवर पाचशे-सातशे वर्षांपूर्वी दोन पाझर तलाव व जमिनीला सरळ फड पद्धतीनं पाणी देण्यासाठी नदीत आठ बंधारे बांधून त्यासाठी उत्तम तंत्रज्ञान वापरून प्रत्यक्ष शेतांमध्ये पाणी खेळविलं. दोन पिकं घेऊन शेती हिरवी झाली. ‘कोकले बंधारा’ व ‘मालपूर बंधारा’ अशी त्यांची नावं आहेत. साचलेलं पाणी शेतकरी एकत्र फड पद्धतीनं वापरून, एकत्र पीक घेऊन एक-दुसऱ्याच्या सहयोगानं शेतीचं उत्पन्न वाढवीत असत. हा फड पद्धतीचा पॅटर्न व अहिल्याबाई होळकरांचा बांध, बारवांमधून पाणी साठवून पिण्याचं पाणी व पिकांना पाणी असा शेतीला व माणसांना उभा करणारा त्यावेळचा यशस्वी प्रयोग शाहू महाराजांना महत्त्वाचा वाटला. महाराष्ट्रातल्या इतर भागांप्रमाणे कोल्हापूर संस्थानातही महाराजांच्या काळी दुष्काळ पडत असे. दुष्काळाच्या काळात मदत करण्याची त्यांची भावना होतीच; परंतु दुष्काळ निर्मूलनाचा खरा मार्ग शेतीला पाणी पुरवठा वाढविणे हाच होय, याचे भान शाहू महाराजांना होते. नद्या, विहिरी आणि तलाव या

सर्व मार्गांचा अवलंब संस्थानात होत होता. सन १९१५-१६च्या अहवालावरून असे दिसते की, नद्यांपासून ३९,७८३ एकर, विहिरींपासून ३९,८४५ एकर आणि तलावांपासून २३२ एकर असा एकूण ८९,८६० एकरांना पाणी पुरवठा होत होता. विहिरी, बंधारे बांधण्यास शाहू महाराजांनी प्रोत्साहन दिले व साहाय्यही केले. तापी खोऱ्यातील (धुळे, जळगाव) अहिल्यादेवींनी पुनरुज्जीवित केलेली पाण्याच्या न्याय्य वाटपाची (फड) व्यवस्था हिचा उगम मौर्य काळात झाला, असं म्हणतात. सिंचनातील न्याय्य वाटपाच्या तत्त्वाचा, लोकशाहीचा उगम या देशात झाला आहे. राजा कसा असावा, असे मूर्तिमंत उदाहण असणारा द्रष्टा राजा शाहू छत्रपती यांनी कोल्हापूर भागात पंचगंगेच्या खोऱ्यात घालून दिले. लोकांना सहभागी करून घेऊन जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत सहकारातून या भागास समृद्धीच्या शिखरावर नेऊन ठेवले. पाणी उचलण्यासाठी मोटेची रांग व त्यावर फड पद्धती त्यांनी राबविली व जलव्यवस्थापनात एक आदर्श घालूरन दिला.

जोधपूरचा राविसार तलाव १४६० च्या काळात राणी जस्मेदानं बांधला. मेहेरगार्थ किल्ला, चितोडगडचा किल्ला, तिथले तेव्हाचे पन्नास हजार सैनिकांचे पोषण, आजही पाणी तसंच आहे. १५५६ ते १६०५ या काळात शहेनशाह अकबरानं दिल्ली परिसरालगत ३,२०० गावांसाठी मुख्य नद्या व उपनद्या अडवून बंधारे, लहान पाझर तलाव यांची साखळी करून पिण्याचं व शेतीचं पाणी निर्माण केलं. सिंदखेडराजा इथला उत्तम इंजिनिअरिंगचा नमुना असलेला तलाव, त्याच्या पाटचाऱ्या, बीडच्या खजाना विहिरीतलं न संपणारं, मोठं बागायती करणारं पाणी. भोर, मिरज, सांगली, देवगिरीसह अनेक किल्ले, तलाव या जलसंधारणाची साक्ष देतात. डायिंग व्हिजडम् या अतिशय काळजीपूर्वक केलेल्या पुस्तकात देशातील सर्वोत्तम शंभरपेक्षा अधिक पाणी योजना सचित्र दिलेल्या आहेत. लोकसहभागातून श्रीमंत लोक, राजे, इजासदार व सामान्य जनतेतील सुबुद्ध लोकांनी हा देश सुजलाम् सुफलाम् ठेवल्याचा इतिहास आहे. आज शंभर कोटींच्या पुढल्या लोकसंख्येच्या भयावह प्रश्नांनी उभा केलेला पाणीप्रश्न व भेदरलेला देश पुन्हा सावरण्यासाठी नव्या प्रगत तंत्रज्ञानासह जुन्या इतिहासातल्याच मार्गांनी जावं लागणार आहे. त्यात लोकांमधूनच एकमेकांच्या सहभागातून सरकारचं साहाय्य घेऊनच उभं राहणं शक्य आहे. 'पाणी' हा सरकारचा म्हणजे आपलाच प्रश्न आहे, या भावनेतून समाज स्वयंसेवी संस्थांमधून, स्वतंत्रपणानं गावागावातून समूहानं एकत्र येऊन परंपरेतल्या चांगल्या व नव्या अशा शास्त्रांसह पाणीप्रश्नात सहभागी होतानाचं चित्र दिसतं आहे. 'बळीराजा', हे जनचळवळीतून उभं राहिलेलं धरण, भारत पाटणकर, सासवडचे

विलासराव साळुंके, बापू उपाध्ये, भरत कावळे, म. फुले, राममनोहर लोहिया संस्था, मुकुंद घारे, आर. के. पाटील, जयंतराव पाटील (कोसबाड) हे देत असलेला पाणलोटाचा नवा विचार; डॉ. द्वारकादास लोहियांचा मानवलोकचा प्रयोग; शेती साहाय्य मंडळाचे बॅ. जवाहर गांधी, विजय बोराडे यांची पाणलोटाची यशस्वी गावं; अरुण निकम, अनघा पाटील यांनी झाडं, कुरण विकास व बांध यातून केलेली त्या संस्थांच्या विचारांची पुनर्बांधणी. पोपटराव पवार आणखी कितीतरी नवी मंडळी यांना राळेगणसिद्धीचे अण्णासाहेब हजारे, मोहाडीचा जैन उद्योग समूह, फादर बाकर, बारामती कृषी प्रतिष्ठान, वनराईचे मोहन धारिया यांच्या यशस्वी कार्याची जोड आहे. सगळी नावं घेता आली नाही - या क्षेत्रात पाणलोट, पाणी, लहान पाझर तलाव, नालाबांध सी.सी.टी. यात दोनशेपेक्षा अधिक सेवाभावी संस्था कार्यरत आहेत. पाणलोटासोबतच त्यावरच्या पीकपद्धतीचा फेरबदल, कमी पाण्यावरची फळबागायती, वनशेती व ठिबक सिंचनसारख्या पाणी बचतीच्या इस्रायली पद्धती हे सगळं मोठ्या व मध्यम धरणाला पूरक आहे. दहा वर्षांमध्ये हे नीटपणानं शासनानं सहकार्य देऊन उभं राहिलं तर लोकसहभाग वाढतोच आहे, असं नवं चित्र महाराष्ट्रात दिसू शकेल.

शासनानंच सगळं करावं व दारात पाणी द्यावं या भावनेनंच लोक पंगू झाले. मोठी धरणं-पाणलोट असं दोन ध्रुवाचं काहीही नाही. एकाच कुटुंबातले हे भाऊ भाऊ, तरीही धरण मोठं म्हणजे अतिभव्य करून वर्षानुवर्षे त्याच्या किमतीत दसपटपेक्षाही वाढ होऊन ते लवकर होऊ नये, इतकं मोठं करणं हे गरीब देशाला परवडणारं नाही. एका मोठ्या धरणाच्या पोटात दहा मध्यम, लहान, लवकर होणारी धरणं, पाणी प्रकल्प पाहिजे. त्याच्या वरच्या कॅचमेंटमध्ये पाणलोट किंवा पाणी अडवायची दूरवरसुद्धा जी बंदी असते ती नको. त्यांचंच पाणी असून ते तहानेले राहतात. शिवाय शंभर वर्षाआधीच त्या धरणात वरचा पाणलोट न झाल्यानं वेस्टेज, पाणी, गाळ येऊन तीस वर्षांतच धरण गाळाचं होऊन बसतं, हे आपण पाहतोच. धरणाची जागा निसर्ग ठरवतो; तशी महाराष्ट्रभर खूप चांगली भौगोलिक परिस्थिती आहे. मोठ्या धरणांच्या नर्मदेसारख्या अनेक अशा धरणांच्या जंगल जमिनीचा, उत्पादनाचा विचारच नीट होत नाही. शेतीत घरादाराशिवाय विस्थापित झालेल्या कुटुंबांना शब्द दिलेला सरकार पाळत नाही. त्यांनी कुठे जायचं? ज्यांच्या जमिनीला मोठ्या धरणानं पाणी देऊन संपूर्ण बारमाही बागायती केलं व तो अतिसमृद्ध झाला, त्यानं दोन एकर तरी बागायती जमीन आपल्याच विस्थापित बांधवाला विकत द्यावी; ते होत नाही, अशी दरी निर्माण होते. एकीकडे बारमाही पाणी, दुसरीकडे गरिबीत

एका सांजेला उपाशी कुटुंब हा दुरावा इथल्या इथेच परवडणारा नाही. समृद्धी, दारिद्य ही सिंचनानं केलेली विषमता विखार निर्माण करणारी आहे. मोठ्या पाटबंधारे योजनांच्या माध्यमातून मोठी, उसाची श्रीमंत शेती व कारखानदारी उभी राहिली. सार्वजनिक पैशातून. पाण्याची मोजणी नाही व योग्य त्याची किंमतही कोणी चुकवीत नाही, अशी स्थिती आहे. दुसऱ्या त्याच आपल्या जगतात कोसचे कोस जाऊन प्यायलाही पाणी नाही. भारतातल्या एकूण धरणांमध्ये महाराष्ट्रात अर्धी अधिक धरणं आहेत. पन्नास वर्षांत अर्धीसुद्धा पूर्ण झाली नाहीत. किंमत कितीपट वाढली? १९९८-९९च्या किमतीत ७०-७५ हजार कोटी इतके पैसे ते पूर्ण करायला लागतील. उभे राहिलेले साखर कारखाने, प्रक्रिया तिथला परिसर बदलवून समृद्ध करू शकेल हे खरं असलं, तरी आणखी पन्नास सहकारी कारखाने व पन्नास खाजगी साखर कारखाने, कितीही धरणं व पाणलोट केला, तरी भूगर्भातलं पाणी थेंबभर तरी पंचवीस वर्षांत शिल्लक ठेवतील का? हे राक्षसी पंप, बागायती, मोठी पिकं, पाण्याचा भूगर्भ व महाराष्ट्राला पार रितं करून टाकणार. तुम्ही कितीही योजना करा. त्यात लोकभावनेचा व सहजीवनाचा महाराष्ट्रभरचा विचार हवा.

समन्यायीपणा, समानता याचा थोडा तरी विचार व्हावा. इरिगेशनची व्याख्या फक्त आठमाही पाण्याची, किमान दोन पाण्याची आहे. बारमाही नाही. निसर्गात पाण्याचं न्याय्य व्यवस्थापन होणार नाही, हे सत्य आहे. तरीही उसाचे नवे वाण, कंद शोधा, पद्धती शोधा. कमी पाण्यावरचं संशोधन करून पाणी वाचवा. ते वाचलं तर ३०० एकराचं उसाचं जादा पाणी एक हजार एकराच्या आठमाही शेतीला पुरणारं आहे. थोडातरी कोरडीचा पट्टा अधिक हिरवा होईल. कृष्णा खोऱ्यात ३००० ते ४००० उपसा जलसिंचन योजना आहेत. तीन-साडेतीन हजार कोटी त्यासाठी लागले. किती जमीन पाण्याखाली आली, याचा खरा आकडा बघा. न पेलवणाऱ्या योजना विदर्भ, मराठावाडा व जळगाव, धुळे जिल्ह्यांत तर वर्षं दोन वर्षांत बंद होऊन लाखो, करोडो रुपयांचं कर्ज व्यक्तिगत शेतकऱ्यांच्या अंगावर आलं. त्यातून तो सुटणंच शक्य नाही. २ कोटी, ५ कोटीचं थकीत वीज बिल या उपसा योजनांचं कोण भरणार? त्या पुन्हा कशा कार्यान्वित होणार? परवडेल तिथपर्यंतच जायला हवं हे यांना कोण सांगणार? आणि ऐकणार का? एक कोटी उद्‌घाटनासाठी व व्यवस्थेसाठीचा खर्च? दहा, साडेपाच हजार कोटी कर्ज पाच वर्ष. कृष्णा खोऱ्याचे साडेपाच कोटी. एका खोऱ्याचं व्याज पंधराशे कोटी, म्हणजे काय गंमत आहे ! सिंचन व्यवस्थेतून हे कर्ज सुटेल हे समजणं चुकीचं आहे. पुन्हा अनुशेष, त्यातलं विभागाविभागाचं पाण्यावरून भांडण.

हे कुठेतरी थांबलं नाही, तर एकसंध महाराष्ट्राला तडे जातील. ते कधीच कोणालाही नको आहे. तसा विचारही त्रासदायक आहे.

पाण्याचा प्रश्न हा महाराष्ट्राच्या नुसत्या पाण्याचा प्रश्न नसून महाराष्ट्राच्या जीवन-मरणाचा प्रश्न आहे. महाराष्ट्राच्या सौभाग्याचा प्रश्न आहे. पाण्यासंबंधी, पाण्याच्या प्रश्नासंबंधी कितीही लिहिलं, बोललं तरी अपूर्ण वाटावं इतकं ते जगड्व्याळ विस्तारलेलं आहे. मी एक साधा कोरड्या जमिनीतला शेतकरी. एक साधारण कवी. मला जेवढं समजलं, सुचलं तेवढं अनेकांचं ऐकून वाचून मी माझ्यापरीनं इथे लिहिलं. बोललो. हे चुकीचं असेल, नीट नसेलही, माझ्या मर्यादा हेच कारण आहे. एवढ्या मोठ्या जाणत्या पाणी तज्ज्ञांसमोर, साहित्यिकांसमोर, रसिकांसमोर मला हे अध्यक्षपद देऊन गौरविलं, त्यासाठी पुन्हा एकदा नम्रतापूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो.

(अध्यक्षीय भाषण - पहिले अखिल भारतीय जलसाहित्य संमेलन - २००२, नागपूर)

-०-०-

# २. हो घराघरातून देव आता ग्रंथांचे

महाराष्ट्राच्या विधान परिषदेत मी आमदार असताना (१९७८-८४, १९९०-९६) अतिशय जाणकार, थोड्या चांगल्या आमदारांची, मंत्र्यांची भाषणं ऐकताना मला एक जाणवलं, त्या विषयाशी संबंधित अनेक अभ्यासपूर्ण माहिती, संदर्भ, कालखंड, प्रत्यक्ष त्या त्या काळातल्या भाषणांचे तुकडे भाषणात ग्रथित करून चकित व्हावं इतकं सुंदर भाषण, ठराव, चर्चा मी ऐकल्या. अर्थात अशी माणसं फारच थोडी होती; पण जे ऐकता आलं हे माझं भाग्य. आज काय चाललंय, बोलताबोलता पाच-दहा वर्षांत त्याविषयी शब्दही बोलू नये इतकं भंपक. १९ जुलै १९८३ रोजी मी 'पाणी अडवा, पाणी जिरवा' संबंधी दीर्घ चर्चा घेतलेली होती. ती चर्चा, त्यावेळचे मुख्यमंत्री वसंतरावदादा पाटील यांचं उत्तर, आज महाराष्ट्रात महत्त्वाचा ऐतिहासिक निर्णय होऊन त्याला देशभर अग्रक्रम मिळतो आहे.

मी त्यासाठी ठिकठिकाणी महाराष्ट्रात फिरलो. दुष्काळी पट्ट्यात. जुने संदर्भ शोधीत. वेगवेगळ्या राज्यातल्या त्या त्या वेळची दुष्काळी स्थिती व निर्णय यासाठीची पुस्तकं, तपशील मी धुंडत राहिलो. अनेक जाणकारांशी आधी चर्चा केली. अशा खूप तयारीनं 'पाणी अडवा'ची मांडणी केली. मी दुष्काळ, पाणी यासाठीची पुस्तकं शोधली. इतक्या तशा कोरड्या विषयात मी खूप खूप रमून गेलो. अस्सल चांगला कवितासंग्रह, कादंबरी, कथा वाचताना आनंद मिळाला तेवढाच ही पुस्तकं वाचताना. आपल्याला किती कमी माहिती आहे, काहीच कसं अजून समजलेलं नाही, जग किती मोठ्या समाजकार्यानं पाण्याच्या, शेतीच्या, खेड्यांच्या उभारणीसाठी सजग व कार्य करण्यासाठी, श्रमदानासाठी आघाडीवर होतं हे पाहिलं. नवं पुष्कळ लिहिलं जातं आहे. पाचशे-हजार पानांची जडबंबाळ, थोर पुस्तकं कृषी विद्यापीठ व शास्त्रज्ञ छापताहेत. नवं ज्ञान देताहेत. चांगली गोष्ट आहे. मला तर जुन्या बखरी, इतिहास, पाणी, शेती उभारणीचे राजेरजवाड्यांचे, प्रगत गावातल्या माणसांचे निर्णय, इंजिनिअरिंग व शेतीशास्त्राचे, धरण, पाटबंधारे तलाव व पाणी अडविण्याचे शास्त्र, ज्ञान व प्रत्यक्ष केलेलं कार्य पाहून मी थक्क झालो. एवढ्या प्रचंड ज्ञानाचा, अनुभवाचा

व समाजसेवेचा, आपणच आपल्यासाठी उभारणी व श्रम करावेत, या जाणिवेचा हा देश. राज्याराज्यांत ही सामाजिक जाणीव असलेली सामान्य माणसं, त्यातलीच स्थापत्य व कलाकुसर माहीत असलेली माणसं. अनेक दुष्काळ आले, प्रचंड दुष्काळ, त्याला सामूहिक पद्धतीनं सामोरे जाऊन, हाती हात घेऊन सकलांनी काम केलं. लहान लहान तलाव, बंधारे, पाणी योजना केल्या. दीर्घ काळ पाणीसाठ्याच्या विहिरी, बारवा केल्या. दुष्काळावर मात करून राज्याराज्यात पुन्हा उभारणी करून हा देश सतेज व सर्वार्थानं त्यांनी जिवंत ठेवला. 'पहिले अखिल भारतीय जलसाहित्य संमेलन' नागपूरला १२-१३ ऑगस्ट २००२ला फार मोठ्या चांगल्या नियोजनानं संपन्न झालं. श्रीमती अरुणा सबाने, त्यांची संस्था व अनेक क्षेत्रातल्या देशभरातल्या संस्थांनी व जाणकारांनी त्यासाठी मदत केली, प्रत्यक्ष सहभाग दिला.

दोन दिवसांच्या या जलसाहित्य संमेलनाला राज्याराज्यांतून, देशभरातून जाणकार, अभ्यासू लोक आलेले होते. मोठे, चांगले साहित्यिकसुद्धा त्यात सहभागी झाले. जलतज्ज्ञ माधवराव चितळे यांनी यासाठी फार फार मेहनत घेऊन ते संमेलन यशाच्या सर्वोच्च ठिकाणी नोंदविलं. गेल्या वर्षीच्या, जगभरच्या मोठ्या जपानच्या जलसाहित्य संमेलनानंसुद्धा, या संमेलनाची नोंद घेतली. मला फक्त खरोखरी संकोच एवढाच कायम त्रास देणारा होता - या पहिल्या भव्य अशा जलसाहित्य संमेलनाचं अध्यक्षपद मला दिलेलं होतं. पुष्कळदा नाही सांगूनही ते स्वीकारावं लागलं. आज आनंद वाटतोय. दिल्लीचे 'महात्मा गांधी शांती प्रतिष्ठान' यांचे अनुपम मिश्र चर्चेसाठी होतेच. आज भी खरे हैं तालाब या पुस्तकातल्या त्यांच्या दोन-तीन हजार वर्षांच्या तलावाच्या परंपरांची चर्चा झाली. त्यातले संदर्भ, हजारो उभे राहिलेले तलाव व सामाजिक स्थिती यांचं दर्शन वाचल्यावर त्याचं मराठी भाषांतर झालं. भाषांतर अत्यंत आवश्यक आहे. मोठ्या धरण योजनांची पुस्तकं-इंग्रजी, हिंदी, मराठी- तिथे होती, सर्वत्र आहेत. भंडारा, रामटेक यामध्ये अजूनही हे तलाव बांधण्याचं शास्त्र माहीत असलेली मंडळी, तो समाज भेटला- त्यांचं आत्मकथन होतं. डायिंग व्हिजडम या पुस्तकात भारतीय शेतीशास्त्र, पाणी परंपरा, इंजिनिअरिंग व अनेक ज्ञान भांडार सचित्र आहे. १८१८च्या आधीचं बांबूमधून आसाममध्ये दिलं जाणारं ठिबकचं पाणी, राज्याराज्यातल्या वेगवेगळ्या त्या त्या भूप्रदेशाप्रमाणे पाणी योजना, यासारखी खूपच महत्त्वाची ऐतिहासिक दस्तावेज असलेली अशी ही पुस्तकं भाषांतरित झाली पाहिजेत. शासनानं ती स्वस्त किमतीत दिली पाहिजेत. श्री. माधवराव चितळे यांच्या अध्यक्षतेखाली गेल्या पाच वर्षांत आयोगानं जो अभ्यास व निर्णय करून पाच मोठे ग्रंथ दिले, त्याला शब्द नाहीत, इतकं त्यांचं मोल आहे. ते सर्वत्र दिलं जावं.

डॉ. स्वामीनाथनचं पुस्तक अतुल देऊळगावकर यांनी सुंदर केलं, मजकुरासह. शेतीचा कारभार हे पुस्तक मी पंचवीस वर्षांपूर्वी वाचलं होतं. किर्लोस्करांनी ते प्रकाशित केलं होतं. ही अशी पुस्तकं वाचून मी बोलत राहिलो. शेतकऱ्यांच्या विद्यापीठात व विधान परिषदेतल्या सर्वोच्च सभागृहात. शेती, पाणी, जमीन, पीक पद्धती, तंत्रशास्त्र, अर्थकारण अशी खेडी व शेती उभारणीची जवळपास चारशे पुस्तकं माझ्याजवळ आहेत. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या वतीनं आम्ही अण्णासाहेब शिंदे, दुष्काळ व शेती हे पुस्तक संपादित केलं. स्व. अण्णासाहेब पवारांचं पाणी हे पुस्तक. झाडं लावणारा माणूस, जलआशय, पाणी पंचायत, जंगल झाडं, पर्यावरण, पाणलोटावरील किमान पन्नास पुस्तकं (साकेत) अशा अनेकविध पुस्तकांची भाषांतरं त स्वस्त किमतीत देणं व 'वडनेर' (भैरव) सारख्या खेड्यांनी (५० तरी गावं) अशा पुस्तकांची लायब्ररी केली, तशी करणं आज जरुरी वाटतं.

अनेक मासिक, साप्ताहिकं, शेती पुरवण्या निघताहेत, ती शक्ती देणारीच आहेत. शेतकरी समाजातल्या तरुण मंडळींनी ही वाचनसंस्कृती जोपासली व प्रत्यक्षात आणली, तर मोठं काम होईल. नक्की होणार.

-०-०-

# ३. कशी गं गर्द झाली सोन्याची आंबराई

मालगुंड या केशवसुतांच्या खेड्यात उभारलेलं स्मारक हे अनेक अर्थांनी सुंदर व लक्षात ठेवावं असं स्मारक आहे. केशवसुत. कृष्णाजी केशव दामले. अर्वाचीन मराठी कवितेतले गेल्या शतकातले श्रेष्ठ कवी. इकड कित्येक कोस दूर जळगाव जिल्ह्यात भडगाव व पैâजपूर येथे काही वर्षे शिक्षक होते. कुठे गणपतीपुळेजवळचं त्यांचं खेडं, कुठे खानदेश. तसंच सानेगुरुजीचं. मला त्यावेळच्या प्रवास इत्यादींच्या कठीण काळात हे लांबच्या लांब कसे जायचे, जगायचे हा मला अजूनही प्रश्न आहे. नवसारीला गोविंदाग्रज गडकऱ्यांचा जन्म, मुंबई-पुणे करून मृत्यू नागपूरजवळ सावनेरला. दहा-अकरा कवींची स्मारकं करताना मी कोणत्या ना कोणत्या कारणांनी त्यात सहभागी होत राहिलो. श्री. मधु मंगेश कर्णिक यांनी केशवसुतांच्या गावी त्यांचं सुंदर स्मारक करण्यासाठी परिश्रम घेतले. महाराष्ट्रातल्या मुख्यमंत्र्यांसह आम्ही साहित्यिकांनी त्यात सहभाग दिला. कोकण मराठी साहित्य परिषदेचं खूप वर्षांचं बोलावणं होतं म्हणून व मला कोकणाचं आकर्षण होतं म्हणून मी केशवसुत स्मारकाच्या ठिकाणी मालगुंडला नतमस्तक व्हायला व तिथल्या साहित्य संमेलनात सहभागी व्हायला गेलो.

गणपतीपुळे. अथांग समुद्र यापेक्षाही सुंदर लदबद झाडीमध्ये वळणवाटांनी व्यापलेलं खेडं. सुंदर स्मारक अजूनही डोळ्यांवरून उतरत नाही. दोन दिवस तिथे कविता व गप्पा मनसोक्त झाल्या. रत्नागिरीपासून जवळच श्री. भिडे यांची आंबराई व शंभर वर्षाच्या उंच उंच आंब्याच्या झाडांनी शेतकरी मित्रांनाही वेडावून टाकलं. छान आंबे, पॅकिंग, गर विक्री यांची चर्चा मला नवी होती. त्याचं अर्थशास्त्र मी समजून घेतलं. जवळपासचे शेतकरीही आले. श्री. भिडेंची अठ्ठावीस एकरांची तुकड्या तुकड्यांनी जोडलेली, ब्लास्टिंग करून दगड फोडलेली पक्क्या काळ्या कातळाची जमीन, त्यात दुरून आणून टाकलेली माती, दगडांचं पाणीसाठ्यासाठी केलेलं गोलाकार आळं. वाफे व दूरवरून दुहाळ्यात आणायचं पाणी. हे सगळं पाहून, एकून एक शेतकरी म्हणून गारेगार झालो. अल्फान्सोची किंमत, चव, देखणेपण, पॅकेजिंग

व किंमत पाहून आपण जरा विचारच करतो; पण त्यासाठी इतके श्रम व अतोनात कष्ट करण्याची वर्षभराची घामाची किंमत पाहिल्यावर आंबा सोपा नाही हे लक्षात येतं.

आंबा सहज कोकणात येतो, असं म्हणता येणार नाही. अर्थात हे चांगल्या नव्या शेतकऱ्यांच्या त्यांच्या जगभरच्या दृष्टिकोनाच्या अर्थशास्त्राचं आहे. रत्नागिरीच्या परिसरातल्या नव्या-जुन्या बागा, घनगर्द झाडी, हिरवळ, तांबडी दगडमाती, आरती प्रभूंच्या कुडाळपासून, तर श्री. ना. पेंडसे, विंदा करंदीकरांच्या गावाजवळ- कित्येक मैल मी त्यांच्या कविता गुणगुणत फिरत राहिलो. उत्तम हिरव्या झाडांचा देखणा निसर्ग, पैसा देणारा निसर्ग, मन प्रसन्न करणारा निसर्ग, लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या अनेक आठवणींना, स्थळांना उजाळा देणारा निसर्ग. त्यांच्या अजूनही जागवणाऱ्या जागा. श्री. गोगटे, गंगावणेंसारख्या कृषी उद्योगातल्या दिग्गज, बुद्धिमान लोकांचा हा प्रदेश. या पुढल्या दोन-पाच वर्षांत काजू, आंबा व त्यावर प्रक्रिया प्रोसेसिंग्, योग्य ठिकाणी विक्री केंद्र जगभर शोधून कोकण हा महाराष्ट्रातला क्रमांक एकचा विभाग राहील.

थेट दोन-तीन जिल्ह्यांमध्ये मी प्रवास केला. आंब्याच्या ठिकाणी आता काजूच्या चांगल्या बागा मोठ्या प्रमाणावर उभ्या राहिल्या. त्याच्यासोबत मसाल्याच्या वेली, झाडं, वनस्पती उभ्या राहिल्या. हे नव्यानं नवं तंत्र शास्त्र घेऊन. नवे वाण. आंब्याच्या काजूच्या प्रगत जाती. त्यातलं बारीकसारीक तपशिलाचं संशोधनाचं काम. रोगराई प्रुनिंगसारख्या गोष्टी लहान लहान शेतकरी खूप लक्ष घालून करताहेत. एवढा पाऊस पडूनही पाण्याच्या शोधात उन्हाळाभर फिरताहेत. मूळ बागा, झाडं कष्टानं उभे करताहेत. रत्नागिरी व तिथून पुढे ज्या ज्या तालुक्याच्या, जिल्ह्याच्या वा कोणत्याही मोठ्या गावी मी गेलो, तर साहित्यिक पत्रकार भेटायचे. त्यापेक्षाही अधिक प्रत्येक ठिकाणचे कृषी अधिकारी, कृषी पदवीधर, संशोधक शेतीशास्त्रातले जाणते जुन्या पिढीतले, नव्या पिढीतले लोक भेटायचे. मला खूप नवल वाटत होतं.

मी केशवसुत स्मारकावर कोकण साहित्य परिषदेसाठी येणार व पुढे कुठे कुठे जाणार याचा तपशील या सगळ्यांनी कुठून तरी मिळवला. कणकवलीला पत्रकारांना द्यायच्या गौरव पुरस्कारासाठी पुढारीनं मोठा कार्यक्रम बांधलेला होता. तिथे तर फारच गर्दी झाली होती. त्यातही अर्धे शेतकरी होते. शेतकऱ्यांचं हे नातं इतकं नकळत घट्ट झालं. मला नेहमीच या गोष्टींचा भरभरून आनंद आहे. निर्मळ

मनाचे, हजार प्रश्नात वेढूनही मार्ग काढायला निघालेले शेतकरी मला महाराष्ट्रभर अत्यंत जिव्हाळ्यानं भेटतात. शेतकरी म्हणून व कवी म्हणूनसुद्धा. या सगळ्यांच्या अडीअडचणी माझ्या लक्षात आल्या. मला खूप काही नवं न समजणारं त्या प्रदेशातलं.

रत्नागिरी, राजापूर, सिंधुदुर्गच्या पलीकडच्या मातीच्या फळांच्या वेगळेपणाचं, विशेषत: नवा काजूनं उभा राहणारा कोकण, भक्कम अर्थसत्ता उभी करून दाखविणारा कोकण मला स्पष्ट दिसतो आहे. नवा बहर व प्रेरणा मी कोकणातून घेऊन आलो.

महाराष्ट्राचे फलोद्यान खात्याचे मंत्री ना. श्री. अजितदादा पवार यांना मी फलोद्यानासंबंधी पत्र पाठविलं होतं. त्यांनी माझ्यासह महाराष्ट्रातल्या कृषी फलोद्यान अधिकाऱ्यांची बैठक घेतली. पुन्हा दोन महिन्यांत अधिकारी, प्रक्रिया कारखानदारी प्रोसेसिंगमधले जाणकार, संस्था व प्रगत फळबागांमधले शेतकरी यांची बैठक घेतली. खूप नवे बदल आले. निर्णय झाले. फळबागांना पूरक, शेतकऱ्यांना आधार देणारे. शंभर टक्के अनुदानासाठी फक्त चार हेक्टरची मर्यादा होती ती कोकणासाठी मी दहा हेक्टरची सुचविली. त्यांनी मान्य केली. मुख्यमंत्र्यांनी मान्य केली.

केशवसुत, पेंडसे, मधु मंगेश कर्णिक, आरती, विंदा व अनेकांच्यासाठी, शेतकऱ्यांसाठी मला खूप काही देता आलं, बरं वाटलं.

-०-०-

# ४. पंख इवलाले देवा, आम्ही बांधू देश नवा

१९५९ व १९७५ असा दोन वेळा जमीन सुधारणा कायदा भारतभर अमलात आला व जमिनीला कमाल-किमान मर्यादा आली. ज्यांच्या जादा जमिनी होत्या त्या काढून भूमिहीन लोकांना वाटप करण्यात आल्या. विशेषत: १९७५ च्या ऐन आणीबाणीच्या कठोर काळात दुसऱ्यांदा हा कायदा आला, त्यावेळी निमूटपणानं नियम व भीतीनं जमिनी काढून दिल्या गेल्या. आज त्या जमिनीवर दोन पिढ्यांचं पुन्हा वाटप झालं. मुलं-मुली, कुटुंब वाढलं. जमिनीचं कौटुंबिक विघटन झालं. तीस एकराचे तीन मुलांमध्ये दहा-दहा एकर व आता दोन मुलांमध्ये त्याचे पाच-पाच एकरांचे तुकडे झाले. काही ठिकाणी एकर-दोन एकरांची शेती नावावर आहे. विदर्भ, मराठवाडा येथील मोठ्या जमिनींचेही दहा-पंधरा एकरांपर्यंतचे तुकडे झाले. विहिरी, पाणी यातही हिस्से झाले. दक्षिणेतल्या राज्यात आधीच फार लहान जमिनींचे तुकडे होते. महाराष्ट्र, मध्यप्रदेश, गुजरात, उ. प्रदेश, बिहार इत्यादी ठिकाणी जास्त जमिनी होत्या.

लहान जमिनीवरले बहुसंख्य शेतकरी तरुण नोकरी-व्यवसायात निघून गेले. ती जमीन कुणाला तरी भाड्यानं, वाटेहिश्श्यानं, ठेक्यानं दिली जाते. भूमिहीन मजूर, शेजारचा लहान शेतकरी ती जमीन करतो, असं अनेक ठिकाणी चित्र आहे. या लहान तुकड्यांमध्ये आज नव्यानं तीन-पाच एकरात विहीर करणं, बोअरवेल करणं खूपच खर्चाचं झाल्यानं ती कोरडीचीच जमीन जास्त करून आहे.

जमिनीचे पाच-दहा एकराचे तुकडे झाले, कुटुंब वाढलं, खर्च वाढले. म्हणून नव्या तरुण शेतकरी वर्गानं नवं तंत्रज्ञान, शास्त्र व थोडंबहुत पाणी कुठून पाईपनं आणून अतिशय उत्तम शेती केलेली मी पाहतो आहे. अशा आठमाही पाण्यावर फलोद्यान अथवा कोणतीही पिकं जिवापाड कष्टानं करून पाच एकरांमध्ये निव्वळ एक लाख रुपये, दहा एकरांमध्ये जवळपास तीन लाख रुपये वर्षाला उत्पन्न काढणारे शेतकरी आहेत. अर्थात, त्यासाठी पाणी-बोअरवेल पाईपलाइन- झाडं - शेती - ट्रॅक्टर

- ठिबक इत्यादी कारणांसाठी तीन ते पाच लाख रुपये हळूहळू कर्ज काढून अथवा घर गहाण ठेवून उपलब्ध करावे लागते. ते फेडले.

एक वर्ग असा आहे की, विशेषत: विदर्भ, मराठवाडा, खानदेशचा काही भाग. बऱ्यापैकी जमीन, भक्कम कर्ज, पाणीपुरवठा तसा चांगला. नद्या, पाझर तलाव बरे, हवामान पद्धती चांगली. शासनाच्या सगळ्या योजनांचे, बँकांचे पैसे मिळवून त्यावर दोन-चार वर्षं मजा करून जमिनी अनुत्पादक ठेवल्या. नीट नियोजन नाही म्हणून कमी उत्पन्नाच्या राहिल्या. कर्जफेड क्षमता असूनही वेळच्यावेळी न केल्यानं कुठेच पत राहिली नाही. मोठ्या किमतीवर दीर्घ काळ अर्ध्या जमिनी लावून दिल्या. अर्ध्या अधिक विक्रीस काढल्या.

यावर्षी जानेवारीच्या (२००४) दुसऱ्या आठवड्यात अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन औरंगाबादला होतं. संमेलनाचे उद्‌घाटक ना. श्री. शरदराव पवार यांना जळगाव, पळसखेडे, अजिंठा मार्गे मी औरंगाबादला कारनं घेऊन गेलो. आम्ही दोघंच गाडीत होतो. त्यांची - माझी जिव्हाळ्याची शेतीची चर्चा दीड तास चालली. तासभर साहित्य, कला व इतर गोष्टी. माझ्या गावाच्या आधी पाळधी, पहूर, वाकोर या परिसरात उत्तमातली उत्तम कापसाची शेतं उभी होती. दोन वेचण्या होऊनही कापूसवैâरी लदबदलेली. तुरीच्या हारी भरगच्च कापणीला आलेल्या. कापून ठेवलेल्या. सोयाबीनवरले रबीचे पीक दुबार पीक व भाजीपाल्याची शेत हे सगळं पाहताना श्री. शरदराव सुखावले. गाडी थोडी हळू केली. मी सांगितलं केवळ हंगामी विहिरीवरली ही शेती. यावर्षी कापसाला पाच-सहा पाणी हंगामी दिले. कापसाला भाव बरे होते. दुबार पिकांना तीन. भाजीपाला विक्रीला चाललेलाच आहे. हे सगळे लहान लहान शेतकरी आहेत. विशेषत: इथे माहीळ समाज व लहान लहान बहुजन समाज शेतीत फार कष्टानं खूप कमावतो. यावर्षी थोडा बरा पावसाळा झाला. यांनी एकरी उत्पादनाचा, पैशांचा उच्चांक गाठला. एकरी पंधरा-वीस हजारांपेक्षा जास्तीत कमावले. त्यांना एका धरणाच्या अपूर्ण कामात तीस कोटी द्या. स्वर्ग उभा करतील. इथे कोणताही मोठा शेतकरी नाही. व्यवसाय केवळ शेती.

कितीतरी दिवसात पवारसाहेब प्रसन्नपणानं हसताना, बोलताना मी पाहिलं. तिकडे बारा जिल्ह्यात अतोनात दुष्काळ म्हणून त्याचं दु:खही उमटून आलं. कृषिभूषण श्री. कुमार अन्वीकर व मी फुलंब्रीजवळच्या एका झोपडीतल्या शेतकऱ्याच्या घरी गेलो. अर्ध्या एकरात क्रमाक्रमानं (दहा गुंठे) आलं, योग्य त्या

काळात, पिकवून विकून तो वर्षाला पन्नास हजार घेत होता. अशोक या माझ्या ड्रायव्हरनं तीन एकरात सुंदर बाग उभी केली.

कपडे शिवायचं छोटं काम करणारे माझ्या पळसखेडचे दत्तू माळी व काही तरुण, भाड्यानं जमीन केलेले मजूर अशा जवळपास पन्नास शेतकऱ्यांनी लाख-दोन लाखांचा कापूस काढला. पाच-सात एकरांमध्ये कांदा सीड काढलं. असंच, दोन एकर केळी करणारे पंचवीस किलोचा घड काढून चारशे रुपये क्विंटलनं विकणारे एकरी साठ-सत्तर हजार रुपये मिळवते झाले. ठिबक, टिश्युकल्चर व नीट जोपासना.

सोयगावच्या श्री. अशोक कोंडू रोकडे या तरुणानं बेकार जमिनीत पाणी नाही म्हणून एक हेक्टरमध्ये सीताफळं लावली. त्याचं हे पाचवं वर्ष. फक्त दहा हजार खर्च झाला. एक हेक्टरची सीताफळं विक्री एक लाखाला झाली. रोख पैसे आले. सोयगावी आणि पिंपळगाव हरेश्वर इथेही अशीच फळझाडं. लोहाऱ्याला कृषिभूषण विश्वासराव पाटील आणि बदनापूर, जालना, वसमत, नांदेड या परिसरात विक्रमी चांगली मोसंब्यांची बागायती लहान लहान शेतकऱ्यांनी उभी केली. पश्चिम महाराष्ट्रात तर मोठा इतिहास घडविला. सटाण्याजवळ श्री. निकम यांची डाळिंबाची बाग. बुलढाणा, अकोला, रामटेककडे विक्रमी मिरचीचं उत्पादन लहान शेतकरी काढताहेत. दोंडाईचा परिसरही मिरचीचाच. परिस्थिती पाऊस पाण्यानं खूप बदलूनसुद्धा शासकीय योजना व नवं तंत्रज्ञान, दृष्टिकोन घेऊन कष्ट करणाऱ्या लहान शेतकऱ्यांनी हा देश समृद्ध सुखी करून शेतीला पूर्ववत प्रतिष्ठा देण्याचं काम चालवलेलं आहे.

-०-०-

# ५. थेंब थेंब पाण्याचे, वृक्ष अमृताचे

परवा महाराष्ट्राच्या कृषिमंत्र्यांनी ठिबक सिंचनासाठी पुन्हा नवी घोषणा केली. आनंद वाटला. तीस कोटीवरून देश सत्तर कोटी लोकसंख्येचा झाला. आता तर शंभर कोटी लोकसंख्येनं राक्षसी प्रश्न उभे केले. सगळ्यात मोठा जीवन-मरणाचा, रोजच्या जगण्याचा, गरजांचा प्रश्न आहे पाण्याचा. पिण्याचं पाणी, गुरं-वासरं धुणं, संडास, बाथरूमसाठीचं पाणी, शेतीचं कमीत कमी आठमाही पाणी, त्यावर उभं राहणार पीक, शेती उत्पादन, अवघा संसार. बारा-चौदा राज्यं दुष्काळी. पाणी नाही. महाराष्ट्रात सतत तीन वर्षं दुष्काळी जिल्हे बारा. अनेक तालुके. दहा-वीस वर्षांत उभं केलेलं शेतीतलं झाडं, फळझाडांचं, उत्पन्नाचं, विहिरीचं संपूर्ण नष्ट होतं. उद्ध्वस्त संसार.

या प्रश्नात अनेक प्रश्न आहेत. योजनांची चर्चा आहे. ती आताच नको. या प्रश्नाशी निगडित अशा एका प्रश्नाचा, उपाययोजनांचा भाग इथे पाहता येईल. भक्कपणानं पाऊस आला, खूप वाहून गेला. धरण, पाटबंधाऱ्यात, नदीनाल्यांत. थोडा थांबला. विहिरी आठमाही भरल्या; परंतु मार्च ते जून पाणी टंचाई व पीक, फळझाडं नष्ट होणं, पाण्यासाठी वणवण फिरणं. साधं पिण्याचं पाणी कुठेही नाही. सर्वत्र हाहाकार. हे कशानं वाढलं? किमान काही उपाय नव्हतेच का? धरण-पाटाचं पाणी ओबडधोबड पद्धतीनं जमिनीला नको तेवढं देऊन बांधावरून पुन्हा नदीतून समुद्राकडे, असा एक चुकीचा भाग, वर्षानुवर्षे चाललेला. धरण, तळी नष्ट झाली. नदी, तळ्यातलं पाणी पी.व्ही.सी. पाईपनं पैसे भरून लबाडीनं शेतात अनागोंदी करून. तेही पाणी नष्ट करणं, राजरोस भ्रष्टाचारानं. शहरात तर विचारूच नका. खेड्यातल्या पाणी वापराच्या शंभरपट पाणी आम्ही आमच्या सोफिस्टिकेटेड जगण्यासाठी अविचारानं वापरणार. पुन्हा पाण्याचा ओरडा करणार. यासारख्या अनेक अविचारी व्यवहारानं आम्ही पाणी प्रश्नावर दिवसेंदिवस कफल्लक होत चाललो. बचतीचा, काटकसरीचा थोडा शहाणपणाचा, ही देशाची संपत्ती आहे याचा मागमूसही कुठे नाही.

धरण, पाटातलं पाणी चारीनं न देता पाईपद्वारे मर्यादित द्यावं. पासष्ट टक्के पाण्याचा अपव्यय होतोय. म्हणजे किती पाणी वाचलं असतं याचा हिशेब तपशीलवार पाणी व शेती तज्ज्ञांनी देऊनही कोणत्याही शासनानं त्यासाठीचे योग्य ते निर्णय घेतले नाहीत. पिकाला, झाडांना पाणी फक्त थोडंसं मुळांना लागतं. अख्ख्या जमिनीला नाही. झाडं-पिकं थोड्याच पाण्याच्या ओलाव्यावर जगतात, गुडघा गुडघा तुडुंब वाफे भरून, शेती भरून नाही. ही शेतीशास्त्राची गुरुकिल्ली सांगूनही आमचं अडाणीपण गेलेलं नाही. तुडुंब उसाची व केळीची शेती. हिनं एकूण पाण्याच्या अशा वापरानं ६० टक्के पाणी फक्त ७ टक्के बागायतीनं ओढून घेतलं. गलथान, चुकीच्या पाणी वापरानं, मग तेवढं एकरी उत्पादनही नाही. शेतीला पाणी तलाव, धरणातून, पाटचारीतून व ठिबक सिंचनानं दिलं तर पाणीसाठे दीर्घकाळ तसेच राहून पर्यावरण संतुलनाला उपयोग होईल. शेती तिप्पट, बागायती दुबारही वाढेल. प्रचंड उत्पादन वाढ आहे त्या पाण्यात होईल. स्व. अण्णासाहेब पवार, स्व. अण्णासाहेब शिंदे व त्यांच्या सोबत शेती, पाणी या क्षेत्रात काम करणाऱ्या अनेकांनी, आम्ही हे शासनाला सांगूनही फार उपयोग झाला नाही. ठिबक आलं तेही जादा किंमतींमुळे मर्यादित. निम्मी सबसिडी दिली, तीही वेळेवर नाही, म्हणून रखडपट्टी. भ्रष्टाचार. काही एकरांचीच मर्यादा.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये संस्थेनं आंबा प्रदर्शन, फलोद्यान चर्चा व त्याचं अर्थकारण यावर १९९२ मध्ये दीर्घ चर्चा केली होती. मुख्यमंत्री व अख्खं मंत्रिमंडळ होतं. महाराष्ट्रातले दोन हजार नामवंत शेतकरी. विशेष म्हणजे त्यावेळचे अर्थमंत्री मा. मनमोहनसिंगजी, कृषिमंत्री श्री. बलराम जाखड हे होते. मा. शरदराव पवार व स्व. अण्णासाहेब शिंदे यांनी सांगितल्यावरून ठिबक सिंचनासाठी केंद्रानं मोठं अनुदान राज्याला देऊन एकर मर्यादा नको असा मुद्दा घेऊन दोन्ही मंत्रीमहोदयांना मी पटवून दिलं. मग त्यांनी 'चौपन्न एकर सीलिंग मर्यादा तक क्यूं न हो दिया जायेगा' असं भाषण केलं. नंतर सबसिडी केंद्राची, राज्याची मिळालीसुद्धा. त्यात दर दोन वर्षांनी बदल, धरसोड व रक्कम कमी केलेली.

या सगळ्या चांगल्या योजनेचे निर्णय असूनही व्यवस्थापन व त्यात आपलेपणानं किमान पाणी, उत्पादन वाढीसाठी शासनाचं दुर्लक्षच झालं. उन्हाळ्यात ४५ डिग्रीमध्ये एक तासाच्या विहिरीच्या पाण्यावर मी दोन हजार झाडं जगविली, चांगलं उत्पादन केलं. ठिबक तंत्रज्ञानाच्या जगातले नवनवीन प्रयोग करून पाणी आणखीनच वाचविलं. चकित व्हावं इतकं.

एका मोसंबीच्या झाडाला आठवड्याला पंधराशे लिटर वाफ्यानं, तर ठिबकनं आठवड्याला फक्त तीनशे लीटर. हा पक्का हिशेब अनेकांनी समक्ष पाहिला. जाणत्या शेतकऱ्यांनी पाहिला. इस्रायलच्या शेतकऱ्यांनी व जॅम्स हार्डींचे अमेरिकेतले जॅकलँगा, लॅस्टनेर्हील व आजच्या गर्भश्रीमंत बाई श्रीमती किरण मुजुमदार यांनी माझ्या शेतीत दिवसभर थांबून पाहिला. रोज इस्रायल, इस्रायल करून आपण कोरडेच राहिलो व पाणी, पिण्याचं पाणी, शेतीचं पाणी यात नागडे होऊन बसलो. नव्या पाणी योजना, लहान तलाव, पाणलोट, जलसंधारण, वनश्री, झाडं, फळझाडं खूप झपाट्यानं व्हावीत. न थांबता. दहा वर्षे धडक कार्यक्रमानं व्हावीत; पण त्यासोबत पाणी उचलण्यासाठी कृषिमंत्र्यांनी ठिबकची नवी घोषणा केली म्हणून लिहिलं. या घोषणा नव्या नाहीत. पक्के परिपूर्ण निर्णय व अंमल हवा.

-o-o-

# ६. सुन्या माळरानी दिवे लावू या गा

श्री. जयंतराव पाटील यांनी कृषी सेवकाची साधना असं छान पुस्तक प्रकाशित केलं. एखाद्या क्षेत्रात थोडंबहुत बऱ्यापैकी काम केलं, तर त्याचा प्रचंड असा गाजावाजा करून सर्वत्र त्यासंबंधी लिहून येईल, सत्कार होतील, अशा जाणीवपूर्वक काही गोष्टी करणारी मंडळी फार झाली आणि कायम वर्षानुवर्षे त्या केलेल्या इवल्याशा किंवा थोड्या बऱ्या कामाविषयी बोलतच राहतात. तेच एक बिरुद मिरवून काही शासनाच्या व इतर जागांवर पदाधिकारी वगैरे होण्यासाठी धडपड करतात, असं आपण रोजच पाहतो. विंदा करंदीकरांची एक लहानशी छान कविता आहे. त्या कवितेची आठवण येते.

त्यानं समुद्र किनारी लघवी केली

आणि आयुष्यभर

हा समुद्र माझ्यामुळे निर्माण झाला

असं सांगत राहिला.

स्वातंत्र्यपूर्व काळात तर खूपच; परंतु आजही महाराष्ट्रात व देशात ठिकठिकाणी इतकी मोठी, विचारानं, कार्यानं, ज्ञानानं परिपूर्ण, समृद्ध अशी थोर माणसं आहेत. ते कार्य करीत गेले, कार्य करताहेत व त्यातूनच समाजाची शक्य ती जडणघडण, उभारणी करीत असताना कुठे फार शब्दही बोलत नाहीत. गाजावाजाही करीत नाहीत. शांतपणानं आहेत. स्वीकारलेलं आवडणारं राष्ट्रीय, सामाजिक काम ते अथक, रात्रंदिवस अतिशय आनंदानं करताहेत. अशी पन्नास-शंभर तरी लहान-मोठी माणसं, कार्याची साधना घेऊन स्वतःला त्यात गाडून घेणारी माणसं, देशाला काही नवीन प्रेरणास्रोत देणारी माणसं मी पाहिलेली आहेत. श्री जयंतराव पाटील हे त्यातलं एक नाव.

वडिलांच्या व महात्मा गांधींच्या विचारांचा, भेटीगाठींचा व कार्याचा खरा वारसा घेऊन ग्रामीण जीवनातली दु:खं, शेतीवाडी, त्याचं अर्थशास्त्र, पर्यावरण अशा अनेकविध गोष्टी आयुष्यभर सोबतीला घेऊन कार्य करताहेत. ठाणे जिल्ह्यातील कोसबाडचे श्री. जयंतराव पाटील कमी बोलणारे, हसतमुख, शांत वृत्तीचे व शेती, खेडी, समाजजीवनाविषयी खूप अभ्यास असून, त्यासंबंधी नितांत प्रेम व श्रद्धा असणारे मोठे कार्यकर्ते आहेत. देशातील राजकीय, सामाजिक, शेती व इतर क्षेत्रातल्या महनीय व्यक्तींसोबत आयुष्य घालवून वेगवेगळ्या पदांवर काम करूनही जमिनीवर चालणारे, संपूर्ण अहंकारी विचारांची झड झालेले गृहस्थ आहेत. दलित, पीडित, आदिवासी, अशिक्षित अशा खेड्यापाड्यातल्या माणसांना, मुलांना, स्त्रियांना बोर्डी कोसबाडमध्ये एकत्र आणून त्यांचे ऋणानुबंध व नाते बांधून शिक्षण वसतिगृह व संस्कार, प्रत्यक्ष शेती व समाजात काम करण्याचे संस्कार व शिक्षण असा मोठा कार्यक्रम श्री. जयंतरावांनी गेली पन्नास वर्षे चांगला चालविला. त्यातून त्यांना फार मोठं समाधान मिळालं. थेट खालच्या थरात वसलेल्या आदिवासींना नवा हुरूप आला.

स्वातंत्र्योत्तर काळात, विशेषत: अलीकडे, त्यांच्या या कार्यासमान कार्य करण्याची प्रेरणा अनेकांना झाली. राज्यकर्त्यांनीसुद्धा अशा आदिवासी, दलित, पीडितांसाठी विशेष चांगल्या योजना हाती घेतल्या. 'शेती' हा भारतीय जीवनाचा कणा आहे. पासष्ट टक्के लोकांचं, लहान कष्टकऱ्यांचं जीवन त्यावर अवलंबून आहे. हे मोडून पडले तर देश मोडून पडेल, खिळखिळा होईल. म्हणून लहान शेतीमधले प्रश्न, पीकपद्धती, त्यासाठीचं बियाणं, चांगली रोपं, कलमं, शेतीशास्त्राचा, नवा तंत्राचा अभ्यास, प्रत्यक्ष उभं राहून, त्या क्षेत्रातल्या अनेक जाणकारांना हाती घेऊन श्री. जयंतराव यांनी आयुष्यभर केलाय. स्व. वसंतराव नाईक, स्व. सुधाकरराव नाईक, स्व. यशवंतराव चव्हाण, श्री. शरदराव पवार यांसारख्या राज्यकर्त्यांना प्रत्यक्ष अनुभव, यश व नवी शेती यासंबंधी निर्णय घेण्यासाठी मदत केली.

देशाच्या नियोजन मंडळाच्या उच्चतम ठिकाणी सदस्य असताना पंतप्रधान श्री. नरसिंह राव, स्व. राजीव गांधी, पद्मभूषण श्री. स्वामीनाथन व त्यासारख्या कृषी तज्ज्ञ मंडळींना मीटिंग, चर्चा व जवळपास पंधरा-वीस प्रगत देशांमधले चढ-उतार व स्थिती दाखवून योग्य त्या निर्णयांची योजना करावी म्हणून योजना आयोगात देशात परिश्रमानं काम केलं. देशातले लहान शेतीचे राज्यागणिक वेगवेगळे प्रश्न व अन्नधान्य यासाठीच्या योजना व महाराष्ट्रात फलोद्यान, वनश्री, विशेषत: कडुनिंबासारखी पर्यावरण व औषधीयुक्त वनस्पती, यावर सर्वाधिक जोर देऊन त्यात

प्रत्यक्ष राज्यात दहा-बारा वर्षे मंडळांवर रहाून काम केलं. अर्थव्यवस्थेला बळ दिलं. जगातली शेती या त्यांच्या ग्रंथातील अनुभव व कृषी वैज्ञानिकाची साधना ही त्यांची दोन पुस्तकं वाचली, तरी एक माणूस शांतपणानं आयुष्यभर देशासाठी, राज्यासाठी, शेतीप्रधान देशाला, राज्यकर्त्यांना नवा आशय देण्यासाठी किती मोठं समाजकार्य करू शकतो, हे दिसून येईल.

एवढं प्रचंड काम करूनही कुठलाही अभिनिवेश व अहंकाराची झळ न लागू देता, आनंद भरून त्या यशाच्या उभारणीकडे पाहताहेत. अगदी निरामय शांत पद्धतीनं. खादी ग्रामोद्योग, रोजगार हमी, फलोद्यान, देशाच्या नियोजन मंडळातील खूप काही. ‘शासनकर्त्यां’साठी खूप काही व त्याशिवाय यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान व वसंतराव नाईक प्रतिष्ठान असो, आपलं समजून त्यात प्रत्यक्ष सहभाग देऊन श्री. जयंतराव देशाच्या, राज्याच्या चांगल्या जडणघडणीसाठी आजही बोलताहेत, लिहिताहेत. मात्र कधी-कधी सर्व क्षेत्रातलं नको ते प्रदूषण पाहून अस्वस्थही होत आहेत.

-०-०-

# ७. त्या अनाथांच्या उशाला दीप लावू झोपताना

संपन्न, चांगली शेती, ‘आणंद’ व त्यासारखे प्रचंड मोठे उद्योग, कारखानदारी. महात्मा गांधींचा गुजरात, नर्मदेच्या संथ पवित्र पाण्याचा गुजरात. अनेक वर्षांचं बोलावणं होतं. बडोद्याला जाणं झालं नाही. साहित्य अकादमी दिल्लीचा पुरस्कार मिळाल्यानंतर बृहन्महाराष्ट्रात सर्वत्र बोलावलं. मलाही जावंसं वाटलं. हैदराबाद, बंगलोर, दिल्ली, इंदोर, गोवा असं पुष्कळच झालं. बडोद्याला तीन दिवस काढून यावं म्हणून सांगण्यात आलं. मी मान्य केलं. बडोद्याला जायचं खूप दिवसाचं मनात असूनही राहिलं, याचं वाईट वाटायचं. सयाजीराव महाराज गायकवाड यांच्यासारखा अतिशय बुद्धिमान, कर्तबगार राजा. पुरोगामी विचारांचा व साहित्य, कलेविषयी खूपच खूप खरं प्रेम असलेला राजा. सगळं जवळून पाहायचं होतं. अभिरुची सारखं दर्जेदार मासिक, भाषाशास्त्रात ना. गो. कालेलकर, कविराज चंद्रशेखर, माधव आचवल, कवी दत्त, वि. द. घाटे, बालकवी काही काळ तिथे होते. आणखी अनेक साहित्यव्यवहार. कलासंस्कृतीचे रविवर्म्याचे तिथले दिवस, सुंदर आठवणी ऐकायच्या होत्या.

श्रीमती सुषमा करोगल आणि श्रीमती अरुणा जोशी व साहित्यिक कलावंतांनी बांधलेले कवितेचे कार्यक्रम भरगच्च झाले. मुलाखती झाल्या. चर्चा झाल्या. एकेकाच्या घरी छान रात्र रात्र साहित्य, कलेवर गप्पा. बहरून गेलेले दिवस. मोठा सत्कार व काव्यवाचन झालं, तेव्हा बडोद्यातले विविध क्षेत्रातले रसिक, कलावंत कित्येक वर्षांत एकत्र आलेले. बडोद्याचे राजे श्री. रणजितसिंह महाराज गायकवाड आलेले. आणखी सांगायचं म्हणजे माझी सीताफळं सुरत, बडोदा मार्वेâटलाच मोठ्या प्रमाणावर विकली जातात. त्यात रस असलेले शेतकरी - विक्रेते. ‘सीताफळा’विषयी कुतूहल असलेले बागायतदार शेतकरी असे अनेकविध क्षेत्रातले रसिक.

प्रा. गणेश देवी हे साहित्य, कला, भाषाशास्त्र यातलं मोठं नाव. साहित्यिक, रसिक, कलोपासक म्हणून परिचय होताच. त्यांची भेट आधी त्यांच्या केंद्रावर ठरली. ढोल सारखं दहा-बारा भाषांमध्ये निघणारं आदिवासी साहित्याचं, लोकसाहित्याचं

दर्जेदार मासिक मला मोहात टाकून होतंच. त्यासंबंधी खूप बोलणं झालं. एकूण बडोदा आणखी गुजरातमध्ये, नवं काय लिहिलं जातंय, मराठीत अलीकडलं नवं, लेखक, पुस्तकं, चळवळी सगळे काही चर्चेत आलं. राहिलं ते नंतरच्या प्रवासात जाता-येताना पूर्ण केलं. मला श्री. गणेश देवी यांच्यासंबंधी आणखीनच प्रेम वाढलं व आदर वाटला तो यासाठी की, बडोद्यापासून नव्वद किलोमीटरच्या अंतरावर तेजगडच्या आजच्या व उद्याच्या जगात आदिवासींना ताठ मानेने उभे राहता यावे, यासाठी स्नातकोत्तर प्रशिक्षणासाठी, आदिवासीसंदर्भात विशेष संशोधनासाठी त्या परिसरात त्यांनी हाती घेतलेलं काम.

तेजगड, ता. छोटा उदेपूर, जि. बडोदा. आदिवासी प्रदेश. वरच्या बाजूला लगतच राजस्थान व मध्यप्रदेशाचा परिसर. नद्या, निसर्ग, लोकजीवन अशी सरमिसळ. त्या ठिकाणी आदिवासी स्त्री-पुरुषांमध्ये त्यांनी हाती घेतलेलं काम, त्यांना उभं करण्याचं, त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करणारं, विशेषत: शिक्षणाचं. लहान लहान शाळा, पुढचं शिक्षण त्याच परिसरात खेड्यांमध्ये उभं केलं. त्यांच्यातलीच मुलं-मुली शिकली. बी.ए., बी.कॉम., एम.ए.एम.एस्सी. आणखी डिग्री घेऊन कुठेच न जाता त्यांच्याच बांधवांसाठी शिक्षणाचं व संस्कारांचं काम करणारी मी पाहिली. परिचय करून देताना ही मुलगी एम.ए.संस्कृत, हा मुलगा इंग्रजी एम.ए., ऐंशी टक्के मार्क्स. मी थक्क झालो. त्यांच्याशी बोलत राहिलो. त्यांचे जीवन, अंधश्रद्धा, नवेपण, परिवर्तन, भाषा, संस्कृती सगळं काही. त्या दिवशी राखीपौर्णिमा होती. अनेक मुलींनी, बायकांनी आदिवासी गाणी म्हणत म्हणत माझ्या मनगटावर मोठ्या प्रमाणावर राख्या बांधल्या. आनंददायी ओझं व्हावं, इतका हात राख्यांनी भरून गेला. तिथल्या झोपडीमध्ये आम्ही गरम भजी मिरचीसोबत खाल्ली. मजा आली.

श्री. गणेश देवी व कार्यकर्ते मित्र-मैत्रिणींनी मग नवी शेती, झाडं दाखविली. तिथं नवं बांधकाम सुरू झालेलं होतं. पलीकडे जवळच छान घनगंभीर डोंगर, त्यात लेणी, गुहा, प्रचंड झाडी. एक झरा वाहता पाहून, त्यात दगड टाकलेले होते. दहा फूट पाणी मागे केलं! ‘पाणी अडवा-जिरवा’ तिथे सुरू केलं. कमी खर्चात सहज साधं पाणी अडवणं. छान झरा, झऱ्यातलं नितळ पाणी. त्याचे आम्ही नकाशे तयार केले आणि पाणी व झाडी यासाठी तसंच फळझाडांसाठी नवे निर्णय घेतले. अकराशे एकर जमीन झाडं-फळझाडांनी उभी राहते आहे. शिक्षणासोबत समाजसेवा, पर्यावरण व पैसा असं मोठं काम संस्थेनं हाती घेतलंय. हे फार महत्त्वाचं, मोलाचं आहे. गेल्या वर्षी अकराशे एकरांसाठी सीताफळ रोपं मला सांगितली. मी पाचशे एकरांची तयार केलीसुद्धा. वाईट याचं वाटतं, मला प्रत्यक्ष तिथे जाऊन लावायची

होती व पुन्हा पाणलोट व झाडं-फळझाडांची पुनर्बांधणी करायची. होती; परंतु कौटुंबिक प्रश्न, आजारपणं, आणखी खूप अडचणींनी मी गेलो नाही. नक्कीच पुन्हा अनेकदा जाणार. त्यांचं काम अथक चाललेलंच आहे. श्री. गणेश देवींसारखं प्राध्यापकी सोडून सेवाभावी कोणी काही करील काय?

-०-०-

# ८. तो पुन्हा ऋतुगंध देऊ या भुईला

महाराष्ट्रातल्या, भारतातल्या त्या त्या ठिकाणच्या शेती व्यवसायाला, तिथल्या शेतीच्या प्रश्नांना अथक परिश्रमानं, असामान्या बुद्धिमत्तेनं दीर्घकाळ त्यात बुडून जाऊन उभं केलं असेल, तर त्या त्या ठिकाणच्या प्रगत अशा शेतकरी समाजानं. शासनाचा, शासनातल्या संशोधनाचा आधार आहेच; परंतु जिथे शासन थांबलं, काही मर्यादा आल्या, मंदगतीनं संशोधन चाललं, तेव्हा बलदंड शेतकरी शेतीप्रश्नांना, समस्यांना सामोरा जाऊन उभा ठाकला. नवा स्वर्ग शेतीवाडीत उभा केला. अर्थव्यवस्थेला चालना दिली. महाराष्ट्रातली अशी लहान-मोठी प्रगतिशील, हुन्नरी शेतकऱ्यांची हजारापेक्षा अधिक नावं माझ्यासमोर आहेत. त्यांच्या शेतीत जाऊन दोन-तीन तपांची तपश्चर्या, पडझड, उभं राहून पुन्हा दिमाखानं नांदणं, शेतीचं आनंदगान गाताना मी प्रत्यक्ष पाहिलेलं आहे.

दोन हजार दोनच्या पहिल तीन महिन्यात मी, माझे शेतकरी मित्र श्री. सोपान कांचन, माझा मुलगा बाळ व काही प्रगतिशील शेतकरी असे आठ-दहाजण पुणे, सातारा, कऱ्हाड, सांगली, सोलापूर या जिल्ह्यांतल्या चांगल्या शेतीची पाहणी करण्यासाठी आठ-दहा दिवस फिरत होतो. प्रत्येक ठिकाणची शेती, पिकं, बागायती पद्धती वेगळी. पाण्यासाठीची प्रचंड अशी धडपड, सगळे शेतीतले त्यांचे सगळे परिश्रम व त्यातून उभा राहिलेला न मोडणारा शेतकरी पाहून आम्ही चकित झालो. तसे माहीत होतेच; पण प्रत्यक्ष धडपड, पाण्याचे लहान-लहान, मोठे-मोठे खंदक खोदून प्लॅस्टिक पेपरनं पाणी भरून ते आठमाही, चारमाही राखून ठेवण्याचा प्रयत्न करून थेंबाथेंबाचा अमृताचा विचार करून बागा जगवणारे शेतकरी. दोनशे फूट विहीर खोदल्यावर आडवी, झऱ्यांच्या बाजूनं आत बोगद्यासारखी कंदिल, दिवे लावून खोदलेली विहीर, त्यातला पाकोटीचा विश्वास घेऊन दगड फोडीत वेडं होऊन जगणं, थेंब थेंब पाण्यासाठी, फळझाडं, द्राक्षं, ऊस व कोरकीच्या पिकांसाठी.

शेवटी एक दिवस उरला होता. आदल्या रात्री सोलापूर-पुणे रोडवर तेलंगवाडीला श्री. विश्वासराव कचरे यांच्या शेतावर मुक्कामाला थांबलो. सकाळी

उठून त्यांची रेताड, भंगार जमिनीवरली सव्वाशे एकरांची डाळिंबाची बाग पाहिली. दहा किलोमीटरवरून पाणी आणलेलं. प्रचंड धडपड, पैसा, त्यापेक्षाही अडथळ्यांची शर्यंत शासनाकडून व अनेक मंडळींकडून. 'डाळिंबीची डहाळीशी नको वाऱ्यावर झुलू' अशी कविवर्य बा. भ. बोरकरांची कविता ओठांवर आली. योजनाबद्ध शेती, खतं, पाणी, ठिबक, कचरा या सगळ्यांचे मार्वेâटिंग, विक्री. जगभरचं, भारतातलं नजरेसमोर ठेवून केलेला चोख व्यवहार. 'अर्थपूर्ण' शेती. डोळे भरून आले. शून्यातून, दोन एकरांवरून पती-पत्नीनं स्वत: अतोनात कष्ट करून उभा राहिलेला मळा. दहा-वीस वर्षांची अथक तपश्चर्या, साधना. न डगमगणं. दोन तासांनी अकस्मात तिथे 'कष्टाची भाकर' या कचरेंच्या शेतावर आम्ही आहोत, असा पत्ता काढून अनगळच्या साखर कारखान्यावर निघालेले ना. श्री. शरदराव पवार आमच्या जवळ शेतावर थांबले. धक्का दिला. 'कष्टाची भाकर', त्यासाठी सव्वाशे एकर उभा करताना भोगलेले भोग व यातना अतिशय आनंदानं श्री. विश्वासराव यांनी श्री. शरदराव पवार व आम्हाला सांगितल्या. विशेषत: दर्जेदार माल, त्याची विक्री, ती ठिकाणं, त्यासोबतच मजुरांसाठी केलेली घरं, त्यांचा सांभाळ, त्यांना दिला जाणारा दाम. श्री. शरदराव यांना पाहिजे होते ते सगळे प्रश्न मोकळे झाले. श्री. शरदराव यांच्या चेहऱ्यावर कित्येक वर्षांत शेती पाहून झालेला भरभरून सुखावणारा आनंद मी पाहिला. इतक्या कष्टानं शेती करणारे, न थकणारे व राष्ट्रीय उत्पादन, पर्यावरण यांचा तोल सांभाळणारे शेतकरी, शेतकरी असलेल्या शरदराव यांना न राहवून ते खूप खूप बोलत राहिले. छानपैकी आम्हाला अन् बाळला घेऊन जाऊन पुन्हा बारामती व तिथून पुणे मुक्कामी रात्री सोडले. दिवसभर शेती, फळबाग, व पाणी एवढंच.

स्व. अण्णासाहेब पवार यांच्या आयुष्यभरच्या शेतीप्रेमापोटी, त्यांनी दिलेल्या योगदानासाठी आम्ही 'जैन चॅरिटीज'नं एक लाख रुपयांचा गौरव पुरस्कार सुरू केलेला होता. जैन उद्योगाचे श्री. भवरलालभाऊ व आम्ही निरीक्षकांनी अहवाल दिला. श्री. विश्वासराव कचरे यांना हा गौरव पुरस्कार मुख्यमंत्र्यांच्या हस्ते, श्री. शरदराव यांच्या प्रमुख उपस्थितीत, दहा हजार शेतकऱ्यांसमोर जळगावला दिला. श्री. विश्वासराव कचरे भरभरून बोलले, कथा सांगितली. त्यांच्या डोळ्यांत यशाचं, दु:खाच्या आठवणीचं पाणी होतं. दहा हजार शेतकऱ्यांमध्ये चैतन्य पसरलं.

तेलंगवाडीच्या त्यांच्या 'कष्टाची भाकर' या ठिकाणी नवं घर बांधलं. प्रशस्त. अतिशय सुंदर. स्वत:साठी, मित्रांसाठी, शेतकऱ्यांसाठी, मजुरांसाठी. चार फुलं ठेवून या घराचा दरवाजा उघडायचा यासाठी श्री. शरदराव पवार पाहिजेतच. काहीही कार्यक्रम नाही.

उत्सव नाही. भाषणं नाही. मला गळ घातली. मी श्री. शरदराव पवारांना विनंती केली. त्यांनी मान्य केलं. सकाळी दहा ते दुपारी तीन ‘कष्टाची भाकर’ या ठिकाणी थांबले. उंबऱ्यावर चार फुलांच्या पाकळ्या टाकून दिवा लावला. दिव्याच्या मंद प्रकाशानं घर उजळलं. न बोलवताही दुपारपर्यंत हजार प्रगतिशील शेतकरी जमा झाले होते. त्यांच्याशी शेतीच्या गप्पा झाल्या. प्रत्येकाच्या मनात नवी दिवेलागण.

-०-०-

# ९. मी मरवठ भरला लाल मातिचा भाळी

ना. श्री. शरदराव पवार कृषिमंत्री झाले, म्हणून महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांच्या वतीनं स्वागत. मन:पूर्वक. परंतु त्यांच्याजवळ जादूची कांडी नाही. शेतकऱ्यांनी जागतेपणी परिश्रम करून एकरी उत्पादन वाढविणं हेच त्यांचं स्वागत.

अलीकडं सगळ्याच क्षेत्रात चांगले दिवस, चांगले निर्णय, चांगल्या जागी चांगली माणसं असं क्वचितच कुठे असतं. चांगलं कुठं काही घडलं, तर तो दीर्घकाळ आनंदीआनंद असतो. नव्या आशा-अपेक्षा पल्लवित होतात. मे २००४ मध्ये निवडणुका होऊन भारतभर मोठं परिवर्तन झालं. श्री. मनमोहनसिंहजी पंतप्रधान झाले. त्या मंत्रिमंडळात श्री. शरदराव पवार कृषिमंत्री आहेत. आपण म्हणाल त्यात काय विशेष आहे? कृषिमंत्री पद हे काही सर्वोच्च श्रेष्ठ मंत्रीपद नाही वगैरे. अस्सल शेतकरी वर्ग व त्या भोवती असलेला वर्ग यांनाच हे नीटपणानं कळू शकतं. अधिक तीव्रतेनं जाणवू शकतं. 'महाराष्ट्राची शेती ही शंभर तोंडांच्या राक्षसाशी युद्ध खेळत राहण्याची शेती आहे,' असं स्व. यशवंतराव चव्हाण यांनी लिहून ठेवलंय.

आज तर त्यापेक्षाही शेतीची, कोरडवाहू अठ्ठ्याऐंशी टक्के शेतीची, ऊस, द्राक्ष यांसारख्या नगदी पिकांची पाऊस पाणी, धरण पाट कोलमडून पडल्यानं खूपच परवड झालेली आहे. शेतीचे बी-बियाणे, खते, लागणारा खर्च प्रचंड वाढलेला व अनिश्चित पाऊस व मिळणारा दाम अल्प असल्यानं शेतकरी मोडून पडलाय. आत्महत्या किती झाल्या त्यापेक्षाही आत्महत्येपूर्वीच्या कळा शेतकरी भोगतो आहे.

महाराष्ट्रात, देशात दुष्काळ व पाण्याचे प्रश्न बिकट झालेले. उद्या शंभर-सव्वाशे कोटी जनतेच्या पोटाचा प्रश्न, देशाचा मुख्य अर्थव्यवस्थेचा प्रश्न, कणा शेती हाच असल्यानं सगळा देश चिंताक्रांत आहे. अशा अवस्थेत कष्टकरी, सामान्य शेतकऱ्यांपासून, तर शेती माल विक्री प्रक्रिया व जागतिकीकरण यांचा सांधा,

समन्वय जोपासणारा, हे प्रश्न थेट माहीत आहेत व त्यावर बेधडकपणानं ठासून निर्णय घेऊन देशात शेतीचं आमूलाग्र परिवर्तन करणारा कृषिमंत्री हवा होता.

आज श्री. शरदराव पवार यांच्या नावानं हे झालेलं आहे. देशाच्या प्रत्येक राज्यातले शेतीचे, पिकांचे, कष्टकरी, दु:खी माणसांचे, त्यापेक्षाही नदीनाले भूगोल माहीत असलेले श्री. शरदराव पवार महाराष्ट्रात कुठल्याही तालुक्यातील, काही गावातील नव्या-जुन्या घडामोडी नावासकट, त्यांच्या चांगल्या कार्यासकट शेतकरी माहीत असलेले, त्यांच्याशी थेट जवळीक साधून असतात.

कृषितज्ज्ञ, संशोधक, कृषि संशोधन कार्यशाळा यासोबतच जाणकार प्रतिभावंत, जाणत्या शेतकऱ्यांशीही चर्चा करून निर्णय घेत असतात. स्वत:ला सगळं माहीत असूनही सगळ्यांशी चर्चा करून चांगले निर्णय घेतात. त्यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या (चार वेळा) काळात व स्वत: कृषिमंत्री असताना शेती व्यवसायाला दिशा देणारे अतिशय पुरोगामी निर्णय घेतले. रात्रंदिवस शेतीमध्ये भरकटत राहिले.

शेती हा शरदरावांचा ध्यास आहे, श्वास आहे. हजार गोष्टींमध्ये त्यांना रस आहे, खूप त्यातलं ज्ञान आहे, आकर्षण आहे; परंतु सगळ्यात जास्त प्राणपणानं आनंद वाटावा असं फक्त शेतीचं उभं राहणं. त्यात नवनिर्मिती करून शेतकरी, देश उभा करणं. किमान आठमाही पाणी, त्यावर पिकं, फळझाडं करून चांगलं एकरी उत्पन्न वाढवणं. श्री. शरदराव पवार व माझा १९७२-७५ पासून चांगला घनिष्ठ संबंध आहे, अतिशय जवळीक आहे, ती साहित्यापेक्षाही शेतीच्या समान आकर्षणामुळे.

श्री. शरदराव पवार, यशवंतराव चव्हाण, वसंतरावदादा पाटील, वसंतराव नाईक यांच्यासोबत मंत्रिमंडळात व सर्वत्र कार्य करताना वाढले. आज जगभरचं शेती व अर्थकारण, देशातले अनेकविध प्रश्न धुंडताना, शरदराव कितीतरी योजने पार त्यात बुडून गेलेले व संपन्न अशा घट्ट अनुभवांनी परिपक्व झालेले आहेत.

प्रश्न समजून घेण्याची तयारी, त्यासाठीचं सगळं ज्ञान आत्मसात करण्याची तयारी व आपला-परका, कुठल्या पक्षाचा, देश-विदेश असं न मानता त्याच्याजवळ त्यासाठी जायची तयारी त्यांच्या ठिकाणी आहे. अशा वेळी त्यांच्या अहंकाराचे कुठलेही पंख पार छाटून टाकलेले असतात. मी हे बारा वर्षे त्यांच्यासोबत विधान परिषदेत काम करताना पाहिलं, त्यापेक्षाही तीस वर्षे जवळून त्यांच्यासोबत या शेतीवाडीसाठी धडपडताना पाहिलं.

देशभर फिरलो. त्यांच्यासोबत अमेरिका, इंग्लंड, मॉरिशस, इस्रायल, इजिप्त इथे मुख्यत: साहित्य, कविता यासाठी गेलो होतो, तरीही सगळ्यात त्या देशात जास्त वेळ दिला, तो शेतीप्रश्नांसाठी. तिथल्या-इथल्या शेतीशास्त्राची, नव्या तंत्रज्ञानाची, तिथल्या अर्थव्यवस्थेशी देश जोडून घेण्याच्या त्यांच्यातल्या अस्वस्थ; पण उमेदीनं काम करणाऱ्या चिवट माणसाशी माझं नातं जडलं.

अठरा तास जागरूकपणानं न थकता काम करणारा माणूस. जगभरच्या देशातल्या प्रत्येक नव्या चांगल्या गोष्टींशी घट्ट सांधा बांधून देशासाठी, राज्यासाठी किती वापरता येईल, यासाठी अपार कष्ट घेणारा माणूस. मित्र, आणखी जिव्हाळ्याच्या माणसांसाठी निर्मळपणानं सगळं काही देणारा माणूस. चांगल्या कामासाठी वितुष्ट, मतभेद एका क्षणात गाडून टाकून पुन्हा वेटाळून घेणारा माणूस. श्री. शरदराव पवार यांची अनेक रूपं पाहिली, ती इथे देण्याची ही जागा नाही.

पुलोदमध्ये मुख्यमंत्री म्हणून घेतलेले निर्णय आजही शेतकरी विसरलेले नाहीत. मोठी-लहान धरणं, पाणी म्हणजे पाणी, थेट ठिबकपर्यंत तंत्रज्ञान. पडीक जमिनीचं रूपांतर, पाणलोट, जलसंधारण, वनश्री, फळझाडांचा मोठा पुरोगामी निर्णय राज्याला, देशाला, अर्थव्यवस्थेला, पर्यावरणाला, मोलमजुरीला संपन्न करणारा.

श्री. ए.बी. बर्धन, एस.एम.जोशी, अहिल्या रांगणेकर, मृणाल गोरे, कर्पुरी ठाकूर, एन. डी. पाटील, गणपतराव देशमुख, देवीलाल, जॉर्ज फर्नांडिस, यशवंतराव चव्हाण, बाबा आढाव व नानासाहेब गोरे यांसारख्या पुरोगामी विचारांच्या अनुभवी मंडळींना घेऊन ६ डिसेंबर १९८० ला शेतकरी दिंडी काढली होती.

लाखो लोक रोज शेतीच्या प्रश्नावर सभेला यायचे. नंतर दोन महिन्यांनी या देशभराच्या लोकांनी, पुढारी शेतकऱ्यांनी दिल्लीला दहा लाख शेतकऱ्यांची मोठी परिषद, रॅली घेतली. त्याचे अध्यक्ष शरदराव पवार होते. दिल्लीत सगळ्यांच्या भाषणात होतं—

‘अरे भाई, ये मरगठ्ठा शरद पोवार खेतीबाडी बहोत खूब जानता है ।

असली जानता है ।

ये अपने देश का नक्षा बदल देगा ।

शरद पोवार को कृषिमंत्री बनाओ । कृषीवाला ये देस संपन्न हो जाएगा ।’ त्या वाक्याची आज पूर्तता झाली.

-o-o-

# १०. चिरगुटे बांधून न ये गर्भारपण

‘शेतीतून मिळणारा लाभ हा अत्यंत पवित्र आणि न्यायपूर्ण असा लाभ असतो.’ असं थोरो म्हणतो; पण हे तत्त्वज्ञान सांगणाऱ्या आपल्यासारख्याला लोक हसतात. शेतकऱ्यांमध्ये कमालीची निराशा व मरगळ आलेली आहे. शेतकरी समाज हा शेतीपासून आणखी आणखी दूर चाललेला आहे. एकूण शेतीचं, शेतकऱ्याचं चित्र अतिशय चिंताजनक आहे आणि आपल्यासारख्या शेतीप्रधान देशाला हे परवडणारं नाही...

पंचवीस एकर कोरडवाहू जमीन असणारा शेतकरी गेल्या काही वर्षांत आर्थिक दुर्बलतेनं खचून गेला आहे. त्यातली पाच एकर जमीन एक लाख रुपयाला विकून सुशिक्षित, बुद्धिमान, बेरोजगार मुलाला कुठल्यातरी संस्थेत नोकरीत चिकटवून देण्यासाठी तो नको तेवढ्या लाचारीत हात जोडून उभा आहे. पाच एकर ऊस, केळी असलेला शेतकरीसुद्धा प्रचंड शेतीखर्च वाढल्यानं, त्यामानानं किमतीची, भावाची निश्चितता नसल्यानं, दरवर्षीचे पावसाळे लहरी होत चालल्यानं मोडून पडलेला आहे. कुटुंबाचा एकूणच व्यवहार, शेतीचा व्यवहार निव्वळ शेतीवर चालविणं फारच कठीण झालेलं आहे. कोरडीची शेती पेरणी करूनही नफ्याची नाही. पडीक जमिनीची संख्या वाढते आहे. बागायती, ती कोणतीही असो, अनिश्चितता वेढल्यानं डबघाईत आहे. कर्जाच्या प्रचंड थकबाकीच्या डोहातून-काळ्या गर्तेतून वर येण्यासाठी श्रीमंत, जादा पैसेवाल्यांना, इतर उद्योगधंद्यातील अनुपस्थित शेतकऱ्यांना विक्री व्यवहार करणे चाललेले आहेत कंपन्यांकडे शेती विक्री व लांब पल्ल्याची गहाण टाकून खरा शेतकरी रित्या आभाळाकडे व उद्ध्वस्त होत चाललेल्या आयुष्याकडे शून्य नजरेनं पाहतो आहे.

निश्चित पाणी असलेली थोडीबहुत शेती व शेतकरी तेवढी तग धरून आहे. उद्या वाढत्या कुटुंबाचे, वाढत्या श्रीमंत, भ्रष्टाचारी शिक्षण पद्धतीचे, महाग लग्नकार्याचे सावट त्याच्यावर कुरघोडी करणारच आहे. खूप सांगता येईल, अशी ही कथा. शेतकऱ्यांच्याही शेती करण्यात मोठ्या चुका आहेत; पण यात राष्ट्रीय शेती धोरणाच्या अधिक आहेत. आळशी, नियोजनशून्य शेतकरी या दशेला जबाबदार आहे, तेवढंच

किंबहुना अधिक शेतीचं पाणी, उत्पादन, विक्री व्यवस्था याचं नेमकं भान न ठेवणारं शासन. जगातल्या कुठल्याही देशापेक्षा उत्तम जमीन, अतिशय चांगला पाऊस, निसर्ग संपत्ती व सूर्यप्रकाश असूनही शेतीची अशी परवड व्हायला नको.

गेल्या दहा-वीस वर्षांमधली स्थिती पाहता त्यासाठीचे उपाय व पक्क्या, भरवशाच्या योजना आखता येतील अशी देशाची, राज्याची व व्यक्तिगत पातळीवर शेतकऱ्याची, 'नीती'/धोरण विचारपूर्वक आखणं आवश्यक आहे. वरवरची मलमपट्टी करून शेती व्यवसायाचा विचार करण्याचे दिवस आता संपलेले आहेत.

'शोमनशिप ट्रिक्स' करून भाषणं करणं, मोठी वाक्ये टाकून 'शेतकरी राजा व राज्य शेतकऱ्याचं आहे व त्यासाठी आम्ही प्राणपणानं सगळं काही करणार', अशी फेकाफेक आता बंद झाली पाहिजे. शेतकऱ्यांच्या पोटाला भाकरी बांधू नका, त्याच्या पोटात चतकोर-अर्धी भाकरी कशी घालता येईल, असं प्रत्यक्षात चांगल्या योजनांमधून झालं पाहिजे. शेतकऱ्यांसाठी दिल्लीहून व राज्या राज्यातल्या राज्यकर्त्यांकडून किती भरभक्कम योजनांची उतरंड मांडली जाते. त्यातली दोन-पाच मडकी जरी भरलेली पदरात पडली, तरी शेतकरी 'शेतकरी' म्हणून जगू शकेल. खेडी, शेतकरी समाज देशात मोठा असूनही हे होऊ शकत नाही. त्याची मतं मोठ्या प्रमाणावर घेऊनही हे होऊ शकत नाही, याचं दु:ख आहे.

तुकारामानं थोडं वेगळं; पण फार चांगलं असं त्यांच्या कवितेतून स्पष्टपणानं मांडलेलं आहे. ''चिरगुटं बांधून गर्भारपण सांगणं किंवा दाखविणं खोटं. मुळातच गर्भारपण आलं पाहिजे.' म्हणून सोंगं आता पुष्कळ झाली, हद्द झाली, असं शेतकरी समाजाचं मत झालं. त्याचा स्फोट होतोच आहे; परंतु तो फार मोठ्या प्रमाणावर होण्यापूर्वीच शेतीचा, शेतकऱ्यांचा, त्यांच्या शेतीतल्या पाण्याचा व नव्या जगभराच्या तंत्रशास्त्राचा लाभ त्याच्या पदरात पाडण्याची निश्चित अशी दूरगामी आखणी झाली पाहिजे. केंद्र शासनाच्या राष्ट्रीय पाणी नियोजनाच्या निर्णयाला तीस वर्षे झाली. महाराष्ट्रात १९६२ ला वर्दे आयोगाची स्थापना झाली. २५ मार्च १९८७ला घोषणा होऊनही तसा अंमल व धोरण नाही. थेट २०००च्या माधवराव चितळे आयोगाची तीच गत झाली.

मोठ्या धरण-योजना कालबाह्य व जलसंधारणाची निश्चित कार्यक्षमता का नाही? कुठं पंजाब-हरियाणात बारमाही पाणी व तिथली संपन्न शेती व कुठे भारतातल्या महाराष्ट्र, आंध्र, कर्नाटकातील दुष्काळी वर्षांनी पाठोपाठ येणारी, उद्ध्वस्त करणारी शेती.

दुष्काळी राज्ये, महाराष्ट्र व त्यासारखी राज्ये, किमान आठमाही पाण्याची का होईना शेतीसाठीच्या दूरदर्शी योजना हव्यात. कालबद्ध. मोठ्या, मध्यम नद्यांचं पाणी अडवणं, जलसंधारण, फलोद्यान, वनश्री करून, राज्याच्या नियोजनाचा मोठा हिस्सा, पैसा पाच-सात वर्षे अग्रक्रमानं पाण्यासाठी टाकून यासाठी धडपड करणार असतील, तरच राज्य 'जिवंत' राहू शकेल. पाणी थोडंबहुत आठमाहीसाठी निर्माण करून द्या.

मातीतून सोनं निर्माण करणारी, प्रतिसृष्टी निर्माण करणारी शेतकरी समाजाची माणसं इथं आहेत. त्यांच्यासाठी किमान पाणी, नवसंशोधन, दुष्काळी स्थितीत तग धरणारं रोगप्रतिकारक शुद्ध बियाणं, रोप तंत्रशास्त्र इत्यादी एकदा उपलब्ध करून द्या. राज्य क्रमांक एकवर येईल. खेडी, शेतकरी, मजूर तिथेच थांबून संसाराचं आनंदगान गात राहतील. हा देश पुन्हा उभा राहील. देशाचं अर्थशास्त्र बदलेल. दृढ होईल. प्रचंड वाढलेली लोकसंख्या व त्यातून निर्माण झालेले हजारो प्रश्न, शहरी प्रश्न, राज्यकर्त्यांना पछाडून टाकताहेत. सगळी खेडी, माणसं शहराकडे निघालेली आहेत. तिथे ती मावू शकत नाहीत. माणसं म्हणून जगू शकत नाहीत. पहिल्यांदा केंद्र शासनाचं पाण्याचं धोरण व त्यासाठीचा जादा पैसा मिळाला पाहिजे. नुसतं पंतप्रधानांनी 'जलसंधारण' आता राष्ट्रीय कार्यक्रम घोषित करून चालणार नाही.

पैसा व प्रत्यक्ष दीर्घकालीन न मोडणाऱ्या योजना द्याव्यात. तसंच मुख्यमंत्री, प्रत्येक नवा मुख्यमंत्री, खातं न आवडणारे कृषी जलसंधारण मंत्री यांनी लहान लहान दीर्घकालीन योजनांसाठीचा पैसा व काम केलंच पाहिजे. ही अधिकाऱ्यांना व लोकप्रतिनिधींना तंबी देऊन कडक पद्धतीत करावं. नुसती भाषणं ऐकून पोटात काहीच पडणार नाही आणि हे सहज नाही... पण शक्य आहे. मुख्य ठिकाणी देशात व राज्यात शेतकऱ्याचं काळीज असणारी व दु:ख जाणणारी मंडळी असावी. मुख्यत: तसं धोरण असावं. राज्य व शेतकरी मोडकळीस येणार नाही हे पक्कं.

-o-o-

# ११. रहिमन पानी राखिये, बिन पानी सब सून

पंतप्रधान अटलबिहारीजी तीन महिन्यांपूर्वी चीनला जाण्यापूर्वी बोलले ते ठळकपणानं सर्वत्र छापून आलं. 'देशात बारा राज्यांमध्ये दुष्काळ आहे व त्याशिवायच्या राज्यांमध्येसुद्धा पिण्याचं पाणी, एकूण पाणी, शेती खूपच विकलांग झालेली आहे. नद्यांचं पाणी जोडणार आहोतच; परंतु ताबडतोबीनं यासाठी 'पाणलोट क्षेत्र विकास' जलसंधारण हा एकमेव कार्यक्रम देशातल्या या प्रश्नांना व दुष्काळाला सावरणारा आहे. जलसंधारण पाणलोट हा राष्ट्रीय कार्यक्रम म्हणून मी घोषित करतो. त्यासाठी खूप काही युद्धपातळीवर करावं इ.' आम्ही पंतप्रधानजींचं मन:पूर्वक अभिनंदन केलं.

इतक्या उशिरा का होईना देशातल्या दुष्काळी राज्यांचा प्रश्न त्यांना प्रकर्षानं जाणवला. चार सप्टेंबरला आंध्रचे मुख्यमंत्री, धाडसी तडफदार व निर्णय घेण्यास अतिशय सक्षम असलेले, नवी दृष्टी असलेले चंद्राबाबू नायडू जळगावला जैन उद्योग समूहाची पाहणी करण्यासाठी आले होते. तेथील पाणी, पाणी वापराचं सूक्ष्म सिंचन तंत्रज्ञान, त्याचा वापर, टिश्यूकल्चर, उत्पादन वाढीचं नवं शास्त्र, पाणलोट क्षेत्रविकास, फळझाडं, झाडं प्रक्रिया सगळं पाहून ते प्रभावित झाले व प्रसार माध्यमांशी बोलताना "हेच राज्याराज्यात व्हावं, हेच देशाला उभं करणारं बलस्थान आहे. मी माझ्या प्रदेशात प्रत्यक्ष प्रात्यक्षिक व मॉडेल करणार. शिवाय ऑक्टोबरमध्ये भारताच्या टास्क फोर्सच्या अध्यक्षपदी असल्यानं देशभरासाठी पुरोगामी निर्णय घेऊन पैशांची उपलब्धता, पाणी वापराच्या तंत्रज्ञानासाठी, ठिबकसाठी करणार. हीच देशाची, राज्याराज्यांची खरी व अग्रक्रमाची गरज आहे. म्हणूनच 'यशोगाथा' धुंडत मी फिरतो आहे," असे ते म्हणाले.

मी सकाळी त्यांच्या स्वागताला होतो. शिवाय निरोप देताना होतो. यावेळीही मला खूप खूप आनंद झाला. मी सुखावून गेलो. त्यांचं गेल्या वर्षी बारामतीला व आता इथे दुसऱ्यांदा अभिनंदन केलं. अतिशय कार्यक्षम, समज असलेला व हातात सत्ता असलेला, मतं असलेला नेता केंद्राला भाग पाडू शकतो, असा आजवरचा अनुभव

आहे. इतर लोक ममतेनं केंद्राला नमवतात, मायेनं नमवतात... ते ठीक आहे. चंद्राबाबूंनी शेतकऱ्यांसाठी व त्यावर आधारित खेड्यांसाठी, मजुरांसाठी, अर्थसत्ता निर्माण करण्यासाठी नमवावं, दीर्घकालीन व कायमचं धोरण करून पदरात घ्यावं, एवढंच. प्रचंड वाढणारी व देशाला मोडून काढणारी लोकसंख्या, लोकांच्या सगळ्याच गरजा, नष्ट होत चाललेलं पाऊस-पाणी... शेतीबाडी यासाठी राज्यात, केंद्रात अनेक चांगले निर्णय झाले. ते तोकडे ठरताहेत. मोठाल्या चर्चा झाल्या. आंदोलनं, मोर्चे, शेती-पाणी यासाठी खूप खूप झाले. माजी पंतप्रधान नरसिंह राव, राजीव गांधी, चंद्रशेखर, देवेगौडा व विद्यमान अटलजी यांसारख्या पंतप्रधानांना राज्या-राज्यातल्या स्थितीचं त्या त्या वेळचं सविस्तर रूप (कुरूप) प्रत्यक्ष दाखविलं गेलं. भारतरत्न सी. सुब्रमण्यम, डॉ. स्वामीनाथन, शरदराव पवार, स्व. अण्णासाहेब शिंदे, माधवराव चितळे, एन.डी. पाटील, धारियाजी, जयंतराव पाटील (कोसबाड) यांसारख्या जाणत्या सक्रिय तज्ज्ञांनी मनमोहनसिंगजी (अर्थमंत्री), बलराम जाखड (कृषी) यांना प्रत्यक्ष यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमार्फत आयोजित केलेल्या चर्चासत्राला पाचारण केले आणि वैराण डोंगरदऱ्यांत, डोळ्यांत फक्त थेंब असलेल्या प्रदेशात फिरवून आणलं. काही थोडेबहुत चांगले निर्णय झालेसुद्धा. त्यापेक्षा जास्त का होत नाहीत? फक्त आमचाच अग्रक्रम असूनही देशाच्या नियोजनात मागे टाकलं जातं? सत्तर टक्के शेती व खेड्याच्या जागण्याचे, पाण्याचे प्रश्न टांगाटोळी करीत असताना कृषिप्रधान देशात दुसरंच काही चालत राहावं हे फार चांगलं नाही, हितावह नाही. हे समजत असूनही आम्ही चालवू घेतो. इतका सोशीक, सहनशील, दुबळा समाज, शेतीवरला फक्त भारतातच असू शकतो, हे दु:ख आहे.

आज पंतप्रधान बोलताहेत, चंद्राबाबू बोलताहेत. नवे असे निर्णय घेण्याचं आश्वासन देताहेत. त्यापूर्वीही हेच होत गेलं, यांच्यापेक्षा एक टक्काही कमी नसलेले राज्यातले, देशातले राज्यकर्ते होते. कुणाला वानावं व कुणाला गुणावं असा भाग नाही. तुलनासुद्धा नाही. यात राजकारण तर एका शब्दानंही नाही. साधा प्रश्न आहे. चर्चा, परिसंवाद. विधिमंडळात ठराव, शेती, पाण्यासाठी गहिवरून येणं, वङ्कामूठ दाखवून बोलणं. भक्कमपणानं होत असताना प्रत्यक्षात कालबद्ध नियोजनानं का दिसत नाही, हे सांगावं लागत आहे.

पाणी पाणी पाणी आणि पाणी पाणी पाणी

पाण्याविना दाही दिशा आम्ही अनवाणी<br>
सांगावी कहाणी कोणा, ऐकेनाच कोणी

कबिराचा दोहा आता जगण्याकारणी
तुझाच उमाळा... भरू येई रे आभाळा
सावरू दे थोडे खुर्च्या करू गोळामोळा

पाण्याचा प्रश्न हा महाराष्ट्राच्या, देशाच्या जीवन-मरणाचा प्रश्न आहे. महाराष्ट्राच्या, देशाच्या सौभाग्याचा प्रश्न आहे. पाण्याच्या प्रश्नासंबंधी कितीही लिहिलं, बोललं तरी ते अपूर्णच वाटावं इतकं ते जगड्व्याळ आहे, विस्तारलेलं आहे. मी एक तसा साधा कोरड्या जमिनीतला लहान शेतकरी. एक साधारण कवी. मला अनेकांचं वाचून, ऐकून, प्रत्यक्ष पाहून जेवढं सुचतं तेवढं मर्यादित मी लिहितो, बोलतो. चुकीचं असेल, नीट नसेलही, माझ्या मर्यादा मला नीट माहीत आहेत; परंतु देशाविषयी व देशातल्या भरडून निघणाऱ्या शेतीबाडी, सामान्य लोक व दारिद्र्यरेषेकडे झुकणारी अर्थव्यवस्था मला ओरबाडून काढते. म्हणून लिहितो, 'पाणी' हा लहानसा शब्द. अवघं विश्व व्यापून टाकणारा शब्द आहे. जगातल्या प्रत्येक जीवन घटकाशी बांधून असलेला पाणी हा शब्द.

'रहिमन पानी राखिये, बिन पानी सब सून
पानी गये न उबरै, मोती मानस चून.'

असा रहीमचा दोहा आहे. मोत्याचं, माणसाचं, चुन्याचं पाणी उतरलं की, ते पुन्हा पहिल्यासारखं उभं राहू शकत नाही. (देश त्याशिवाय आहे का?) इतिहासातील प्रचंड दुष्काळाचं वर्णन रामदास स्वामींनी आपल्या काव्यात केलेलं आहे. ते आजही आपल्याला अस्वस्थ, व्याकूळ करतं.

शेत पिकेना पिकेना पिकेना उदंड

कष्ट करूनी करूनी शेत आहे थंड
अवघे जाहले जाहले थोतांड
दुनिया पाहाता पाहाता जाहली उदंड

भीषण पाणीटंचाई, जीवनाची झालेली वाताहत तुकारामांनी लिहिली.

दुष्काळे आटले द्रव्य, गेला मान,
स्त्री एकी अन्न अन्न करता मेली
लज्जा वाटे जीवा यासाठी या दुःखे
वेवसाय देखे तुटी आली.

गद्य साहित्य व इतिहासात, कवितेत हे गॅझेटमधल्या आधारासह सत्य लिहिलेलं आहे. असल्या अस्मानी-सुलतानी, दुष्काळी, अवकाळी दिसांना, रया

निघून गेलेल्या जमिनीला पाणी निर्माण करून दिल्याशिवाय पर्याय नाही. त्याशिवाय कोरडीची शेती पिकणार नाही. पाण्याशिवाय माणसं, गुरं, चिडीपाखरं जगूच शकत नाहीत. त्यांचे निर्णय अग्रक्रमानं घ्यावेत, रयतेचे ज्वलंत प्रश्न सोडवता आले नाहीत, तर त्यांना राज्यकर्ता म्हणून घ्यायचं कारणच नाही. म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांनी सुपा परगण्यात शपथ घेतली, 'राज्यातला शेवटचा सोन्याचा तुकडा शेतकऱ्यांच्या नांगराच्या फळाला बसवीन. त्यासाठी प्राणपणाला लावीन व शेती व माणसं पुन्हा उभी करीन. हे राज्य रयतेचं आहे. माझं नाही.'

त्यांनी 'पाटस्थळ' व 'मोटस्थळ' असे दोन शासन निर्णय काढले (जीआर काढले). विहिरी, पाट, लहान पाझर तलाव लोकांच्या सहभागानं स्वतः उभे राहून उभे केले- हिरवेपण आणले. तसंच शहेनशाह अकबराने केले. चितोडगड, बुरहानपूर, पांझराकान नदीवर धुळ्याला झालं. शाहू महाराजांनी कोल्हापूर बांध उभे करून पाणी आणलं. जलसंधारण केलं. कोरडवाहू शेतीत शेतकरी उभाच राहणार नाही, हे सांगून. महात्मा फुले यांनी १८८३ला पाणलोटाचा खलिता इंग्राजंना आसूड मारून दिला. इतकी परिपूर्ण व्यवहारी पाणलोटाची व्याख्या नाही. पुष्कळ काम झालं. राज्य मोडकळीमधून उभं राहत गेलं - आज स्वातंत्र्यात हे का अडखळावं एवढाच प्रश्न आहे. साधा प्रश्न आहे.

-०-०-

# १२. गंगा वाहू दे निर्मळ

महाराष्ट्रात एखादं वर्ष सोडलं, तर सतत दुष्काळ व पाणीटंचाई जाणवते. कितीही कर्तबगार मुख्यमंत्री असले, तरी त्यांनी पाण्यापुढे हात टेकले. राज्य खिळखिळं होत गेलं. यावर्षीच्या भीषण पाणीटंचाईच्या काळात वृत्तपत्रं, मासिकं, इतर प्रसार माध्यमांकडून सगळ्यात जास्त जागरण पाण्यासंबंधी झालं. चर्चा, परिसंवाद, निर्णय इत्यादी पाहता विंदा करंदीकरांच्या 'तेच ते आणि तेच ते' या कवितेची आठवण होत गेली.

१० मे २००३ हा जलसंधारण दिवस. मुख्यमंत्र्यांनी सांगितल्यावरून अकोला इथे झालेल्या महत्त्वपूर्ण 'पाणी' चर्चेचं बीजभाषण सुरुवातीला मी केलं. २० मंत्री, राज्यातले कृषी, जलसंधारण, वनश्री, भूजल सगळ्या खात्यांचे सेक्रेटरी; अधिकारी, कलेक्टर, जिल्हा परिषद मुख्याधिकारी, तज्ज्ञ असे अनेक मुख्यमंत्र्यांच्या सोबत होते. दोन-तीन लहान-लहान नव्या पाणी योजनांची मांडणी मी केली.

बाकी सगळं जुनंच होतं. सगळे खुश झाले. शेततळे, भूमिगत बांध, झाडांचे काही निर्णय पक्के झाले, हे त्यातल्या त्यात चांगलं. शासनाची नंतरची घ्यायची लगोलग तत्परता, धडक पद्धतीनं अधिकाऱ्यांनी त्यात झोकून उतरणं व काहीतरी आपला प्रत्यक्ष जनतेचा सहभाग त्यात असणं हे महत्त्वाचं.

त्याशिवाय हे प्रश्न लवकर हाताळणं शक्य नाही. यासाठी प्रचंड रेटा लावा, असं मी आग्रहानं तिथे बोललो. प्रत्यक्ष खरा अनुभव असा की, ते वाऱ्यावर गेलं. असं का होतं ? मुख्यमंत्री असताना, त्यांची प्रखर भूमिका असताना असं का होतं?

मला स्वत:ला धक्का बसावा इतके वाइटातले वाईट अनुभव लगेच प्रत्यक्ष काम करताना तालुका कृषी अधिकारी - जिल्हा परिषद मुख्याधिकारी यांचे आले. काम करायचं नाही, नका करू, निदान भाषा तरी इतकी अशोभनीय नसावी. तसाच अनुभव लोकसहभागाचा. सगळं शासनानं करावं. कर्ज, वीज, पाणी, फळ योजना आणखी बरंच संपूर्ण विनामूल्य द्यावं. याच्या वेगवेगळ्या लोकप्रिय घोषणा, संपूर्ण सबसिडी निर्णय होत असतानाही तेही कशाला असा त्यागाचा, सहभागाचा विचार करतील? असं सगळंच ग्रेट आहे.

संपूर्ण पाणीपुरवठ्याची व योजनांची जबाबदारी शासनानं अंगावर घेतली. त्यामुळे भूजलाचा वापर खूप वाढला. पद्धती बहुतांश चुकीच्या वापरल्यानं समस्या वाढल्या. सगळं सरकारचं म्हणून अंग झटकून लोकांचा सहभाग त्यात राहिला नाही. परंपरागत जुन्या पद्धती बाजूला सारल्या गेल्या.

बहुसंख्य ठिकाणी अलीकडे भ्रष्टाचारानं योजनांना पोखरून टाकलंय. त्याला पाहिजे तसा अटकाव निर्माण होत नाही. अशा अनेकविध गोष्टींनी हा प्रश्न व्यापलेला आहे. म्हणून छाताडावर हादरा देणारा हा पाण्याचा प्रश्न, दुष्काळाचा प्रश्न सकलांचा झाला पाहिजे. सगळ्यांनी मिळून पाण्याच्या स्रोतांचे वेगवेगळ्या पद्धतींनी रक्षण करून ते वाढविणं गरजेचं आहे. जिथे सरकारच्या मर्यादा संपतात तिथे समाजाचा भक्कम सहभाग जरुरी आहे. केवळ सरकारकडून आता हे ठिकाणावर येणं, पुन्हा सुजलाम् सुफलाम् करणं शक्य नाही.

सगळ्या जगामध्ये भारतीयच अधिक जलसंधारण करायचे. आपल्याकडे तशी शास्त्रशुद्ध पद्धती व जाणकार होते. १९२० मध्ये इंग्रजांनी दुष्काळावर उपाय म्हणून विल्यम विलक्रॉक्स या तज्ज्ञाला भारतात बोलाविले. त्याने सांगितलं, ‘खरं जलसंधारण व पाण्याच्या उपलब्धतेसाठी भारतीयांचीच पद्धत स्वीकारली पाहिजे.’ महात्मा गांधींच्या १९१० च्या हिंद स्वराज्य या लहानशा ग्रंथातून या जाणिवा स्पष्ट आहेत. महात्मा गांधींनी प्रार्थना सभेत सांगितलं होतं.

“नैसर्गिक साधन संपत्तीने पूर्ण अशा आपल्या देशात उत्तुंग हिमालय असून, डोंगरदऱ्यांत विश्वदेवता राहते. गंगेसारख्या अनेक मोठ्या नद्या आहेत. आपण दुर्लक्ष केल्याने वर्षानुवर्षे पावसाचे पाणी बंगालच्या उपसागरात व अरबी समुद्रात वाहून जात आहे. हे पाणी लहान बांध व तलावांमार्फत अडवून सिंचनासाठी वापरले, तर भारतात कोठेच दुष्काळ राहणार नाही आणि पाणी कमी पडणार नाही !” महात्मा गांधींची हत्या झाली. त्यांच्या विचारांची होऊ नये एवढीच इच्छा.

-o-o-

# १३. हवा स्तनातला पान्हा

कृत्रिम पद्धतीनं पाऊस पडल्याच्या आनंदाच्या बातम्या आपण काल-परवा वाचल्या. सगळ्यांना आनंद वाटला. कुठेतरी दिलासा देणारी नव्या तंत्रज्ञानाची प्रत्यक्ष बारामती-पुणे येथे घडलेली घटना. अमेरिकेतल्या संस्थेच्या मदतीनं, सहकार्यानं हा प्रयोग केला गेला. यशस्वी झाला. आता फार चिंता करण्याचं कारण नाही... असा विचार जर सर्वत्र पोचला तर चांगलाच आहे; परंतु तो व्यवहार्य आहे का? इतक्या मोठ्या प्रमाणावर व्यवहार्य आहे का? हादरा देणारी कोट्यवधी खर्चाची आकडेवारी जोडून पाहिली. इतक्या दुबळ्या राज्यांची, ती पेलता येईल, एवढी ताकद आहे का? अंतराअंतरानं का होईना, नेहमीचा पावसाळाच पाहिजे. ते वाहून जाणारं पाणी साठविण्याच्या जुन्या चांगल्या भारतीय पाणीसाठा योजना, काही नव्या, त्यात सुधारणा व अपूर्ण धरणं कालबद्धपणे पूर्ण कराव्यात एवढंच आहे. आहे ते पाणी मोजून वापरणं, नियमित करणं, बंधन घालणं व ठिबकसारख्या तंत्राला आणखी स्वस्त करून पुष्कळच होऊ शकतं. बाळाला आईचं स्तनांचं दूधच पाजा, असा फतवा काढून जाहिराती या देशात आरोग्यासाठी व अन्य काही कारणांसाठी आता जोरदार चाललेल्या आहेत. बाटलीचं दुसरं दूध नको. तीच गोष्ट पाण्याच्या संबंधात-कृत्रिम पाण्याच्या संबंधात आहे, असे मला वाटते. हे चुकीचं असेलही. मूळ पाणी प्रश्नालाच मग बगल देऊन योजना थोड्याफार चालल्यात. त्या थांबवून लोक चक्रम होऊनच या देशात पाणी पाडा म्हणत राहतील.

डाइंग व्हिजडम या अनिल आगरवाल यांनी अत्यंत परिश्रमानं संपादन केलेल्या पुस्तकात भारतातील शंभरपेक्षा अधिक सर्वोत्तम पाणी योजना सचित्र दिलेल्या आहेत. लोकसहभागातून श्रीमंत लोक, राजे, इजारदार व सामान्य जनतेतील सुबुद्ध लोकांनी हा देश दुष्काळ पडत असतानाही लहान लहान शास्त्रशुद्ध योजना करून सुजलाम् सुफलाम् ठेवल्याचा इतिहास त्यात आहे. आजही त्या योजना तशाच लागू होऊ शकतात. आज शंभर कोटींच्या पुढल्या लोकसंख्येच्या भयावह प्रश्नांनी उभा केलेला पाणी प्रश्न व भेदरलेला देश पुन्हा सावरण्यासाठी नव्या प्रगत तंत्रज्ञानासह जुन्या इतिहासातल्याच मार्गांनी जावं लागणार आहे.

त्यात लोकांमधूनच एकमेकांच्या सहभागातून सरकारचं साहाय्य घेऊनच उभं राहणं शक्य आहे. ‘पाणी’ हा सरकारचा म्हणजे आपलाच प्रश्न आहे, या भावनेतून समाज स्वयंसेवी संस्थांमधून, स्वतंत्रपणानं गावागावातून समूहानं एकत्र येऊन सहभागाचं चित्र उभं पाहिजे. भक्कम एकमुखी एकाचंच, निर्णायक शेती व खेडे अभिमुख असं, धोरण असलेलं सरकार पाहिजे. ‘बाराची मोट अन् रितं हाय पोट’ असं खूप झाल्यानंच हे दिवस आले आहेत. जमिनीचं, शेतीचं, माणसाचं पोट पाण्याशिवाय रितं आहे. देश रिता आहे. कोणाचाच कोणाशी घट्ट ऋणानुबंध नाही, पायपोस नाही, संसार नीट कधीच चालणार नाही. हे संसाराचं गणित थेट राज्य व देशातल्या शासनालाही लागू आहे.

शासनानंच सगळं करावं व पदरात घ्यावं या भावनेनं लोक पंगू झाले. मोठी धरणं-पाणलोट असं दोन ध्रुवांचं काहीही नाही. एकाच कुटुंबात हे भाऊ भाऊ, तरीही धरण मोठं, म्हणजे अतिभव्य मोठं करून वर्षानुवर्षे त्याच्या किमतीत दसपटपेक्षाही वाढ होऊन ते लवकर होऊ नये, इतकं मोठं करणं हे आपल्या गरीब देशाला परवडणारं नाही. एका मोठ्या धरणाच्या पोटात दहा लहान मध्यम प्रकल्प, धरणं पाहिजेत. मोठी धरणं कमी काळातच पाण्याऐवजी फक्त गाळाचीच का झाली व शेतीऐवजी फक्त पिण्याच्या पाण्यालाही मुश्किल का झाली? अनेक अशा धरणांनी जंगल जमिनीचा, उत्पादनाचा नीट विचार होत नाही. शेतीत घरादारांसह विस्थापित झालेल्या कुटुंबांना दिलेला शब्द सरकार पाळत नाही; त्यांनी कुठं जायचं? ज्यांच्या जमिनीला मोठ्या धरणानं पाणी देऊन संपूर्ण बारमाही केलं, बागायती केलं व तो अतिसमृद्ध झाला, त्यानं दोन एकर तरी बागायती जमीन आपल्याच विस्थापित बांधवाला विकत द्यावी. ते होत नाही. मग दरी निर्माण होते. एकीकडे बारमाही पाणी, दुसरीकडे गरिबीत एका सांजेला उपाशी कुटुंब, हा दुरावा इथल्या इथेच परवडणारा नाही. समृद्धी, दारिद्र्य ही सिंचनानं केलेली विषमता विखार निर्माण करणारी आहे. एका ठिकाणी सार्वजनिक पाण्यातून संपन्न ऊस व त्यासारखी शेती, दुसरीकडे कोसचे कोस उजाड माळरानं, शेती, पिण्यालासुद्धा पाणी नाही. समन्यायीकरण, समानता याचा थोडा तरी विचार व्हावा. इरिगेशनची व्याख्या फक्त आठमाही पाण्याची, किमान दोन पाण्याची आहे, बारमाही नाही. निसर्गात पाण्याचं न्याय्य व्यवस्थापन होणार नाही हे सत्य असलं तरी पुष्कळ गोष्टी किमान न्याय्य पद्धतीनं जीवनाला-शेतीला आधार देणाऱ्या होऊ शकतात. त्याचा गांभीर्यानं विचार करणारं शासन व समाज याची खरी गरज आहे.

# १४. बंडी झाली उल्टी पाल्टी, तरी पेरतो पऱ्हाटी

विदर्भ, मराठवाडा, पश्‍चिम महाराष्ट्र, कोकण (यात विदर्भ-खानदेशसह) या प्रदेशातली मुख्य पीकपद्धती ठरलेली आहे. दर दोन-तीन वर्षांनी आता फक्त फळबागांमध्ये नवे बदल होताहेत. बाकी ज्वारी, बाजरी, कडधान्ये, कापूस, सोयाबीन, सूर्यफूल, गहू, हरभरा इत्यादी पीकपद्धतीत फार मोठे बदल झालेले नाहीत. बियाणे, खते, औषधी, अवजारे, ट्रॅक्टर, मजुरी या शेतीखर्चात प्रचंड वाढ झालेली व पाऊस तेवढाच; परंतु नको तसा, नको त्यावेळी होत असल्यानं कोरडीची शेती बिलकुल परवडणारी नाही, हे वारंवार सांगायची आता गरज नाही. शेतीत झालेल्या खर्चाइतकंही उत्पादन अलीकडे होत नाही. तरीही नामोहरम न होता, शेती पडीक न ठेवता कितीही कर्ज झालं, विपरीत झालं तरी देशाला उत्पादन देणारा फक्त एकच वेडा. शेतकरी. विदर्भ ६३ टक्के, मराठवाडा २० टक्के, पश्‍चिम महाराष्ट्र १७ टक्के अशी वीस वर्षांपूर्वी कापूस या नगदी पिकाची सर्वसाधारण वर्गवारी होती. त्यातून पश्‍चिम महाराष्ट्र आता जवळजवळ बाद झाला. गेल्या वर्षापूर्वी दोन-तीन वर्षे खूप कमी उत्पादन येऊनही व फारच कमी भाव मिळूनही विदर्भ, मराठवाडा, खानदेशानं कापूस हे पीक कधी सोडलं नाही. ज्वार, बाजरी, मका, उडीद, मूग, तेलबिया इत्यादी पिकांचं एकरी उत्पादन प्रचंड घटलेलं व त्यासाठीचा खर्च वाढला. त्यापेक्षा बाजरी, ज्वारी काढणी, सोंगणी तयार करणं, धसकट काढून पुन्हा शेत तयार करणं यासाठी मजूर तयार नाहीत. पंधरा दिवसांऐवजी महिना-दीड महिना विलंब होतो. दुबार पीक रब्बी कशी करणार? निसर्गाच्या जून, ऑक्टोबर, जानेवारी या उष्णतेच्या काळातच पेरणी झाली पाहिजे. नाहीतर उतारा फारच कमी बसतो. अवेळीच्या पावसानं धान्य झालं, चारा सडला, त्याची शून्य किंमत होते.

कापूस दोन हजाराच्या जवळपास भाव असला व बऱ्यापैकी मेहनत, मशागत केली, तरी कोरडवाहू व बागायती यांच्या खर्चाला थोडाफार परवडतो. शासनाची हमी किंमत असल्यानं त्यात अनेक दोष व अडचणी असूनही मागे-पुढे का होईना कापूस विक्री होते. दोन पैसे त्यात मिळतात. गेल्यावर्षी कापूस भाव टिकून

राहिल्यानं २००० ते २३०० रु. शेतकऱ्यांना मिळाले. शासनाचं निश्चित धोरण नाही. निश्चित भाव असूनही दरवेळी त्यात बदल होतात. वेळेवर खरेदी होत नाही. पंधरा दिवसांपेक्षा अधिक काळ कापूस केंद्रावर नंबर लागत नाही. तीन टप्प्यांत का होईना, सहा महिन्यात रकमेचा चुकारा होत नाही. खाजगी व्यापारी मग जमेल तसं घेतो. गब्बर होतो. यात वावगं ते काय? राज्यकर्ता वर्ग शासनाच्या धरसोडीच्या वागणुकीनं शेतकऱ्यांना गोत्यात आणतो. हलक्या बरड जमिनीत ३५०० च्या जवळपास कापसाची रोपं असली, चांगली मशागत, बियाणं असलं, तर दोन ते तीन क्विंटल एकरी कापूस उतरतो. काळीच्या भारी जमिनीत शेतकरी रोपांची संख्या कमी करतात. कापूस खूप उंच वाढलेला, सुंदर दिसतो. रोपं २५०० असली तरी उतारा जवळपास तेवढाच किंवा एका क्विंटलनं वाढतो, एवढंच. उन्हाळी बागायतीची आता गोष्ट नाहीच. हे जून-जुलैपासूनच्या कापसाचं आहे. पाऊस कमी होतो, जास्त होतो. ऑक्टोबरमध्ये कापूस वेचणीला सुरुवात होते. त्याच काळात दर दहा-बारा दिवसांनी कापसाला (पिकाला) विहिरीचं वा नदीचं पाणी दिलंच गेलं पाहिजे. ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर अर्धा असं अडीच महिने पाणी दिल्यानं नवा बहर लागतो. अर्धा कच्चा जो या उष्णतेच्या काळात गळून जाणारा माल आहे तो थांबतो. पावसाळ्यापेक्षा अति कमी रोग कीड असते. थेट मार्च-एप्रिलपर्यंत कापूस मिळतो. कापूस पाण्याशिवाय नाही. आठमाही पाण्याचं पीक आहे, हे मनाशी पक्कं करूनच पेरावं. दीडपट-दुप्पट उत्पादन शेतीच्या मगदुराप्रमाणे वाढते. इथेच फक्त कापसाचा नफा मिळू शकतो. शेती, कापसाची शेती परवडली असं म्हणता येईल. कोरडीच्या कापसाला अंदाजे तीन-चार हजार रुपये एकरी खर्च येतो. तेवढंच उत्पादन पैशाचं मिळतं. नफा नाही. त्यात पळहाटी उपटणे, कापूस वेचणे हेसुद्धा खर्चात धरा. मग सांगा.

बागायती आठमाही पाणी दिल्यानं यात एक हजार रुपयांची खर्चात एकरी वाढ होते व जमिनीप्रमाणे, मेहनतीप्रमाणे बियाणं कोणतं, त्याप्रमाणं एकरी पाच हजार रुपये अधिक मिळू शकतात. यात थोडाफार फरक पडेल; पण अशी कापसाची शेती परवडणारी आहे. कापूस, रोप संख्या, सरी, वरंबा, परतीची मशागत, बिगर खत बिगर फवारणी, निश्चित पाणी, दोन-तीन महिने (ऑक्टोबर २५ नंतर उडीद-मुगावरची कपाशी) गेल्या पंचवीस वर्षांत हे सगळं प्रायोगिकरीत्या करून मी शेतीसाठी पाणी पुस्तकात व वृत्तपत्रात लिहिलेलं आहे. व्हिगर संपून गेले. नवे वाण रोग प्रतिकारक, कमी पाण्यावर येणारे व परवडणाऱ्या किमतीतले असावे, ते अलीकडे होत नाही. फार कमी होतं. तुळशी ४, भीष्मा, बन्नी, अजित ३३, राशी २,

गायत्री ६, अंकुर, अक्का, ब्रह्मा या कोरडीच्या बियाण्यांची ४५० ग्रॅमची ंकमत अंदाजे ४५० ते ५०० रुपये होती. महिको बीटी ४५० ग्रॅम १५०० रुपये. बागायती अंकुर ६५१/०९/ अजित ११, ४५० / चमत्कार देशी ६०० रुपये अशा न परवडणाऱ्या, अधिक उत्पादन देणाऱ्या किमती, तशीच औषधी-विष-खते अवाढव्य किमती, यावर्षी नको तेवढा पाऊस व १५ सप्टेंबरनंतर बरबाद करणारी बोंडअळी, रसशोषक कीड अख्खा कापूस खाऊन टाकणारी. शेतकऱ्यांना व शेती व्यवस्थेला खाऊन टाकणारी, तरीही आम्ही देशसेवेसाठी निष्पर्ण असे उभे आहोत. कोणी आरोळी मारताच चक्का जामसाठी धावत जाणार आहोत.

-०-०-

# १५. वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे...

लहानपणापासून मी बारकाईनं पाहतो आहे. कोरडवाहू पीक पद्धतीत जुनी पद्धत अतिशय प्रगत अशी पद्धत होती. शेती शास्त्रातला प्रत्यक्ष अनुभव व ज्ञान, न शिकलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक सक्षमता देणारा असा होता. त्या पीक पद्धतीचं नियोजन, फेरपालट इतकं परिपक्व होतं. आजही शेतीतज्ज्ञांनी त्याचा नीट विचार करावा. काही घ्यावं. उडीद, ज्वारी वेगवेगळ्या शेतीत न पेरता दोन तास (लाईन्स) उडदाची व एक तास (लाईन) ज्वारीची अशी आंतरपीक पद्धती होती. आंतरपीक पद्धतीनं उडीद पिकाची वाढ साधारणपणानं दोन फूट उंचीची व जुनी ज्वारी सात-आठ फूट उंच वाढणारी. आडव्या सरी, वरंबा पद्धतीने ज्वार तीन महिन्यांची झाली म्हणजे जारवा पक्का होतो. त्याच्या मुळ्यांचा विस्तार वाढतो. निसर्गाचं थेट उत्तरा नक्षत्रातलं पडलेलं पाणी अडतं, जिरतं. पुढे कणीस निघून भरणा व्हायला सशक्तपणा येतो. पाऊस नाहीच आला, तरी आतल्या ओलाव्यावर ज्वार भरते. भरगच्च भरते. त्याच वेळी तीन महिन्यांच्या आत उडीद परिपूर्ण भरतो. शेंगा तयार होतात. उडदाची कापणी करून लगेच विक्री करता येते. जुनी ज्वार यायला अजून पुढे दोन महिने असायचे. त्याआधी उडीद आल्यामुळे त्या काळातला खर्च उडदाची विक्री करून भागतो. आर्थिक चणचण कमी होते.

उडीद कापणी झाल्यामुळे नुसत्या ज्वारीच्या ताटव्यांमध्ये हवा खेळू लागते. ऑक्टोबरच्या तीव्र उन्हामुळे कणीस गच्च भरते. शिवाय शुभ्र असते. ज्वारीची किंमत अधिक मिळते. यासारख्याच आंतरपीक पद्धतींची रचना कापूस पिकामध्ये आठ-दहा हारीवर तुरीच्या दोन हारी पेरण्याची पद्धती होती. आजही आहे. कापसाची वेचणी ऑक्टोबरमध्ये होते. नोव्हेंबरनंतर तुरीचं पीक हाती येतं. पैसा एकाच वेळी हाती न येता विभागून वेगवेगळ्या वेळी टप्प्यानं येणं हे अर्थशास्त्र त्यांना नीट ठाऊक आहे. याच पद्धतीनं तिळामध्ये इतर पिकांची बांधणी. मूग आणि तीळ आंतरपीक घेणं. दोघा पिकांची काढणी झाल्यावर दुबार रबी पेरायला सोयीचं राहणं असं नियोजन त्यात होतं.

भुईमूग पिकात चवळीचे दाणे टाकणं अशा कोरडवाहू पीक पद्धतीत शास्त्रशुद्ध व एकरी उत्पादनवाढीचं शास्त्र वापरून प्रगत असं शेतीचं तंत्र अडाणी शेतकऱ्यांनी रूढ केलेलं मी पाहिलं. ते पन्नास वर्षांपूर्वीचं चांगलीं परिपक्व असं माहितीचं तंत्र शेतकऱ्यांमध्ये सर्वत्र रूढ होतं. सूर्यफूल, भुईमुगातील सोयाबीन या तेलबियांच्या मधमाशांचं व फुलपाखरांचंसुद्धा वेगवेगळ्या महिन्यातलं येणं-जाणं व संकर करणं पाहण्यासारखं आहे. यात कोणत्या कोणत्या पिकांना एकत्र करून अधिक चांगली बांधणी करता येईल, संकर काळ व ते ते पक्षी, मधमाशा याचा विचार करायला हवा, असं मला वाटतं. 'हे काय संशोधन व संशोधन विस्तार आहे का?' असा प्रश्न विद्वान शेतीतज्ज्ञ करतील व या गोष्टीला फाटा देतील, हे मला ठाऊक आहे. संशोधनाच्या पद्धती व चौकटी ठरलेल्या आहेत. ते सोडून असं काही करणं आपल्याकडे मान्य नाही, असं बहुतांशी आहे. आपल्याकडे शेतकऱ्यांचं ज्ञान, संशोधन, अनुभव ग्राह्य मानलं जात नाही. माझ्या सीताफळांना शंभर दीडशे फळं येतात व चांगली चवही असते. हे पंचवीस वर्षे चाललेलं आहे, तरीही सीताफळांवर संशोधक फार बोलत नाहीत. सीताफळ काही बरं फळझाड नाही, असंच सांगतात. पंचवीस-तीस फळं येतात, संकर होत नाही. मधमाशा त्या फुलावर आकृष्ट होत नाहीत असं काहीतरी ते सांगतात, पुस्तकातही आहे. आम्ही अनेकदा शेतात रात्री बाहेर खाटा टाकून झोपतो. चांदण्यांचं भरगच्च आकाश व मेघांचं भटकणं असं सुरुवातीच्या पावसात छान दिसतं. बघतो तर समोरच्या सीताफळांच्या झाडावर शेकडो चांदण्या भटकताहेत असं दिसलं. या झाडावरून त्या झाडावर काजव्यांच्या चांदण्या लख-लख उजेडानं भटकताहेत असं दिसलं. सीताफळांच्या फुलांवरला गंध वेचून जवळच्या कडुनिंब, मोसंबीवरसुद्धा फिरून येताहेत. फारच रम्य, सुंदर असं ते दृश्य जुलैमध्ये पाऊस पडल्यावर फुलं उमलल्यावर रात्री असतं. शेतात बांधलेल्या बैल, गायी-म्हशींच्या पातळ गरम शेणामधून काजवे उमलतात व 'चम चम चांदणं गगनात आणि लख-लख प्रकाश दरियात' या ओळींची साक्ष फळझाडांवर विशेषत: सीताफळ बागेवर पडते. सुंदर भरगच्च सीताफळांची बाग कधी रिकामी राहिली नाही. हा अनुभव व यामागे काय ते शोधलं पाहिजे. म्हणून मी पुस्तकात लिहिलं तर विद्वान संशोधक म्हणतात, "महानोर यांच्या म्हणण्याला भक्कम असा शास्त्रीय आधार नाही. त्यामुळे ते ग्राह्य मानता येत नाही." नका मानू. कोणी तुम्हाला आग्रह धरलेला नाही. असंच ज्वार खोडवा, पाणलोटातलं काम, वनश्रीमध्ये सीताफळ, आवळा, बांबू, कडुनिंब हे माझं सांगणंसुद्धा पटलं नाही. आज वीस वर्षांनी बांबू, कडुनिंबावर तेच छान बोलताहेत. काळ झपाट्यानं निघून जातो व आपण तिथेच थबकून मागे पडतो. मोसंबी व सीताफळ अशी आंतरफळांची बाग मी उभी केली.

पंधरा बाय पंधरा फुटांवर दोन फळांच्या वेगळ्या रांगा. जुलैमध्ये मोसंबीचा दरवळ व फुलणं. सीताफळांचा दरवळ व फुलणं. हजारो मधमाशा, शिवाय हवेनं परागीकरण सहज त्वरित होतं. वेगळं, परिपूर्ण, स्वादिष्ट फळ तिथलं दिसलं. शिवाय सीताफळांचा ऑक्टोबरला पैसा व मोसंबीचा मार्च-एप्रिलमध्ये. असं छान पैशांचं, श्रमाचं, पाण्याचं विभाजन व नियोजन. बांधावर कडुनिंब, बांबू, साग, निलगिरी असल्यानं अनेक रंगी-बेरंगी पक्षी, मधमाशा, त्यांचं खाणं-टाकणं, विष्ठा यातून संकर होत राहतो. त्यांची किलबिल, घरटी, आणखी अनेक रंगांचं पंख भरून उडणारं आकाश डोळ्यांना आनंद देतं. माणसं एकएकटी न राहता समुच्चयानं, गुण्यागोविंदानं, भेटीगाठीनं, गावागावातून, वस्तीतून छान जगतात, राहतात. तेच झाडांचं, पशुपक्ष्यांचं, फुलपाखरांचं व सुंदर शेतीचं आहे. गुण्यागोविंदानं एकत्र नांदणारी कृषी संस्कृती.

-o-o-

# १६. असो नसो पाणी, आम्ही कापसाचे धनी

सीताफळासारख्या झाडांमधले कोणते जीन्स आहेत, जे कमी पाण्यावर जगण्यासाठी, रोगप्रतिकारक व उत्पन्न देणारे आहेत, त्याचा शोध एकविसाव्या शतकात होऊन कृषी संशोधन शाळा व शेतीचं प्रगत शास्त्र अवलंबिणारे शास्त्रज्ञ यांनी अधिक लक्ष घालून नुसता कापूस नव्हे, तर आणखीही पिकांना तसं उभं करणं या काळात जरुरी आहे. त्यासाठी पैसा नाही, गाडून घेणारे - दीर्घकाळ त्यातच रममाण होणारे नवे शास्त्रज्ञ नाहीत, हे सांगण्यात आता अर्थ नाही. १९६४ च्या काळात, बलदंड शेती व्यवसायाला मुख्यमंत्र्यांचा, कृषिमत्र्यांचा जबरदस्त रेटा व त्यासंबंधीची पराकोटीची आस्था होती. ती पुन्हा पुन्हा यावी, कापसाचे वाण कोणतेही असो - पाण्याशिवाय हे वाण, आठमाही पाण्याशिवाय कापूस नाही हे एकदा पक्कं करा. फसव्या, उंच वाढणाऱ्या, जाहिरात उत्तमोत्तम करणाऱ्या, भ्रम निर्माण करणाऱ्या पुष्कळच कंपन्या आहेत. काही चांगल्या कंपन्या अनुभवानं, विश्वासानं नवे वाण देतात. शासनाच्या काही जाती फारच उत्तम आहेत. त्या शोधूनच कापूस लावावा. उगा आंधळेपणानं नको. कापसाचा भाव काही असो - एकरी अधिक उत्पादन व कमीत कमी खर्च - रासायनिक खते, औषधीशिवाय असेल, तरच कापूस परवडणार.

पन्नास वर्षांत अधाशीपणानं खत व पाणी वापरलं. त्यामुळे जमिनीची रया गेली. तिच्यात शक्तीच नाही, ती तरी काय करणार? किमान एकरी तीन हजार खर्च, फार तर चार हजार वा चार-पाच पाणी ऑक्टोबर, नोव्हेंबरमध्ये देऊन किंवा ठिबकनं देऊन सहा ते आठ क्विंटल कापूस एकरी यावा म्हणजे अंदाजे सात-आठ हजार रुपये निव्वळ एकरी मिळतील. यात जमीन, मेहनतपरत्वे फरक पडणार. यावर्षी २० ठिकाणच्या कापसाच्या शेतांमध्ये गेल्या आठवड्यात मी जाऊन आलो. शेतकऱ्यांना उत्पादनाचे आकडे निम्म्यापेक्षाही कमी करावे लागतील, अशी वाईट अवस्था आहे. चवळी, मूग, तीळ, ज्वारी, बाजरी काहीही राहिलं नाही. फक्त कापसावर मोठी मदार होती. अति ओली जमीन, बांडे अळी व पांढरी बुरशी, जादा

खतं यांनी नाश केला. नानखुर्द (ता. एरंडोल) येथील एका वीस एकराच्या शेतात देखणी अप्रतिम कपाशी होती. भरमसाठ सगळा खर्च, एकरी खर्च पाच हजारांपेक्षा जास्त, पाच-सहा कापसाच्या उत्तम जाती. एकर चार-पाच हजारांचे उत्पादन होईल, असा प्रत्यक्ष पाहून अंदाज आता आहे. नफा नाही. बाकीच्या शेतकऱ्यांचं काय सांगावं?

आता कापूस वेचणी सुरू झाली. बाकी पिकं जवळजवळ गेली. कर्ज घेण्यासाठी बँका, खाजगी पैसे देणारे, खत-बियाणे, औषधीवाले व रोजचा शेतीचा, घराचा खर्च व रबीच्या पेरणीसाठीही तयारी, हे प्रश्न आ वासून उभे आहेत. कापूस केंद्र यावेळी सुरू व्हायला पाहिजेत. ताबडतोब कमान हजार-बाराशे का होईना त्वरित हाती यावेत. व्यवहार होईल. अजून कापसाचा भावच निश्चित होत नाही. असं आमच्या शेतकऱ्यांचं, नेत्यांचं हे शासन आहे, याचं दु:ख वाटतं. उत्पादन खर्चावर आधारित भाव देणं शक्यच नाही. पंजाब, हरियाणा, प्रदेश, बिहार या सुपीक जमिनीत उत्पादन खर्च अतिशय कमी. एकरी उत्पादन जवळपास वीस क्विंटल सरासरी, तिथे केंद्र शासनाचा अठराशे भाव त्यांना आनंददायी आहे. आपल्याकडे २३०० म्हणतात, प्रत्यक्ष २१०० मिळतो. काटा करणारे कमी म्हणून आठ-आठ दिवस भाकरी, चारा, उघड्यावर ट्रॅक्टर-बैलगाडी घेऊन थांबलेले शेतकरी त्रस्त होऊन गेलेले. कंटाळून आणखी कमी भावानं कापूस १८००-२००० ला व्यापाऱ्याला विकून मोकळे होतात. एकूण, कापसाच्या पहिल्या वेचणीचा गरीब, मध्यम शेतकऱ्यांचा ऐंशी टक्के कापूस, चांगला शुभ्र कापूस आधी व्यापाऱ्यांकडे निघून जातो. परप्रांतात जातो. शेवटचा कचऱ्याचा लेंडी कापूस सावकाश डिसेंबरमधल्या कापूस एकाधिकार योजनेत येतो. कोणता कापूस कोणत्या जातीचा, लांब आखूड धाग्याचा हे थोडंसुद्धा न पाहता बहुसंख्य अडाणी ग्रेडर जास्तीच्या किमतीचा भाव व जात टाकून एकाच ढिगाऱ्यात कापूस जाम होतो. ग्रेडर, आणखी तत्सम व्यवहारासंबंधी सांगण्याची गरज नाही.

असा हा आपला कापूस एकाधिकाराचा ‘शुद्ध’ कापूस गाठी करून गेल्यावर तिकडे निकष लावून त्याचा खरा धागाच सापडत नाही. या भेसळीला जागतिक स्पर्धेतल्या निकषांमध्ये भाव देणं सोडा, लवकर विकतही कोणी घेत नाही. असे सगळे जटिल प्रश्न आपणच निर्माण करून ठेवले. कोणाच्या नावे रडावे ?

योजनेला यावर्षी पन्नास कोटींचा नफा झाला असं फुशारकीनं सांगतात. अहो हा नफा किमान दोनशे कोटीच्या पुढे झाला असता. या आधी किती कोटींचं अंगावर

आहे आणि का, त्याचाही नीट शोध घ्यावा.

एकाधिकार कापसाचं धरसोडीचं असं अनिश्चित धोरण, चुकीचं वेळापत्रक, भाव, पैसे वेळेवर न देणं यासाठी अतिशय चांगली अशी ही शेतकऱ्यांसाठीची शुभ्र योजना काळपट करून टाकली. श्री. एन.डी. पाटील व श्री. यशवंतराव मोहिते १९८० ला नागपूर सभागृहात मंत्री व आमदार म्हणून चर्चेला तीन तास होते. हे भूत थेट कारखाने, कापडापर्यंत, धागा सूत, जागतिक बाजारपेठ व मार्वेâटिंगची व्यवस्था, शेतकऱ्यांचा अर्थव्यवहार, पणन इत्यादी संबंधी एखाद्या सुंदर मेघदूतासारखंच सुंदर, अमोघ अभ्यासानं व कर्तृत्वानं शिगोशीग भरलेलं मी ऐकलं व शेतकरी म्हणून ते ऐकून संपन्न झालो. ती माणसं आज आहेत. त्यांची ती योजना कुठे आहे ?

राज्य तेच आहे. शेतकऱ्यांचं आहे. यात शेतकऱ्यांचं दु:ख थोडं तरी हलकं व्हावं, एवढीच प्रार्थना कापूस कास्तकारांच्या वतीनं.

-०-०-

# १७. झाडातुन लदबदले बहर कांचनाचे

बारा-पंधरा टक्के पाणी केवळ बागायती शेतीसाठी आहे. त्यातही केळी, ऊस यासारखी खूप पाणी घेणारी पिकं आहेत. उसाचे अनेक प्रश्न निर्माण झालेत व साखर कारखानदारी प्रश्नांच्या विळख्यात अडकली. काही केल्या दोन-पाच वर्षे तरी, कदाचित त्यापुढेही त्यातून सहीसलामत बाहेर निघणं कठीण झालंय.

त्यापेक्षा वेगळे नाहीत. विशेषत: पाणी व केळीच्या भावाचे चढ-उतार अंगावर येतात. रुपये पाचशे-सहाशे क्विंटलचे बाजार कधीतरी महिनाभर, चारशे-तीनशे दोनेक महिने. बाकी सगळा केळीचा माल दोनशे रुपयांच्या सरासरीमध्ये विकला जातो. झाडाला चाळीस रुपयांच्या जवळपास खर्च व तेही दीड वर्षे त्यात अडकून, असा हिशेब असल्यानं किमान घडाचं वजन वीस किलो तरी पाहिजे. म्हणजे थोडं तरी सावरून एकरी पंचवीस हजार रुपये मिळाले असं सांगता येतं. अशी चांगली शेती- केळीची, उत्तम वजन, वर्षभरात कटाई व दुसरं पीक घेऊनच उभी राहते व तीही टिश्यूकल्चरची चांगली रोपं असली तरच. अशी ही वाढती परवड शेतकऱ्यांच्या मोठ्या बागायती पिकांना वेढून आहे.

१९९०ला श्री. शरद पवार मुख्यमंत्री असताना त्यांनी ‘कोरडवाहू फलोद्यान योजना’ महाराष्ट्र शासनाच्या मुख्य प्रवाहात आणली. आठमाही पाणी आता पुष्कळ ठिकाणी निर्माण झालं. शिवाय काही फळझाडं खूप परिश्रम - दोन वर्षे - घेतले तर एकदा उभी राहिली म्हणजे उभी राहतातच. आंबा, पेरू, सीताफळ यांसारखा फळबागा अशा आजही उभ्या आहेत.

कोरडवाहू शेतीमध्ये फार कष्ट केले व बरा पावसाळा असला, तर एकरी दोन-तीन हजार रुपये उत्पादन होऊ शकते. दुबार रबी पीक केलं, तर खर्चवेच जाता एकरी आणखी दोन-तीन हजार रुपये मिळू शकतात. त्यात बाजारपेठ इतकी उलटीपालटी व शेतकऱ्यांची अडवणूक करणारी आहे की, त्यानं धसकाच घेतला.

शिवाय आता पुन्हा छातीवर जागतिकीकरण आलंच. मोसंबी, संत्रा, चिकू, आंबा, डाळिंब, पेरू, बोर, काजू, आवळा, सीताफळ यांसारख्या फळबागा उभ्या राहाव्यात म्हणून व त्यात पैशांची दरवर्षी विशेष अडचण येऊन ती ठप्प होऊ नये म्हणून, 'रोजगार हमी' मध्ये ही योजना बसविली. रोजगार हमी योजनेनं भारतभर स्वत:चं वेगळं, विकासाशी व चांगल्या प्रगत योजनांशी व सामान्य मजुरांशी नातं जोडून दाखविलं.

पुरोगामी शेती विचारानं व शहाणपणानं ही योजना १९९० ला आखली गेली. १९९०ची, अतिशय कमी खर्च, कमी पाणी व पंचवीस वर्षांची निश्चिती अशी ठेव योजना म्हणजे फलोद्यान योजना.

जुलै महिना उजाडला. निर्णय झाला, तरीही ऑगस्ट-सप्टेंबर मिळतो म्हणून योजनेला प्रत्यक्ष सुरुवात करून शुभारंभ केला गेला. महाराष्ट्रात त्यापूर्वी फळबागा स्वत:च्या पैशानं व मेहनतीनं उभ्या करून उत्तम नावलौकिक व पैसा मिळविणारे शेतकरी होतेच. त्यांचे हिरवे बहरलेले संसार पाहून व आठमाही पाण्यावर फळबागांमुळेच शेतीला आर्थिक लाभ मिळू शकतो, या विचारानं आज बारा वर्षे झाली, अतिशय कमी पाण्यावर दुष्काळातसुद्धा महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर फळबागा उभ्या राहिल्या. थेट खेड्यापाड्यात, गरिबांच्या घरात व शहरांमध्ये देशभर महाराष्ट्राची उत्तम फळं पोचली.

परदेशातही या फळांची आज विशेष मागणी आहे. उत्तम हवामान, सारखा हिवाळा-पावसाळा-उन्हाळा, हलकी जमीन, हलकं (कमी) पाणी असं महाराष्ट्राला मिळालेलं वरदान आहे. हे सगळ्याच फळांना व थोड्या पाण्यावरल्या पिकांना फलदायी. पर्यावरण, पाणी, माती, पाणी अडविण्याचा, पाणी तिथेच पालापाचोळ्यात, मुळांमध्ये जिरविण्याचा मोठा वाटा फळबागेच्या शेतीत ओ.

प्रत्येक दोन महिन्यांच्या काळात वेगवेगळ्या ऋतूंमध्ये फळबागा फुलतात. त्याचा दरवळ शिवारभर गावाच्या परिसरात असतो. सगळा परिसर शुद्ध करून टाकतो. मधमाशा, लहान लहान फुलपाखरं, वेगवेगळे पक्षी शिवारभर, शेतात भिरंगत पोट भरतात. डोळ्यांना आनंद देतात. जमिनीवर पडलेली फळं खाणारी किडा-मुंगी आणखी आहेतच. फळं लावणं, वाढवणं, छाटणी, तोडणी, ट्रॅक्टर, मेटॅडोर, ट्रक, पॅंकग, वाहतूक, विक्री, व्यापारी इथपर्यंतचा, सगळ्यात मोठा मजुरांचा रोजीरोटीचा व्यवहार शेती व्यवसायात फक्त फळबागाच करू शकतात. तिथलाच

मजूर, तिथेच आपल्या आवडत्या गावाच्या घरट्यात आनंदानं राहून बऱ्यापैकी संसार वाढवू शकतो. हे आम्ही प्रत्यक्ष पाहतो आहे.

फळबागांच्या पोटात एवढं सामर्थ्य आहे. मोठ्या प्रमाणावर मजूर व इतर लहान उद्योगांशी निगडित आर्थिक व्यवहार प्रत्येक मोठ्या फळबागांच्या प्रदेशात आता सुखाचा होतो आहे. पंचवीस एकर शेती असलेला शेतकरी कोरडीमध्ये फार तर पन्नास हजार कमवीलसुद्धा; परंतु संसाराला, किमान पाच-सात जणांच्या कुटुंबाला, शेतीला लाख, पाऊण लाख रुपये तरी हवेत. कमी पाण्यावर मनापासून कष्ट केलेल्या, बाजारपेठा शोधून विक्री करणाऱ्या प्रगत शेतकऱ्याला त्यातल्या पाच एकरात एक लाख रुपये सहज मिळतात. तेवढे तो करू शकतो.

दोन हेक्टर फळबागेसाठी मंजुरी मिळाली, तर पंचवीस हजार रुपये अनुदान दोन वर्षांतच मिळते. त्यात काटकसर करणारा शेतकरी पंधरा हजार रुपयांतच ते उभं करू शकतो. दहा हजार शेती व संसाराला राहतात. ठिबक होऊ शकते.

कर्ज न करता १९९५-९८ च्या काळात शासनाचा या योजनेवरला जोर कमी झाला होता, तरीही आग्रह धरून ती योजना आम्ही बंद होऊ दिलेली नाही. नंतर पुन्हा लक्ष घातलं. पुष्कळ नव्या सुधारणा केल्या. फळं नवनवीन घातली व थोडीफार रकमेतही वाढ केली. त्या त्या ठिकाणी त्या त्या फळांच्या दर्जेदार चांगल्या रोपवाटिका व वेळेवर-थोडीफार मागे-पुढे रक्कम मिळाली, तर महाराष्ट्रातल्या फळबागा शेतीला मोठा आधार देऊन मोठी अर्थसत्ता उभी करू शकतात.

परवा २० ऑक्टोबरला फोनवर श्रीमती प्रतिभा शरद्चंद्र पवार वहिनींशी बोलणं झालं, ते मुख्यत: फळबागांवर. यावर्षीच्या सीताफळांची गोड चव व मोठा आकार हा विषय होता. भक्कम पैशांचा, विक्रीचा आनंद असा विषय होता.

द्राक्षांचं पाणी, प्रचंड रोगराई, विक्री, त्यातलीसुद्धा रकमेची अनिश्चितता असं खूपच वहिनी सांगत होत्या. त्रस्तपणानं. त्याचवेळी डोंगरदऱ्यातल्या फळांचं गुणगान गात होत्या. पवार साहेबांनी पाठविलेला निरोपही सांगत होत्या आणि गंमत म्हणजे त्या त्यांच्या बारामतीच्या नव्या शेतावर प्रत्यक्ष त्या प्रश्नांमध्ये उभ्या होत्या. एकट्या. मला खूप बरं वाटलं. बाकी, बोलू नका.

नव्या छान कविता- विसाव्या शतकाच्या कवितांचं वाचन लवकरच बारामतीमध्येच करायची तारीख सांगा. शब्दाचं हिरवं रान आमच्या दुष्काळी पट्ट्यात अनुभवांच्या व कवितेच्या भाषेत पाहिजे.

-o-o-

# १८. रानातली झाडे मला फुले अंथरून

वनश्री, झाडं, फळझाडं, पाणी, पर्यावरण ही आजची सगळ्यात महत्त्वाची देशसेवा आहे. विनायकराव पाटील जवळपास तीस वर्षांपासून वनश्रीचं काम करताहेत. वनश्रीचं काम ज्याला जसं रुचेल, त्या पद्धतीनं देशभर चाललेलं आहे. महाराष्ट्रात शासनाच्या बरोबरीनं, थोडं जास्तीच ज्या व्यक्ती व संस्था यात काम करताहेत, त्यात विनायकराव यांचं नाव सगळ्यांनाच चांगलं परिचित आहे.

वीस वर्षांपूर्वी सागवान झाडांपेक्षाही निलगिरी प्रकल्पाची चर्चा अधिक होती. विनायकराव यांनी निलगिरीच्या सामाजिक संस्था महाराष्ट्रात व बाहेरसुद्धा उभ्या करण्याचा धडक कार्यक्रम हाती घेतला. कमी पाण्यावर वाढणारं झाड व वेगानं वाढणारं, दोन-तीन कापणीनंतरही लाकूड व तत्सम उपयोगासाठी लागणारा लगदा, पर्यावरण इत्यादी त्यात होतं. ते शेतीतल्या बदलांमधला आणखी एक पर्याय व साधन म्हणून होतं. सात-आठ वर्षांनंतर एक ठेव बँक असंही त्याचं गणित मांडलेलं होतं.

बरीच मोठी शेती, त्यातला एक भाग व काहीसा आळशी शेतकरी यासाठी ते उपकारक म्हणून आम्ही सांगत असू. त्यात महाराष्ट्रातले, राजकारणातले नामवंत जाणते व सामाजिक शेती संस्थांतील लोकही उत्साहानं सहभागी झाले. बोलता-बोलता झाडं-पाणी अडवा-चिभाड पाणी, जमीन सुधार योजना व पर्यावरण औषधी वनस्पती असं एक सूत्र महाराष्ट्रभर, गुजरात, मध्यप्रदेशातही वाढलं. त्वरित लाभ नाही तरीही चांगलं, शेतीला उत्पादन देणारं, आधार देणारं म्हणून निलगिरीचं रोपटं महाराष्ट्रभर झपाट्यानं वाढलं. निलगिरी जमिनीतलं पाणी ओढून घेतं म्हणून मोठ्या छोट्या वृत्तपत्रांतून, सभा-संमेलनांमधून खूप वादविवाद सुरू झाले. त्यात मोठे जाणते लोकही होते. जगभरच्या कुठल्याकुठल्या पुस्तकांचे संदर्भ त्यासाठी दिले गेले. विनायकदादा पाटील त्यांचेच पुन्हा आधार देऊन मांडणी करीत गेले, तरीही त्यांची मनाची अस्वस्थता वाढलेली मी पाहिली. काही दोष निलगिरी झाडांच्या पद्धतीत, लागवडीत असेलही, तरीही संपूर्ण चर्चा टोकाच्या उलट्या बाजूनी चाललेली. दादांना सोसणं अवघड होतं. विनायकदादा परवा निफाडमधल्या अतिशय चिभाड पाणी

धरणाऱ्या जमिनीवर गावामध्ये मला घेऊन गेले. दोन वर्षांत त्या पाण्याच्या वाया गेलेल्या जमिनी तर ठिकाणावर आल्याच, शिवाय संपूर्ण निरुपयोगी होत्या, तिथे नवा निलगिरीचा वाण देऊन उंच आकाशवेधी निलगिरीची झाडं, शेती पाहून मीसुद्धा थक्क झालो. नवं पुन्हा काही सापडल्याचा मनसोक्त आनंद आम्ही तिथल्या शेतकऱ्यांमध्ये पाहिला. जोजोबा, पोगली, एरंड यासारखी कमी पाण्यावर येणारी शेती व त्याचा खूप अभ्यासपूर्ण मसुदा, काही प्रयोग विनायकदादांनी दरम्यान दिले. त्या त्या वनस्पती शेतीच्या काही मर्यादा असतात व आपल्याकडे परंपरेतून बाहेर न निघणारा शेतकरी आपल्या विचाराला फार घट्ट चिकटून असतो. त्याला शेतीतून त्वरित भक्कम लाभ हवा असतो. अशा विचारांच्या स्थितीचा मोठा वर्ग असल्यानं हे फार पुढे घेऊन जाता आलं नाही. म्हणून काही विनायकराव थांबले नाहीत. वेगवेगळ्या राज्यांत कालिदासभाई पटेल असोत की आणखी जंगल झाडातल्या संस्था, शासन व्यवस्था.

भारतातच नव्हे तर इजिप्तसारख्या देशामध्येही मनापासून काम करून एक आत्मविश्वास दादा अथकपणानं घेऊन चालले. त्यात अथक परिश्रम, न थांबणं व निष्ठापूर्वक, नामोहरम न होता, उदास न होता अपयशातही उभं राहणं अंगी होतं. आहे. ‘वनाधिपती’ व त्यासारखे देशातले खूप महत्त्वाचे असे, अभिमानाने सांगावे असे, पुरस्कार - गौरव मिळाले. त्याचा आनंद आहेच. त्यापेक्षा महात्मा गांधी विचारधारा असलेल्या खूप कस लावून देश-परदेशातल्या असामान्य काम करणाऱ्यांना ‘बजाज पुरस्कार’ दिला जातो. ती संस्था, निकष याचं मोल मोठं आहे.

विनायकराव पाटील यांना परवा ४ नोव्हेंबरला सन्मानपूर्वक हा गौरव पुरस्कार पाच लाख रुपये जोडून दिला जातो आहे. त्यासाठी त्यांचं शेतकरी समाजाकडून व पर्यावरण वनश्रीमध्ये काम करणाऱ्या मित्रांकडून जाहीर अभिनंदन व आनंद मी व्यक्त करतोय. दादांनी स्वत:चं स्वतंत्र हिरवं बेट ‘वनश्री’साठी निर्माण केलं. सौ. सरोज वहिनींनी तसेच मुकी व बोली या दोन्ही गोड मुलींनी दादांना उभारी दिली. परवा अभिनंदनासाठी नाशकात ‘कदंब’ या त्यांच्या घरी दादांना भेटून आलो. या क्षेत्रात काम करणाऱ्या सगळ्यांचं रूप मी दादांच्या चेहऱ्यावर व घरातल्या आनंदयात्रेत बघत होतो. घराभोवती कडुनिंबाची शंभरेक झाडं, त्याभोवती गुळवेल, सीताफळ, आंबा व इतर फळझाडं, कदंबासारखी आकाशाचा वेध घेणारी भव्य झाडं व त्यांचे सोबती असलेली झाडं दादांनी एकरभराच्या घराभोवती खूप जिव्हाळ्यानं वाढविली. झाडांना अल्प गणगोताचं नातं जोडलं. खूप लोकांनी मनाशी

ज्याच्या त्याच्या आवडीप्रमाणे घेतलं, तर दुःख हलकं होईलच, शिवाय देशाला पर्यावरण आणि धनसंपत्ती ओंजळभर दिल्याची सेवा महत्त्वाची.

-o-o-

# १९. इथे तणकट स्वार्थाचे ज्याचे गल्लोगल्ली फासे

वनसंपत्तीची चर्चा सर्वत्र जोरदार चाललेली असते. प्रत्यक्षात मात्र जंगल झाडी वाढलेली नाही. उलट जी आहे ती नष्ट होत चाललेली. वर्षानुवर्षे डोंगरदऱ्यांमध्ये, जंगल विभागामध्ये, शेतीच्या व गावाच्या जवळपासची झाडं निर्दयपणानं कत्तल करून आपण नग्न होत आहोत, याची कुणालाही गांभीर्यानं लाज वाटत नाही. संस्था, माणसं स्वतःच्या आर्थिक विवंचनेस्तव काही उपाय नव्हता, असं सांगून मोकळी होतात. वाडवडिलांनी लावलेली व सुंदर सावली - फळं देणारी आंबराई, चिंच, कडुनिंब मी माझ्यासमोर विकताना पाहतो आहे. थांबवतो, कुणी थांबायला तयार नाही. दारूबंदीच्या कायद्यासारखीच गत या कायद्याचीसुद्धा आहे. अधिकारी व संबंधित, ‘वरून फोन येतो व आम्हालाच मग त्रास होतो’ असं सांगून त्याचं निराकरण करतात. या सगळ्या व्यवस्थेचं काय?

पळसखेडमध्ये पाणलोट क्षेत्राची उभारणी करताना १९८३ पासूनच मी त्यात सिमेंट बांध व लहान पाझर तलावासोबत, सी.सी.टी. सोबत ‘कसार झाडी’ या पडीक गायरान जमिनीवर शंभर हेक्टरवर पंधरा वर्षे रोजगार हमीचा व पाणलोटाचा पैसा टाकून सुंदर वनराई उभी केली. दगडांच्या उतारावर लक्ष बोल्डर, त्यानंतर तिथेच तीन मोठे सिमेंट बांध (कमी खर्चाने) बांधले. सुंदर वनराई अनेकविध प्रकारच्या झाडांनी उभी केली. झुळझुळ पाणी, पक्ष्यांची गाणी, हरणं, ससे इतर वन्य प्राणी तिथे वाढले व गावच्या गायी-वासरांच्या, गुरांच्या कळपांना, मेंढ्या-बकऱ्यांना शांतपणे पाणी पिण्याची सोय झाली. परिसर रम्य होत गेला. तिकडे जाणारे रस्ते मी बांधून खडीचे केले. वनखात्यानं थोडं लक्ष दिलं होतं. दर तीन वर्षांनंतर तयार झालेली वनराई पंचवीस-पन्नास एकर ग्रामपंचायतीला हस्तांतरित केली जाते तशी केली.

ग्रामपंचायतीची माणसं बेकाम व नालायक असल्यावर, व्यक्तिगत स्वार्थासाठी लपून झाडं विकणारी असल्यावर, संपूर्ण जंगलझाडी पूर्ण नागवी करून पोरके झाले. आपली काही जबाबदारी आहे व ही गावाची सार्वजनिक संपत्ती आहे, याचा तीळमात्र स्पर्श त्यांच्या विचारांना नाही. ‘शेतीसाठी पाणी’ पुस्तकात मी काही

निरीक्षणे दिलेली आहेत. तीन पाझर तलावांच्या लगतच्या वाहिनींना, जवळपास प्रत्येकी पंधरा-वीस जवळच्या विहिरींना पाणी वाढलं. त्यापेक्षाही वनराई केलेल्या झाडांच्या गावठाणाच्या पोटी असलेल्या जमिनीत फारच थोडं बागायती फक्त डिसेंबरपर्यंत असायचं, ते मार्च-एप्रिलपर्यंत गेलं व दोन-पाच विहिरींची विहीर व बोअरविहीर वर्षभर पाच एकरांना पाणी पुरवते. त्याआधी तिथल्या जमिनी पाण्याअभावी व कर्ज वाढल्यानं विकाव्या लागल्या. जुन्या विहिरींजवळ जुन्या काळच्या जाणत्या लोकांनी लावलेली दोन-तीन आंब्यांची झाडं, चिंच, एक-दोघं कडुनिंबाची झाडं वाढलेली असायची. गुराढोरांना सावली व आपल्यासाठीसुद्धा. तिथे पाणी अडवून ही झाडं विहिरींना अधिक जिवंत ठेवायची असं दिसून आलं. आजही दिसत आहे.

मी पाणलोटमध्ये सिमेंट बांध केल्यावर नदी-नाल्याच्या किनाऱ्यालगत बांबूंची झाडं लावली. कडुनिंबाची लावली. काही जांभूळ, निलगिरीची लावली. ज्या परिसरात नदीनाल्यांच्या काठानं ही झाडं आहेत, त्या जवळपासच्या नालाबांधांचं पाणी, नंतर आत वाळूत-भूगर्भातलं पाणी खूप दिवस टिकलं. साठे वरून दिसत नसले, तरी अंतर्गत होतेच. त्यामुळे चाळीस-पन्नास फूट खोलीच्या विहिरींच्या पाण्याची पातळी मार्च-एप्रिलच्याही पुढे, खूप पाण्याचा उपसा होऊनही कायम राहिली. पन्नास फुटांच्या खाली खोल व मोठा रुंद साठा असलेल्या विहिरी तर मे-जूनपर्यंत टिकल्या. त्यावर दोन-तीन एकराचा ऊस, केळी किंवा दहा एकराची फळझाडं कायम राहिली. ठिबक सिंचनाचा वापर ठेवून ज्यांनी पाणी वापर नियमित केला, कमी केला, तिथल्या विहिरींची अवस्था अधिक चांगली आहे.

ज्यांनी रात्रंदिवस विजेचे पंप चालू ठेवले व अडाणी पद्धतीने बेहिशोबी पाणी दिलं, त्या विहिरी मार्चच्या आत नष्ट झाल्या. पाणी वाढ झाल्यावर जर पीकपद्धतीत बदल केला नाही, दुबार पीकपद्धती अगदी मर्यादित ठेवून बागा, फळबागा ठिबकच्या शास्त्रशुद्ध गणिती विचारानं नियमित केल्या नाहीत, तर कितीही पाणी साठा व यशस्वी पाणलोट असला, तरी तो पाच-दहा वर्षांत रिता होतो. आम्हाला याची प्रत्यक्ष पाहणीत साक्ष पटलेली आहे. एकदाचा पाणलोट झाला की, विहीर व बोअर दोन-तीन महिन्यांत वाढतात व राक्षसी पद्धतीनं उचल करून व्यक्तिगत स्वार्थ व पाण्याच्या राष्ट्रीय संपत्तीचा विचार न करता सगळ्यांनाच अडचणीत आणतात. पुन्हा वीज मंडळातले शेवटचे कर्मचारी नि:संगपणानं धंदा करून आकडे व नदी-तलावातलं पाणी वायर टाकून मुख्य वीज ग्राहकांच्या चौपट उभे करतात.

जलसंपत्ती व वीज अशी बेकायदा नष्ट करून पुन्हा नामानिराळे होऊन बोलतात. ही वीज चोरी व लोड, त्यामुळे कुणाचीही बागायती व शेती चालणं कठीण झालं. करोडोंचं नुकसान व पराकोटीची अस्वस्थता चांगल्या शेतकऱ्यांमध्ये वाढली. कुठेच कुणावर धरबंध नाही. धरलं, केस केली, तर गल्लोगल्लीत पुढारी झाल्याने व त्यांचे शब्द प्रमाण मानताहेत व सांभाळावं लागतं म्हणून नेते त्यांना मोकळे करायला सांगतात. अशी ही जंगलतोडी-वनराई-पर्यावरण अर्थकारणाची दुःखद रम्य कहाणी.

-०-०-

# २०. केळीचे असुनी बाग, आम्हा ना वाली

केळी हे फळ श्रीमंतापेक्षाही सर्वसामान्य गरिबांचं फळ आहे. महाराष्ट्रात, देशात कुठेही रस्त्यावर इतर फळांपेक्षा अधिक, जवळपास आठ-दहा महिने केळी विक्रीला दिसते. इतकं आवडतं फळ, पूरक अन्न दुसरं नाही. कुठलाही कामगार, मध्यमवर्गीयसुद्धा भुकेच्या वेळी एक-दोन ताजी पिकलेली केळी खातो. इतर कोणतंही त्यापेक्षा अधिक चांगलं ताजं त्याला वाटत नाही. घरीसुद्धा केळी असली, तर भाजी करण्याचीही गरज वाटत नाही. भाकरी, पोळीबरोबर शिकरणाचं छान जेवण होतं. इतर कोणत्याही फळापेक्षा स्वस्त व पूर्णान्न असल्यासारखं केळी हे भारतातलं आवडतं फळ आहे.

शेतीमध्ये लावणीपासून तर आंतरमशागत, काढणी, विक्री, व्यापारी, लहान फळ विक्रेते ते थेट दिल्ली, कानपूर, कलकत्ता आणि आता परदेशातही व्यापून असलेला केळीचा मोठा व्यवहार, मोठा रोजगार सामावून असतो, आहे. भारतात दक्षिणेत आंध्र, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू तर आहेच. आपल्याकडे महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश असा मोठा केळी पिकाचा राबता आहे. महाराष्ट्रात तसं पाणी कमी असलं, तरी ज्या ज्या ठिकाणी पाण्याची उपलब्धता आहे, त्या ठिकाणी आता ऊस व इतर बागायती पिकांपेक्षा केळीचं पीक वाढलेलं दिसून येतं.

महाराष्ट्रात जे विभाग केवळ ऊस व त्यासारख्या पिकांचे होते, त्या प्रदेशात आता केळी मोठ्या प्रमाणावर व चांगल्या प्रतीची, चांगल्या एकरी उत्पादनाची दिसते आहे. याची कारणं अनेक असली, तरी ठिबक तंत्रज्ञानाच्या कमी पाण्यावर येणारी व टिश्यूकल्चरची विशेष चांगली रोपं आल्यामुळं हे होत आहे. शेतकऱ्यांना उत्पन्नातलं व चांगलं पैसे देणारं पीक कोणतं व बदल केव्हा, कसा करावा हे आता सांगावं लागत नाही. तो आपोआप ते शोधून काढतो व भक्कम मेहनतीनं करतो. त्यामुळे टिश्यूकल्चर व ठिबक, आणखी अंतर बदलून घ्यायची पद्धती, खेळती हवा, सूर्यप्रकाश - सतत खोडव्याचं तीन वेळा येणारं उत्पादन या सगळ्या गोष्टींमुळे केळीचं एकरी उत्पादन, वजन वाढल्यामुळे केळी पीक प्रगतीच्या बाजूनं गेलं.

अधिक लोकप्रिय झालं. केळी दहा हजार न लावता केवळ पाच हजार या नव्या पद्धतीनं लावली, तर दहा ऐवजी वीस-पंचवीस किलोचा दर्जेदार घड येईल व उरलेल्या जमिनीतलं उत्पादन अधिक इतर पिकांमुळे मिळेल. पाणी अधिक काळ टिकेल. उन्हाळ्यातही पाण्याची चिंता कमी राहणार. असं मोठ्या प्रमाणात परिवर्तन व्हावं म्हणजे पुष्कळ प्रश्न सोपे होतील. ठिबक, टिश्यूच्या आजच्या जगतातही काही फारच अडाणी शेतकरी (अडाणी म्हणण्यापेक्षा चक्रम शेतकरी) त्याविरुद्ध मतं मांडतात. हे भयंकर हास्यास्पदही मी पाहतो आहे, ते सोडून द्या, पाण्यासारख्या राष्ट्रीय संपत्तीचा ठिबकद्वारे कमी वापर करणं हे, एकूण पाण्याच्या दृष्टीनं क्षमतेच्या व निम्मीच लागवड करणं हे अर्थकारणाच्या दृष्टीनं फार गरजेचं आहे; परंतु आपल्याकडे शेतकऱ्यांची मोठेपणाची खोटी हाव, प्रतिष्ठेचा चुकीचा समज आड येतो व क्षमतेपेक्षाही जास्त केळी लावून उन्हाळ्यात मार खाल्ल्यानं ती दहा किलोच्या जवळपासच येते व सर्व बाजूनं शेतकरी अडकतो.

उत्तम दर्जाच्या केळीचा एक्स्पोर्ट तसा महागडा व पुष्कळदा अंगावर येणारा झालेला आहे. नाफेड व अन्य संस्थांनी केवळ ऑर्गेनिक अशी केळी पाठवूनही त्यात फार मिळू शकलं नाही. जळगावचा जैन उद्योग समूह प्युरीसाठी सहकारी सोसायटी ग्रुप किंवा तत्सम चांगल्या व्यापाऱ्यांकडून दर्जेदार चांगली केळी घेऊन तसं सहकार्यच करतो आहे; परंतु अधिक भाव, जागतिक बाजारपेठेतील उठाव व काही मर्यादा असल्यानं ते मर्यादित प्रमाणात होतं. (त्या मानानं आंबा इत्यादींचं पुष्कळ ठीक आहे.) मुंबई, दिल्ली, कानपूर या भागांत केळीची, दर्जेदार केळीची मोठी मागणी आहे व दहा किलोच्या जवळपासच्या वजनाच्या केळीची खूपच परवड झालेली आहे. अशा केळी मोठ्या प्रमाणावर म्हणजे सत्तर टक्के तरी असाव्यात.

भारताची सर्व पिकांची, धान्याची ॲग्रिकल्चर प्राईस कमिटी, एकरी खर्च उत्पादन याचा ताळमेळ न पाहता, एकच आहे, त्याचा परिणाम काही राज्यांना मोठ्या प्रमाणावर भोगावा लागतो. त्यापेक्षाही वाईट, केळीचे बाजार ज्या मोठ्या व्यापाऱ्यांच्या हातात आहेत, त्यांनी खूपच दयनीय अवस्था करून टाकलेली आहे. मुंबईचीच रुमाल हातावर टाकून संगनमतानं कमी भाव भरण्याची पद्धती आहे. ती सरळ लिलाव करूनच झाली पाहिजे व सहकार, शासन व्यवस्थेनं आता निर्माण केलेल्या महाबनानाच्या कार्यकारिणीतल्या मंडळींनी यासाठी भक्कमपणानं जोर लावला पाहिजे. एकदा ७०० रुपये, ६०० रु. फक्त, कधी काळी बाकी १६०-२००-२५० मध्ये सत्तर टक्के केळीचा व्यवहार हा शेतकऱ्यांना संपूर्णपणानं मोडून टाकणारा व्यवहार आहे. खर्चही निघत नाही, असा भयानक व्यवहार आहे.

कोट्यवधी रुपयांची अर्थव्यवस्था अशी खिळखिळी करून, शेतकरी नागवा करून कोणाचंही भलं होणार नाही. विशेषत: दूरान्वयानं शासनाचंसुद्धा. महाराष्ट्रातल्या एकूण केळीच्या सत्तर टक्के केळी जळगाव खानदेशात आहे. भारताच्या प्रमाणात ती वीस टक्के आहे. केळीचा शेतकरी मोडला गेला, तर सबंध खानदेश, जळगाव मोडून पडेल, हे गांभीर्यानं घ्यायला हवं. आज आमचे मित्र श्री. वसंतराव महाजन, श्री. डी. के. महाजन व हजारो शेतकरी केळी रस्त्यावर फेकून, मोर्चा काढून आपल्या भावना व्यक्त करताहेत. त्यासाठी सगळं विसरून लोकप्रतिनिधी - सहकार क्षेत्र, महाबनाना व शासन यांनी संपूर्ण लक्ष घालणं अग्रक्रम म्हणून करावं. मार्ग काढायला मदत करावी.

-०-०-

# २१. आज गोकुळात रंग खेळतो हरी

केवळ शेती उत्पन्नाच्या आधारावर वाढत चाललेलं व खर्चही वाढलेला असं कुटुंब चालणं अवघड झालं. शेतीचा अर्थव्यवहार डबघाईला आला. पाऊस तेवढाच; परंतु पाहिला तर खूप, कधी खूप अंतरा-अंतरानं येत राहिला. एकरी उत्पन्न आता पाहिजे तसं येत नाही, हे आता सर्वांना ठाऊक झालं. शेती तर सोडताच येत नाही. सरळ दुसऱ्या उद्योगात जाणं कठीण, म्हणून शेतीला जवळचा शेतीपूरक व्यवसाय शेतकरी शोधत राहिले. वाढती लोकसंख्या, त्याप्रमाणे गरज म्हणून अनेक लहान-मोठे उद्योग गेल्या २५ ते ३० वर्षांत उभे राहिले; परंतु लवकर तुटतही गेले. कुक्कुटपालन, शेळ्या-मेंढ्या, अंडी, गायी-म्हशी, दूध-दुभते असे अनेक अंगांनी पूरक उद्योग सहज पचनी पडतील ते उभे राहिले.

गुजरात प्रांतात 'आणंद'सारख्या दूधकेंद्रित उद्योगानं मोठं यशस्वी काम केलं. त्याची प्रतिकृती सर्वत्र सुरू झाली. म्हशी, संकरित गायी, रेतन, दूध वाढीसाठीचे नवे वाण, त्यासाठीचं खाद्य, कुरणविकास सगळं नीटपणानं वाढीस लागलं. रोज लागणारं दूध, तूप, लोणी, चक्का, ताक, श्रीखंड यासारख्या पदार्थांनी जनतेला घरपोच पाहिजे ते मिळू लागलं. चांगल्या प्रतीचं. शेतीला जोडधंदा म्हणून मग आणखी काळजीपूर्वक गुरांचे गोठे, आरोग्य, सगळं काही अद्ययावत सोयींनी होऊ लागलं व सर्वत्र विशेषत: 'वारणा' उरळीला बापू कांचनकडे, श्रीरामपूरला अप्पासाहेब शिंदेकडे, बारामतीला अप्पासाहेब पवार. आणखी प्रत्येक गावात असं महाराष्ट्रात (विशेषत: पश्चिम महाराष्ट्रात) प्रचंड पैशांच्या उलाढालीचं व नुसता पूरक व्यवसाय नव्हे, तर मुख्य व्यवसाय म्हणून संपन्न झालेला मी पाहिला आणि चकित झालो. नंतर तर जिल्हा दूध संघ, तालुक्यात कितीतरी दूध प्रकल्प शासन, शासनाशिवायच्या संस्था, सहकारी संस्था यांचं मोठ्ठं जाळं शेती व्यवसायाला सावरून धरायला आधार झालं. बँकांच्या व शासनाच्या सहयोगाच्या धोरणामुळे आणखी बळ वाढलं. दूध-दुभतं यासोबतच तिथला शेतीचा गेलेला कस, पोत भरून काढण्यासाठी मलमूत्र, शेण वाढत राहिलं आणि त्या त्या ठिकाणच्या शेती उत्पादनात एकरी वाढ

आणखी चांगली होत गेली. अशा अनेक अर्थाने व वर्षभराच्या हंगामातच नव्हे, तर रोजच्या महिन्याचा शेतीचा व संसाराचा खर्च भागविण्यासाठी भक्कम नवा आधार उभा राहिला, खेड्यातल्या स्त्री-पुरुषांच्या मरगळ आलेल्या संसारात नवचैतन्य साकार झालं. राजन गवससाठी मौनी विद्यापीठात साहित्यासोबतच खेडी व पोटाचं शिक्षण नीट बघायचं. कुलकर्णी यांच्या वाङ्मय मंडळात शतकाच्या कवितेचा भरगच्च कार्यक्रम, राजाराम कॉलेज व 'सकाळ'साठी वेगळा कार्यक्रम.

परवा ९,१०,११ ऑक्टोबरला कित्येक वर्षांनी मी कोल्हापूरला पाच कार्यक्रमांना उपस्थित होतो. साहित्यासोबतच शेती, पाणी, पर्यावरणपूरक उद्योग सगळं पाहण्याचा व शिकवण्याचा माझा छंद म्हणून भटकत राहिलो. खूप काही नवं मिळालं, प्रसन्न वाटावं असं दिसलं व मनातली बरीच मरगळ धुऊन निघाली. अरुण नरके व त्यांच्या कुटुंबीयांच्या शेतीची व नव्या प्रयोगांची मला कल्पना होती. त्यांचं साहित्यासंबंधी प्रेम व चांगलं ऐकणं-वाचणं, तसेच एक प्रसन्न नम्र माणूस म्हणून मला माझे मित्र प्रा. चंद्रशेखर जहागीरदार यांची ओळख करून दिलेली होती. अनिल पाटकर यांचा आग्रह होता म्हणून मी, अरुण नरके व 'गोकुळ'चे चेअरमन रणजितसिंह पाटील यांच्या भेटीचा व 'गोकुळ' दूध प्रकल्पात शेतकरी स्त्री-पुरुषांमध्ये कार्यक्रम स्वीकारला. दुग्धव्यवसाय, शेती, कविता, गप्पा, खेडी असा विषय घेऊन दोन तास बोललो. इतकं बोलणं शक्य नव्हतं. ते झालं केवळ अत्यंत चोख, शिस्तबद्ध, खेडी व खेड्यातला शेतकरी केंद्र करून कष्टानं उभा केलेला 'गोकुळ' दूध प्रकल्प तीन तास पाहून.

साडेचार लाख शेतकरी कुटुंबांशी नातं जोडून असलेला हा प्रकल्प तीन, तेरा व तेवीस या तारखा कधीही चुकू न देता प्रत्यक्ष स्त्रियांच्या हातात वीस कोटीपेक्षाही अधिक रक्कम दर महिन्याला देतो व त्यांच्या कुटुंबाला सावली करून देतो. यापेक्षा चांगलं काय असणार? ती प्रसन्नता स्त्री-पुरुषांच्या प्रत्यक्ष भेटीत मी पाहिली. चाळीस वर्षांच्या तपश्चर्येनंतर अथक परिश्रम व जगातलं नवं चांगलं तंत्रज्ञान स्वीकारून, चारशे कोटींचा प्रकल्प उभा करून नवा विक्रम व आदर्श शेतकरी समाजाला दिला. आय.एस.ओ. तर कधीच मिळालं, त्यापेक्षा दूध संघाला अभिमानास्पद खूप पुरस्कार मिळाले. यश पदरी आलं, एक मोठा आनंदसोहळा परवा पार पाडताना मी त्यांच्यातलाच एक होऊन राहिलो. हे ऋणानुबंध कशामुळे? हे गणगोताइतकं आपलं वाटणं कसं? महाराष्ट्रभर असं ऋणानुबंधाचं, संसाराला संपन्न अर्थकारण देणारं व माणूस म्हणून कवटाळणारं आज हवं आहे, जे नष्ट होत चाललंय. अगदी परवाच 'गोकुळ' या सहकारी दूध संघाला, दूध आणि दुग्धजन्य पदार्थांच्या उत्पादनांना

आंतरराष्ट्रीय स्तरावरील निर्मितीचा दर्जा मिळाल्यानं, 'ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्ड' जाहीर झाल्यानं 'गोकुळ'ला या नामांकनानिमित्त आपण हार्दिक शुभेच्छा देऊन अभिनंदन करूया!

-०-०-

# २२. दिवे दूरात तेजाचे, उरी आनंदले लोट

कवी जयराम खेडेकर हे माझे मित्र जालन्याला प्राध्यापक आहेत. कविता लिहितात. साहित्य चळवळी त्यांच्या ताकदीप्रमाणे जालना परिसरात चालवितात. ‘कवितेचा पाडवा’ असा एक छान दिवस कवितेसाठी - काव्य पुरस्कारासाठी त्यांनी चांगलाच रुजविलेला आहे. शहरात पोटापाण्याचं, नोकरीचं नीट चाललेलं असलं, तर कोणीही पुन्हा आपल्या जन्मजात खेड्याकडे फारसं पाहत नाही. खऱ्या अर्थानं फार थोडी माणसं मी पाहिली, जी शेवटपर्यंत आपल्या खेड्यासाठी भावनेनं व प्रत्यक्ष सहभाग देऊन उभारणीसाठी झटत असतात.

शेती, शेतीचे प्रश्न, शेतीतलं दु:ख, पाणी-खेडी यांसारख्या गोष्टींकडे मी सतत जमेल तेवढं आजही महाराष्ट्रभर पाहतो. मदत करतो. पाण्याशिवाय शेती आज कोणत्याही अर्थानं परवडणारी नाही. थोडंतरी आठमाही पाणी पाहिजे. दुबार रबी पिकं किंवा कमी पाण्यावर येणारी फळझाडं, शिवाय पिण्याच्या पाण्याचं, शेतीतलं, घरातलं, गावचं पाणी हे त्यातच आहे. मोठ्या नद्या नाहीत, तिथे माती-पाणी अडवणं व दुबार पिकं, वनश्री करणं याकडे आता गावातल्या शेतकऱ्यांचा कल वाढलेला आहे.

शासकीय योजना आहेत; परंतु फार प्रयासानं व अटी घालून त्यांच्या पद्धतीनं त्या चालवितात. त्यात गावं हैराण होतात वा नाद सोडतात. काही सेवाभावी संस्था, आमदार, खासदार निधी व शेतकऱ्यांचा सहभाग, जाणत्या ग्रामपंचायती पुढे आल्या तर शेती, पिण्याचं पाणी व आर्थिक सुबत्ता गावात येऊ शकते. हे आता महाराष्ट्रात पुष्कळ बऱ्यापैकी चाललंय. शिवनी हे जालना जिल्ह्यातलं श्री. जयराम खेडेकरांचं गाव. पंधराशे-दोन हजार एकरांचं क्षेत्र असलेलं. पाणलोट विकास, सिमेंट बांध, सीसीटी बांध, डोंगर उताराजवळ मोठी घळ व नवी झाडं, फळझाडं लागवड, डोंगराव वनश्रीत वाढ असा एकत्रित कार्यक्रम घेतला व तो बहुतांशी पूर्णत्वास नेला. त्याला कारण गावातील जागरूक नागरिक, संस्था आहेत. त्यासोबत आमचे मित्र कृषिभूषण विजय बोराडे यांची पाणलोट संस्था, कृषी विकास संस्था आहे.

गेल्या पंचवीस वर्षांच्या अनुभवातून आता नेमकं काय सोडावं व काय पक्कं करावं हे निश्चित कळू लागलं. त्यामुळे चुका कमी होतात, हे माझ्या व विजय बोराडे यांच्या अनुभवाचं आहे. सिमेंट नाला बांधाचं बांधकाम नव्या तंत्रशास्त्रानं, अवजारानं तसंच सीसीटीचं करणं भाग आलं. अशा गोष्टी स्वीकारल्यावर दोन-तीन हजार एकरांचा पाणलोटाचा गाव सात वर्षांमध्ये जवळपास पन्नास लाख रुपयांमध्ये पूर्ण होऊ शकतो. शिवनीशिवाय अनेक गावांचे आकडे समोर आहेत. काम झालेलं आहे. अनेक नवे पर्याय समोर आहेत. अनघा पाटील यांच्या 'दिलासा' संस्थेनेसुद्धा पाच-दहा गावांत असं काम केलं. ते गेल्या महिन्यातच पॉप्युलरचे रामदास भटकळ व आम्ही प्रत्यक्ष भेटी देऊन पाहिलं. शासनाच्या हातात हात देऊन आता सहभागानं गावानं उभं राहावं. नुसतं शासन काहीच करू शकणार नाही, याची मांडणी करून मी दीर्घ चर्चा इतिहास दाखवून केली. कुरण विकास-लूस दगडी होल्डर, सीसीटी बांध, डोंगराच्या टेकड्यांच्या पोटाशी नाल्यासारखं पाणी साठवणं (जे देवगिरी किल्ल्यावर बुरहानपूरच्या गावालगत, चितोडगडला अजूनही आहे.) नदीकाठानं बांधावर बांबू, कडुनिंब इत्यादी झाडं व शेततळं करून त्यातून पुनर्भरण.

१० मे रोजीच्या परवाच्या रोजगार हमीच्या निर्णयामध्ये अग्रक्रमानं शेततळं-पुनर्भरण घेतलेलं आहे. शिवनी गावात केंद्र व राज्याच्या आमदार-खासदार निधीचा वापर करून सुंदर सिमेंटचे रस्ते केले. त्यापेक्षाही खऱ्या अर्थाने गाडगे महाराज स्वच्छता अभियानानं स्वच्छता काम मनापासून केलेलं आहे. मंदिरालगतच उघडं सभागृह, त्याला जोडून आजच्या आधुनिक काळाचं मंदिर, म्हणजे वाचनालय केलं. इमारत, पुस्तकं पाहून मला खूप खूप बरं वाटलं. तेच खरं धन आहे. या समारंभासाठी - पाणलोट, स्वच्छता अभियान, वाचनालय, सहा महिने माझ्यामुळे वेळ गेला. शिवनीचे पंधरा-वीस शेतकरी अनेकदा भेटले, परंतु 'विसाव्या शतकाची मराठी कविता' या माझ्या पाच तासांच्या कार्यक्रमात ते जळगावी होते. त्या कवितेवर ते माझ्याशी नंतर बोललेसुद्धा. खेड्याचं इतकं परिवर्तन खूप झालं. समारंभात पाच-सहा शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आाल. विजय बोराडे, नानासाहेब देशमुख, ज्ञानेश्वर भांदरगेसारखे खूप जाणकार तर होतेच, शिवाय दासू वैद्य, केशव देशमुख, आणखी बरेच साहित्यिक व वेगळ्या क्षेत्रातले लोक होते. रोजगार हमी व दोषविरहित नवा पाणलोट केंद्र राज्यांच्या योजना सहभागानं गावानं मनावर घेऊन केला, तर सात वर्षांमध्ये खेडी उभी राहतील व आर्थिक सुबत्ता पुष्कळअंशी घराघरात येऊ शकते.

जिल्हाजिल्ह्यांत कृषिविज्ञान केंद्र व्हावे म्हणून जालन्यासाठी शासनाकडे आठ वर्षांपूर्वी आम्ही खूप प्रयत्न केले. विजय बोराडे यांनी ते जालन्याजवळ उभे केले. मी पाहिलेली पूर्वीची वैराण बरड टेकडी आज मोसंबी, सीताफळं, आंबा, डाळिंब या फळझाडांनी, नव्या तंत्रशास्त्रानं उभी पाहून डोळे भरून आले. बेकार जमीन, कमी पाणी, रस्ते यांच्याशी झगडा देऊन सरकारी नीतिनियम, अडचणींवर मात करून छान संशोधन केंद्र व चांगले शेतकऱ्यांचे शास्त्रज्ञ, सहकारी घेऊन नवं काम चाललेलं आहे. सातगुडी मोसंबी, तिचं चांगुलपण व दोष पाहिले. निष्पर्णा जगणारा सीताफळं पाहिली. ओंजळभर पाण्यावर जगताहेत. आमचे मित्र गोंवद जोशींचा बी.टी. कापूस व त्यांची आवश्यक व्यावहारिकता, याशिवाय अनेक विषयांवर तिथे रस्त्यात थांबून चर्चा झाली. शेतकरी येताहेत, चर्चा करताहेत. सहा महिने, दोन वर्षांचे शिक्षण घेऊन शेतीत नव्या उमेदीनं उभे राहतात हेच चित्र महाराष्ट्रभर वाढलं पाहिजे एवढंच.

-o-o-

# २३. गुलाबाची शेती, स्वर्ग इथेच नांदती

महिनाभरात दोन वेळा कोल्हापूर जिल्ह्यात जावं लागलं. काही केल्या कोणीही ऐकायला तयार नाही. इतके जवळचे मित्र, संस्था व समाजात ज्यांनी स्वतःच्या अथक परिश्रमानं नव्या दृष्टीने उभं केलेलं महत्त्वपूर्ण कार्य या सगळ्यांमध्ये जख्खडपणानं अडकलेला माझा जीव मला ओढून नेत असतो. परवा पुन्हा निमशिरगावला 'निसर्गरत्न' गौरव पुरस्कार दोन वर्षे नाही म्हणत असताना स्वीकारावाच लागला. त्याला जोडून स्वर्गीय देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार यांच्या गावी व त्यांच्या नावानं, त्याला जोडून नववं मराठी ग्रामीण साहित्य संमेलन. अतिशय नेटकं, छान, खूप खचाखच गर्दीनं दाटलेलं. सर्व क्षेत्रातले रसिक होते. रात्री साडेअकराला मी सांगलीला पोहोचल्यावर रावसाहेब पुजारी, श्री. बेळंके (साहित्य संस्थेचे अध्यक्ष) व मित्रमंडळी भेटली. तिथून जवळच्या एका शेतीवर मला घेऊन गेली. तिथे मी थांबलो. जिथे मी थांबलो ती शेती गणपतराव पाटील यांची. ज्यांच्या वडिलांच्या कार्याविषयी, विचारसरणीविषयी व आयुष्यभर अथक परिश्रमानं उभारलेल्या साखर कारखाने व नितळ अशा चांगल्या कार्याविषयी मला खूप आदर आहे. सा. रे. पाटील, दत्त सहकारी साखर कारखाना. आजही शेतकरी, शेतमजूर व शेतीशी निगडित उद्योग - समताधिष्ठित विचारानं जेवढं जास्तीत जास्त शक्य असेल ते करावयाचा ध्यास मी प्रत्यक्ष तिथे पाहिला आहे. त्याआधी अनेक चांगल्या मंडळींकडून विशेषतः अण्णसाहेब शिंदे यांच्या अनेक भेटींमध्ये व पुस्तकांमध्ये मी सा. रे. पाटलांना जवळून भेटलेलो आहे.

रात्री साडे-अकराला पोहोचल्यावर गणपतराव पाटील (सा. रे. पाटलांचे चिरंजीव) भेटले. जेवण, गप्पा झाल्यावर झोपलो. सकाळी सहा वाजता मी तयार झालो. सूर्योदयापूर्वीच्या मंद उजेडात पक्ष्यांची गाणी, सुंदर निरभ्र आकाश व झाडांची, फुलांची नीटनेटकी गर्दी व मंदसा दरवळ अवघ्या परिसराला व्यापून होता. मी ज्या ठिकाणी थांबलो होतो, बाहेर फिरताना पाहिलं, लहानशा टुमदार घरांचं नाव होतं 'श्रीवर्धन'. गणपतराव पाटील आले, सात वाजले होते. मी विचारलं : 'घर फारच

छान. खूप प्रसन्न वाटलं श्रीवर्धनच्या सावलीत; पण श्रीवर्धनचा अर्थ कळला नाही'. श्री म्हणजे 'श्रीपाद' (एसेम जोशी यांचं नाव) वर्धन म्हणजे अच्युतराव पटवर्धनमधलं 'वर्धन' आणि एकदम मी मलाच विसरून गेलो. एसेम इथे राहत असत. दूर, शांतपणानं. ती खोली मी पाहिली. एसेम, साने गुरुजी, वि. स. खांडेकर अशी सहा-सात छायाचित्रं पाहिली. त्या इतिहासात पार बुडून गेलो. एसेम व माझ्या भेटीगाठींच्या आठवणींचा उजाळा माझ्या मनावर तरळून गेला. नरहर कुरुंदकरांनी लिहिलेल्या अच्युतराव पटवर्धनांच्या संबंधीचा सगळा तपशील अगदी लालित्यपूर्ण भाषेत पुन्हा ओठांवर आला. त्याचवेळी रावसाहेब शिंदे, सौ. शिंदे वहिनी तिथे पोहोचले. रावसाहेब पुजारी, श्री. बेळके व साहित्य संमेलनाचे आयोजक साहित्यिक मित्र आले. गेल्याच महिन्यात स्वर्गीय खासदार आबासाहेब कुलकर्णी यांचे चिरंजीव व मित्रमंडळी भेटीला आली.

पं. हृदयनाथ मंगेशकरांना 'भावगंधर्व' गौरविलं, ते सांगली-इचलकंरजीचे संगीत, गीत, साहित्य क्षेत्रातले मित्र 'हृदयांतरी' असं सुंदर पुस्तक घेऊन आले. असं हे आमचं एकूण साहित्यकला संस्कृती मंडळ. 'श्रीवर्धन'च्या शेतीच्या सावलीत बत्तीस एकराच्या, प्रतिभावंत अशा गणपतराव पाटलांच्या, देखण्या फुलांच्या बागेत हरवून गेलो. ज्वारी, बाजरी, कापूस, मका, कडधान्ये, गहू, हरभरा अशी शेती, ऊस, केळी, द्राक्षे अशी शेती, फळबागांची शेती, वनश्री झाडांची शेती किती किती पद्धतीनं शेती करणारे, शेती संपन्न करणारे महाराष्ट्रात-देशात आहेत. आपलं वेगळं काही करण्याचा ध्यास घेऊन बरड माळरानावर माती-खत बाहेरून आणून बत्तीस एकरांमध्ये गणपतराव पाटलांनी फुलांची शेती उभी केलेली आहे. बत्तीस एकरांचं ग्रीन हाऊस मी पहिल्यांदा पाहिलं. १९९२ला मी इस्रायलमध्ये पाहिलं होतं ते वेगळं; परंतु इथे खूप प्रतिकूल अशा वातावरणामध्ये दूरवरून पाणी आणून हे उभं करणं, पैसा असला तरी साध्य करणं, यशस्वी करणं अवघड आहे. गणपतराव तिथे अठरा तास काम करतात. यापेक्षाही प्रत्येक दिवशी प्रत्येक क्षणाला जागरूक पद्धतीने कुठलाही निर्णय त्या फुलांच्या शेतीतल्या अडचणींचा घ्यावा लागतो. कठीण आहे.

प्रत्येक बावन्न गुंठ्यांच्या ग्रीन हाऊसमध्ये माणसांनीच निर्माण केलेल्या तंत्रज्ञान, विज्ञान, कॉम्प्युटरच्या अतिविकसित दुनियेत माणसापेक्षाही जागरूकपणानं संवदेनशील असलेलं तंत्रज्ञान व विज्ञान हे ग्रीन हाऊस चालवितं. सकाळी आठ वाजता प्रत्येक ठिबक बघता बघताच बारा वाजेपर्यंत दोन फुटांच्या कार्डांसह फुलं काढताना स्वर्ग व देवदूत अशीच आठवण तरळून जाते. सुंदर, पांढरी, पिवळी... गुलाबी बारक्या छटा घेऊन उमलणारी, पंधरा दिवस परदेशातही जाऊन तजेलदार,

सुंदर राहणारी फुलं पाहून तिथून पायच निघत नाही. एकेका ग्रीन हाऊसमध्ये एकेका स्वर्गाचं दालन. स्वर्गाच्या कल्पना आम्ही कवींनीच उतरवल्या. स्वर्ग इथेच आहे. कुठल्याही सुंदर, प्रसन्न अशा झाडा-फुलांच्या, माणसांच्या कष्ट व घामाच्या मातीत. देश-परदेशात सुंदर, देखणी फुलं जातात. पुणे, मुंबई विमानतळ, थेट पोचेपर्यंत काळजी. खालून पैसे द्या नाहीतर माल सडवणार, पाडणार ही आपल्याकडली एकूणच अनीती. व्यवहार. हे सगळे पार करून प्रत्येक फुलांच्या दु:खाशी नातं जोडून माती-मातीच्या शिवाराच्या नारळाच्या वरच्या लगद्यांचं अर्थशास्त्र व एकरी उत्पादनांचा हिशेब करूनच ही शेती छातीवर दगड ठेवून करायची. आपल्याला किती प्रसन्न वाटतं. डोळे, मन सुखावून जातं. त्या मागच्या धैर्य, धाडसाचं, वेगळ्या वाटेनं आकाश धुंडण्याचं, परिश्रम व वेडेपणा घेऊन निर्धारानं कोटींच्या कर्जाच्या परतफेडीचं काय?

चाकोरीतून सगळेच चालतात. चाकोरीशिवायचं जगभरचं आव्हान घेऊन वाटा निर्माण करतात, त्याचा वेगळा इतिहास होईल.

-o-o-

# २४. सुंदरतेच्या सुमनावरले, दव चुंबुन प्यावे

काही महत्त्वाच्या प्रकल्पांची नव्यानं ओळख झाल्यानं चांगली अशी चर्चा सर्वत्र सुरू झालेली मी पाहतो आहे. अशा काही नव्या प्रकल्पांच्या संदर्भात कुतूहल आहे आणि ते प्रकल्प शेतकरी समाजाला, काही गावांना शक्ती देऊन जातात. मरगळ झटकून पुन्हा आपण असं काही करावं, अशा विचारांकडे झुकलेले मी पाहतो आहे. काही नव्या कल्पना सुचतात, त्या हाती घ्याव्याशा वाटतात. थोड्या वेगळ्या.

परवा जळगावच्या भवरलालभाऊ जैन यांनी नव्यानं बांधणी सुरू केलेल्या ‘वॉटरपार्क’ या प्रकल्पाला त्यांच्यासोबत भेट दिली. यापूर्वीही गेल्या वर्षी मी ती जागा, तिथलं काम पाहिलेलं होतं. काही निर्णय घेता येतील का, म्हणून चर्चाही झालेली होती. पाणथळ नापीक जमिनीत तिथला काळा दगड काढून रस्ते, खडी इत्यादी कामांसाठी वापरला गेला. त्या पत्थरांच्या मोठाल्या दोन एकरांच्या खदानीला आता तसा काहीच अर्थ उरलेला नव्हता. ती त्यांनी विक्रीला काढली. भवरलालभाऊ जैन यांनी विकत घेतली. बाजूला टेकड्या व टेकड्यांचे उतार घेऊन पाणी येतं. त्या दगडांच्या प्रचंड मोठ्या खदानीत ते साठतं. हजारो लिटर्स पाणी साठतं. जमिनीलगत दोन फूट फक्त माती, लगेच काळा पत्थर. चोपन जमिनीचा काळा पाषाण. ब्लास्टिंगनं काढून फेकलेल्या दगडांमधला दोन एकरांचा खड्डा. दहा-पंधरा फूट खोलीचा. झऱ्याचं, ओघळाचं पाणी त्यात उतरतं. सुंदर लहान पाझर तलावासारखं. त्या परिसराला रम्य करून टाकतं. सुंदर असा लहान, बंदिस्त बांधणीसारखा हा तलाव. नितळ निळं पाणी. वरती निळं आकाश, खालती निळं पाणी. या निवळ निळ्या सौंदर्याची झाक सबंध परिसरातल्या पिकांवर, शेतीवर आहे. इतकं पाणी, असं पाणी, डोळ्यांना सुखावून आनंद देणारं... नितळ निळसर शुभ्र हलकी-झाक घेऊन लाटालाटांवर हेलकावणारं, आकाश पांघरलेलं शुभ्र निळं पाणी. सौंदर्य, खरं सौंदर्य... निसर्गातल्या कुठल्या कुठल्या ठिकाणी, किती रूपानं विराजमान झालेलं असतं. गिरकी घेऊन पंख उभारून पक्षी भिरंगत फिरतात, आपलं प्रतिबिंब

पाण्याशी शोधतात. जवळच्या झाडीमध्ये थकून बसतात. पुन्हा गिरकी घेऊन त्या लाटांशी सोबत करू पाहतात. हा पक्ष्यांचा खेळ, त्यांच्या पंखांच्या रंगांचा खेळ, मंद झुळझुळ वाऱ्यासोबत, लाटांसोबत शब्दाशिवायचा मांडलेला गीतगांधाराचा खेळ. एकांत, शांत एकांत. लहान, छोट्या शेतकऱ्यांचा थोडा गुंजारव.

बाजूला एक गाडी रस्ता, एक ठळक पायवाट. एखादी बैलगाडी. पलीकडच्या खेड्याकडे जाणारे दोन पाच शेतकरी. शांत निळसर पाण्याच्या पार्कजवळ थोडं थांबतात. विसावा घेतात. जगभर दुर्मिळ होत चाललेलं पाणी. पाणी. पिण्याविना अनवाणी होत चाललेला महाराष्ट्र... खेडी... शेतीवाडी. संसार... सरकार... सगळंच आता हाताबाहेर. म्हणून तर अशा काळात तो पांथस्थ, तुम्ही आम्ही, शेतकरी स्त्री-पुरुष असं थांबलेलं बोलकं पाणी डोळे भरून पाहतो. खूप खूप प्रसन्न होतो. दु:ख हलकं होतं. तिथून पाय निघत नाही. असा शुद्ध पाण्याचा, मंद हलक्या लाटांचा निसर्ग. त्याची अबोल थोडी गाज. कुठे गजबज नाही. एकांत शांत.

इथे थांबावं, थोडा विसावा घ्यावा. सगळ्या व्याधी टाकून द्याव्या. लहानशी झोपडीवजा दोन घरं करून वाचन, अध्ययन, चिंतन करावं. चित्रशिल्प. ऐतिहासिक दस्तावेज काढून महिना-दोन महिने पारखून काही नवं द्यावं, असं हे ठिकाण पक्कं करा. बाहेर खूपच प्रदूषण झालंय. सर्वच क्षेत्रातलं. पवित्र, शुद्ध अजूनही आहे तो निसर्ग... त्याच्या सान्निध्यात जवळ, थोडी जागा करूया. किनाऱ्यावर उंच उंच आकाश वेधून जाणारी झाडं लावू. पक्षी येतील, गाणं गातील. त्यांनाही त्यांच्यासाठी आपलं एकांतातलं घर पाहिजे, त्यांना ते मिळेल. त्यांच्या संगतीत हा पार्क आणखीनच सुंदर होऊन जाईल. मी कुठे कुठे डोंगरझाडीत, खूप दऱ्या-खोऱ्यात अशा जागा पाहिल्या. तिथे जाणं, राहणं कठीण. म्हणून तर हिची बांधणी करायची. फार चकचकीत, शहरी काहीच इथे करायचं नाही. अमेरिकेत सॅन् दि ॲगोला एका सुंदर लहान तळ्याच्या काठी एका हॉटेलात मी थांबलो होतो. सुंदर तळं; परंतु जास्तीच्या नको त्या आधुनिक होडी, नावा व दोन-तीन हॉटेल्समुळे त्याचं सौंदर्य लुप्त झालेलं मला दिसत होतं. श्री. शरदराव पवार माझ्यासोबत होते. ते म्हणाले, 'किती छान आहे.' मी म्हणालो, 'छान होतं, ते अमेरिकन सॉफिस्टिकेटेड शहापणानं खराब करून टाकलं' आपलं देशी, निसर्गाचं खरं सौंदर्य टिकविता आलं पाहिजे. निसर्गाची फार मोडतोड करायचीच नाही. आता पुन्हा माझ्यातला शेतकरी जागा होतो... हे पाणी कमीत कमी कमी शेतीला ठिबकनंच द्यावं. जवळच्या विहिरी जिवंत झाल्या. पर्यावरण झालं. महाराष्ट्रात चोपन चिभड पाणी धरणाऱ्या जमिनींचा वाटा मोठा आहे. त्या शेतकऱ्यांनी सरळ शासनाला त्या जमिनी विकत द्याव्यात. जेवढा होईल तेवढा

पक्का पाणीसाठा. ज्याचं इव्हापरेशन फारसं नाही. मोठ्या प्रमाणावर करून लहान पंपांनी नियंत्रित ठिबकनं शेतकऱ्यांना पाणी विकत द्यावं. आता धरणांसाठी तरी जागा किती. असे काही प्रयोग करून पाणी साठा वाढविणं जरुरी.

-o-o-

# २५. या मातीचे पांग फेडण्या उन्नत हा माथा

धरण, पाटबंधाऱ्याच्या जागा निसर्ग ठरवितो. त्यात फार ढवळाढवळ आपण करायची नसते. अपवादात्मक काही करता येईल. तरीही भौगोलिक रचना व नदी-नालेच ते ठरविणार. मोठ्या, मध्यम धरणांचं काय झालं ते आपल्या माहीत आहे. मोठी मध्यम धरणं व्हावीत, अशा जागा तरी आता किती राहिल्या? जी हाती घेतलेली आहेत, ती पूर्णत्वास न्यायला व सर्वार्थानं पूर्ण करायला लागणारी संपत्ती, वेळ, कालबद्धता व मानसिकता शासनातल्या किती जणांजवळ आहे? जिथे नदी मोठी नाही, तिथे आपापल्या गावाच्या शिवारातलं वाहतं पाणी अडवून आठमाही शेतीला पाणी व बरंचसं पिण्याचं पाणी आपण उभं करू शकतो, हे आता वेगळं सांगण्याची गरज नाही. विशेषतः गेल्या २५-३० वर्षांमध्ये पाणलोट क्षेत्र विकासाचं, जलसंधारणाचं बऱ्यापैकी काम महाराष्ट्रात चाललेलं आहे. शासनाच्या योजना, सेवाभावी संस्था, नव्या उमेदीनं चुका दुरुस्त करून काही नवीन त्यात करताहेत. काही गावं पाणलोटाच्या उत्तम योजनांमुळे सशक्त झालेली आपण पाहतो आहोत. महाराष्ट्रात व देशात त्या त्या काळी दुष्काळात अशी जलसंधारणाची कामं उभी करून नवा आदर्श उभा केला, याचा पाचशे, तीनशे, शंभर वर्षांचा इतिहास आहे.

व्यक्तिगत पातळीवर फारच थोड्या संस्था, व्यक्ती आहेत, ज्यांनी अशी पाणलोटाची कामं पूर्णत्वास नेली, अर्थसत्ता उभी केली. अकरा वर्षांपूर्वी जळगावच्या जवळ पाच किलोमीटर अंतरावर अनेक वैराण ओसाड टेकड्यांपैकी एक पाचशे एकराची टेकडी टप्प्या-टप्प्याने विकत घेऊन पाणलोट व झाडांचं, फळझाडांचं काम तिथे सुरू केलं. माझं पळसखेड व भंवरलालभाऊ जैन यांचं वाकोद या खेड्यांमध्ये केवळ दोन किलोमीटरचं अंतर आहे. पंचवीस वर्षांपूर्वी शेती, विहिरी, पाणी यासाठी त्या खेड्यांमध्ये राहून प्रत्यक्ष काम केलं. अनेक फसलेले व विकसित केलेले प्रयोग आम्ही केले. शेतावरच्या प्रेमानं अनेक अडचणींना तोंड देत यशापेक्षाही अपयश जास्त पचवून शेती केली. विहिरी केल्या. नष्ट झाल्या. पिकं जळताना पाहिली. मनानं माणसं जळताना पाहली. त्या खेड्यांच्या, शेतीच्या, महाराष्ट्राच्या दुःखाचं

आपण देणं लागतो. स्वत:ला शेती उद्योगात नव्या प्रयोगांमध्ये गाडून घेऊन आज अथक परिश्रमानं व ध्येयवेड्या पद्धतीनं भंवरलालभाऊ जैन उभे आहेत. चांगली स्थिती झाली. पैसा हाती आला, तो टाकला. केवळ शेती उद्योगांमध्ये, इतर उद्योगात जास्त व चांगला भक्कम पैसा मिळाला असता हे ठाऊक असूनही शेतीवर आधारित पाईप, ठिबक पीक पद्धतीचे प्रयोग, टिश्यूकल्चर, कांदा, फळं यांची दहा वर्षे मोडून टाकणारी कारखानदारी, असे न परवडणारे उद्योग केले. खूप काळ व्यस्त गेला. दु:ख पदरी आलं... आज अथक परिश्रमाला फळ आलं. सावरता आलं; परंतु किती करायचं व किती थकायचं याला काही मर्यादा असतात.

हा वेडा माणूस सगळ्यांना गप्प बसवत, काही एक न ऐकून घेता शेतीच्या अपार प्रेमापोटी शेती प्रकल्पाची झिंग घेऊन आयुष्यभर जगला. सगळ्याच बाजूंनी शासन, लोकसहभाग, शेतकरी अशी साथ मिळायला पाहिजे होती, तशी मिळाली नाही. अत्यल्प मिळाली. शेती-माती, शेतकरी यांच्यावरच्या निस्सीम प्रेमानं हे करताना या बरड टेकाडावर आडवे उभे पंधरा-सोळा फुटांचे चर काढले. पाणी सरळ वाहणं बंद केलं. त्या त्या कापलेल्या टप्प्यांवर झाडं उभी केली. त्यामुळे पाणी अडवायला मदत झाली. पेरू, सीताफळ, सागवान, बांबू, कडुनिंब अशी झाडं सुरुवातीला घेऊन मोठ्या प्रमाणावर वनश्री वाढविली. भाऊंनी वेड लागल्यागत हळूहळू जमीन तयार करून, खड्डे खोदून, दगडं उपसून घाम गाळला. पक्का तांबडा-काळा पाषाण, कुठे मातीच नाही. उन्हातान्हात तिथेच दगडावर बसून तिथेच जेवणखाणं, थांबणं... मी कितीतरी काळ - दहा वर्षे त्यांच्यासोबत आहे. त्यांच्या शरीरात, मनात एवढी ऊर्जा कुठून येत असेल? 'रात्रं-दिन आम्हा' सारखं. आंबा, आवळा व अनेक फळझाडं - वनश्री एक लाखापेक्षा अधिक उभी केली. आता छान बहरलेली पाहून डोळे सुखावतात. ही फळझाडं, वनश्री पाणी अडवून-जिरवून आता सावली देतात. परिसरात सुंदर घनगर्द सुवासिक दरवळ असतो. यापेक्षा देशाची पर्यावरण म्हणून कोणती सेवा असावी? थांबणं भाऊंना माहीत नाही. आता सी.टी.टी.चं सर्वोत्तम शास्त्रशुद्ध काम, चर बांधून नियोजनबद्ध केलंय, तरीही पाणी वाहून जातं. ते जाऊ द्यायचं नाही, असं वेड डोक्यात असल्यानं गेली तीन वर्षे सात पाझर तलाव बांधण्यात घालविले. सुंदर पाणीसाठ्याचे लहान पाझर तलाव. दगडांचे, सिमेंटचे बांध, घळी, ओहोळ बंद केलेले. झाडं-फळझाडं, अनेक रंगाचे पक्षी, ससे, मोर, हरणं असं गणगोत आता आपलं झालं. एकत्र नांदणार. खाऊन-पिऊन खूपच सुखी असा हा पाचशे एकरांचा स्वर्ग. स्वर्गातला गोतावळा. शेकडो मजुरांच्या अन्नाचा घास निर्माण करणारा. त्या मजुरांना-माणसांना, जवळच्या खेड्यांना, रोजगारांनाही,

तिथल्या विहिरीला, शेतकऱ्यांना जीवनदान देणारा एक जिवलग गोतावळा. महाराष्ट्राच्या शेतीला परंपरा व नवं तंत्रज्ञान व जागतिकीकरण सोप्या यपद्धतीनं समजावून देऊन एक आदर्शवत् असा प्रकल्प-जैन हिल्स. एक हिरवं चैतन्य.

-o-o-

# २६. हा दीपोत्सव पाण्याचा, जागरणाचा

१२ व १३ ऑगस्ट २००२ ला पहिलं अखिल भारतीय जलसाहित्य संमेलन माझ्या अध्यक्षतेखाली नागपूरला संपन्न झालं. दुसरं जलसहित्य संमेलन २१ व २२ ऑगस्ट २००४ ला पुण्याला संपन्न झालं. या जलसाहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रसिद्ध साहित्यिक श्री. मधु मंगेश कर्णिक हे होते. अतिशय अभ्यासपूर्ण, उत्स्फूर्त भाषण श्री. मधु मंगेश कर्णिक यांनी केलं. महाराष्ट्राच्या पाणी प्रश्नासंबंधी ऊहापोह करतानाच त्यांच्या कोकणाच्या पाणी प्रश्नासंबंधी अधिक आग्रहानं त्यांनी मांडणी करणं अगदी उचित होतं. मराठी साहित्यातील अनेक लेखक, कवींचं पाण्याच्या प्रश्नाशी निगडित साहित्य त्यांनी उलगडून दाखविलं. कोणताही लेखक, कवी आधी माणूस आहे आणि त्या त्या प्रदेशातल्या तत्कालीन लोकजीवनाशी, शेती, पाणी व खेडी यांच्या सुख-दु:खाशी तो बांधील असतो. कुठेतरी तीव्रपणानं त्याचं प्रतिबिंब साहित्यातून आलेलं आहे. आजच्या तीव्र पाणीटंचाईच्या काळात तर त्या इतिहासाची, साहित्याची प्रकर्षानं आठवण येते.

अतोनात उद्‌ध्वस्त करणारे, जीवनाची होरपळ करून टाकणारे दुष्काळ आले. त्या त्या काळात तिथल्या राजांनी, जागरूक विचारशील माणसांनी, श्रीमंतांनी, स्त्री-पुरुषांनी सामोरे जाऊन सामान्य माणसांचे हात तिथल्या अभियंत्यांसारखेच, अनुभवांचे ज्ञान असलेल्या कारागिरांचे हात हातात घेऊन लहान लहान तलाव बांधले. वाहून जाणारं पाणी थांबविलं. पक्कं पिवळं गवत, पांढरी माती, लीद, चुना अशा मिश्रणांनी, मातीचा लगदा करून उतारावर बैलांच्या खुरांनी तुडवून बांध बांधले. लहान लहान पाझर तलावांचं जाळं गावाच्या शिवारात उभं केलं. शेतीला, विहिरीला पाणी वाढलं. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न हलका झाला. हजारो वर्षे-दोन अडीच हजार वर्षांच्या इतिहासात याचे संदर्भ व खुणा आहेत. आजही काही ठिकाणी एक हजार वर्षांपूर्वीचे तलाव तसेच; पण गाळाने भरलेले आहेत. तुटले नाहीत. हा तलाव पाण्याचा छानसा प्रेरणादायी इतिहास प्रत्यक्ष चित्र-रंग-रूप व इतिहासाच्या

आधारानं दिल्ली गांधी शांती प्रतिष्ठानचे श्री. अनुपम मिश्रा यांनी आज भी खरे हैं तालाब या पुस्तकातून मांडलेला आहे.

श्री. अनुपम मिश्रा नागपूरच्या जलसाहित्य संमेलनात येऊ शकले नाहीत. यावेळी पुण्याला संमेलनाचे उद्‌घाटक म्हणून ते आले होते. तलावांचे संदर्भ देऊन पाण्याच्या प्रश्नांसंबंधी सहजपणानं खूपच छान बोलून गेले. त्यांच्या पुस्तकाचा अनुवाद श्री. प्रदीप भणगे यांनी साकेत प्रकाशनसाठी केलेला आहे. अशी पन्नास-साठ पुस्तकं आहेत. त्यांची भाषांतरं मराठी, हिंदी, इंग्रजी आणि आणखी काही भाषांमध्ये व्हायलाच पाहिजेत. हा मुद्दा मी माझ्या भाषणातून खूपच आग्रहानं मांडला. त्याला तिथेच मोठा प्रतिसाद मिळाला. पाण्याच्या, दुष्काळाच्या प्रश्नासंबंधी इतकं पुढे जाणंसुद्धा पुष्कळ. ते संमेलनात दिसून आलं.

लोकांच्या मनात तलाव व पाणी यासंबंधी आपलेपणा पूर्वी होता. तलावांची निर्मितीच नव्हे, तर पावित्र्य, शुद्धता व नियमित देखभाल दुरुस्ती, उपलब्ध पाण्याचं न्याय्य वाटप, यासंबंधी जागरुकता व घालून दिलेले नियम पाळण्याची तयारी होती. १८ व १९व्या शतकात मात्र तलावांची खूपच उपेक्षा झाली, जलसाठे नष्ट झाले, याची लेखकाला लागलेली खंत या पुस्तकात आहे, ती आपल्याला अस्वस्थ करून टाकते. शेकडो, हजारो तलाव शून्यातून प्रकट झालेले नाहीत. बनवून घेणारा एक असेल, तर बनवणारे दहा होते आणि असे अनेक मिळून शेकडो हजारो तलाव होत असत. थोडेबहुत नवीन शिक्षण घेतलेल्या समाजाने या शेकडो हजारोंचे शून्यच बनविले, अशी लेखकाची तीव्र भावना आहे. जुने तलाव साफ केले तर नाहीच नाही आणि नवीन तर बनलेच नाहीत. गाळ हा तलावात नाही, तर नवीन समाजाच्या डोक्यात भरलेला आहे. त्याकाळी समाजाचे डोके साफ होते. पाण्याच्या प्रत्येक बाबतीत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी जीवनाची रीत शोधण्याचा प्रयत्न केला आणि मृगतृष्णेला खोटे ठरवीत ठिकठिकाणी पाण्याच्या वेगवेगळ्या व्यवस्था केल्या.

श्री. माधवराव चितळे यांनी 'सिंचन सहयोग'सारख्या व 'जलसाहित्य संमेलना'सारख्या अनेकविध व्यवस्था, पुरस्कार, चर्चा, परिसंवाद, पुस्तकं, वाद-संवाद उभे करून थेट पाण्याच्या प्रश्नाला जीवनाशी सामोरे जाण्यासाठी धडपड चालविलेली आहे. त्याला तोड नाही. त्यात ते संपूर्ण लीन होऊन गेलेले आहेत. अनेक सवंगडी संस्थांना घेऊन नागपूरला जलसंमेलनात चर्चा परिसंवादात छापील पत्रिकेत आपण असलो नसलो तरी श्री. राम शेवाळकर, श्री. सुरेश द्वादशीवार, श्री. भास्कर लक्ष्मण भोळे, सौ. भोळे श्री. द. भि. कुलकर्णी, श्री. अक्षयकुमार काळे, श्री. वसंत

वाहोकार, सौ. वाहोकार, प्रमुख संपादक, पत्रकार, लेखक, कवी असे शंभरापेक्षा अधिक होते. जलसाहित्य संमेलन आपलंच समजून आले. ती स्थिती पुण्यासारख्या शहरात नव्हती. साहित्यिक, नामवंत साहित्यिक आलेच नाहीत, या गोष्टीची रुखरुख माझ्या मनाला टोचणारी आहे. नवे लिहिणारा लेखक, कवी आले. त्यांच्या पुस्तकांचं, विशेषतः पाण्याच्या संदर्भातल्या पुस्तकांचं प्रकाशन झालं. ते चर्चेत सहभागी झाले. कविता, कथा सादर केल्या गेल्या. विशेष म्हणजे पुणे विद्यापीठाचे कुलगुरू श्री. निगवेकर, शास्त्रज्ञ श्री. वसंत गोवारीकर, श्री. मोहन धारिया, श्री. माधवराव चितळे, सौ. चितळे, श्री. बाविस्कर, श्रीमती अरुणा साबणे, सकाळचे श्री. अनंत दीक्षित, श्री. नरेंद्र चपळगावकर, बहिणाई प्रतिष्ठानचे वसंतराव पाटील, श्री. सुधीर भोंगळे व पाण्याच्या व साहित्य संमेलनाविषयी आस्था असलेले अनेक मान्यवर श्रेष्ठ असे शास्त्रज्ञ श्री. वडेलकर, श्री. रानडे, श्री. शिंपी व अनेक अभियंते, ज्येष्ठ पत्रकार समोर केवळ पत्रिकेवर आलेले होते.

-०-०-

# २७. एका बीजापोटी, तरु कोटी कोटी

जगातले अनेक देश कृषिशास्त्रात व प्रत्येक पिकाच्या, फळांच्या, वनस्पती व अन्नधान्याच्या बाबतीत इतके प्रगत झाले, एकरी उत्पादन व मालाचा दर्जा कमालीचा वाढविला व कृषि क्षेत्र खूपच देदीप्यमान व संपन्न केलं. सतत शेतीशास्त्रामधलं नवं नवं संशोधन, संपून गेलेल्या पीक पद्धतीला नवं संजीवन देणारे शोध, वर्षांनुवर्षे त्यात गाडून घेतलेले संशोधक आहेत. एक पक्का विषय, त्यातलं शेतीशास्त्र व संपूर्ण त्यात नवं नवं जगभर देण्याचा प्रयत्न. माणसं व संस्था पाहून शासनाचं त्यांच्यासाठी सढळ अग्रक्रमाचं धोरण पाहून आपण चकित होतो. त्यांची आपली स्पर्धा सोडा, चर्चाच संभवत नाही. शेती व्यवसायाला व देशाला आर्थिक संपन्नता देणारे शास्त्रज्ञ अहोरात्र त्याशिवाय दुसरं काहीही करीत नसतात. कृषि संशोधन शाळा व कृषि विद्यापीठ इत्यादी व्यवस्था व शासन यांची बांधीलकी थेट शतकऱ्यांशी पक्की बांधलेली आहे. उत्तम सीड, प्रचंड एकरी उत्पादनाचं सत्त्व असलेलं. पाणी, औषधी त्याचा वापर, याचा शास्त्रशुद्ध वापर काही प्रमाणात का होईना आपल्याकडे अधिकपणानं होणं जरुरी आहे.

आज जी गती त्यात आहे त्या मंदगतीनं व महागड्या पद्धतीनं होणं बरोबर नाही. बी.टी. कॉटन असो वा अन्य चांगली रोपं, कलमं. इतकी महाग फक्त श्रीमंतच घेणार. गरीब, साधारण शेतकऱ्यांचं काय? तो तिथेच असावा का? (बी. टी. कॉटन - १६००रु. बॅग म्हणजे एकराला दोन हजार रुपये. इथे कुठेतरी सरळ शासनानं अर्धी मदत कशी करता येईल ते बघितलं पाहिजे. नुसतं व्याज सोडलं, कर्ज फेडलं इत्यादी लोकानुनयापेक्षा याच मदतीचा हात वेगळ्या अर्थानं व्यावहारिक हवा. कमी व्याजाची तीन वर्षांत फेडीची पद्धत हवी. महत्त्वाचं म्हणजे पक्कं, उत्तम सीड कमी किंमतीत, विश्वासाचं हवं.) कृषि विद्यापीठ व शेती संशोधन संस्था, शासनाची योग्य ती आर्थिक मदत मिळत नाही व सतत माणसं हलविली जातात म्हणून, दृढ संशोधन वेळेत पक्कं होत नाही, असं सांगतात. ते खरंही आहे.

जातिवंत उत्तम फळझाडांची कलमं इतकी महाग की, ती फक्त श्रीमंत शेतकरीच घेऊ शकतात. तेही वेळेवर लवकर मिळणं कठीण. खासगीचे भाव अव्वाच्या सव्वा व शासनाच्या रोपवाटिका अपूर्ण व वेळेवर न देणाऱ्या. उत्तम न्यूसिलर मोसंबी हवी. विश्वासाची. दहा लाखांची मागणी. उपलब्ध केवळ तीन-चार लाख. पंचवीस रुपये कलम, पुन्हा पुन्हा डायबॅव्âनं मरणारी. असंच इतर फळांच्या कलमांचं. प्रचंड चांगलं फलोद्यान महाराष्ट्रात उभं राहतंय. या अशा अनेक अडचणी. अपूर्णता. महागडे पण. शेतकरी कसा उभा राहणार?

अजूनही केळीच्या इतकं चांगलं, निरोगी, पाहिजे तेवढं उत्पन्न देणारं पीक दुसरं नाही. फक्त पाणी पाहिजे; परंतु पाण्याइतकंच आता बेणं चांगलं पाहिजे, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे. जैविकशास्त्रानं, नव्या तंत्रज्ञानानं चांगला वाण निवडून त्याच्या तंतूद्वारे निर्माण केलेल्या 'टिश्यूकल्चर' केळीच्या रोपांची ग्रँड नाईनची मागणी आहे. नुसती मागणी नाही, सहा महिने आधी 'टिश्यूकल्चर' रोपवाटिकेमध्ये नोंदणी करून पैसे भरून शेतकरी शेतीची मशागत करताहेत. जूनपूर्वी सरी तयार ठेवून खतं टाकून फक्त पावसाची वाट पाहतात.

महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक या प्रदेशात आता टिश्यूकल्चरशिवाय गोष्ट नाही. केळीच्या पारंपरिक चांगल्या बेण्याचे वाण आहेत. उत्पन्न घेणारे शेतकरी आहेत. ते उत्पादन किमान दीड वर्षात एकदा होतं. ठिबक सिंचन शंभर टक्के असलेला जळगाव जिल्ह्याचा व बुरहानपूरचा बराच प्रदेश टिश्यूकल्चर केळीनं आता व्यापलेला आहे.

टिश्यूकल्चर केळीचा पहिला तांडा (कटाई विक्री) जूनऐवजी जानेवारीमध्ये म्हणजे अंदाजे चार महिने आधी येतो. लवकर पैसा मिळतो. ज्यावेळी केळीची विशेष मागणी आहे व खूप भाव आहे, त्या काळात माल असतो. बारा महिन्यात दुसरं रटून खोडवा झपाट्यानं त्याच ठिकाणी वाढतो, तो सहा महिन्यात विक्रीला येतो. दोन वर्षांत तीन बहार देणारी ही कृषी संशोधनातली टिश्यूकल्चर शास्त्रातली किमया भक्कम आर्थिक संपन्नता देणारी आहे. दोन-तीन महिने भाव घसरले, तरी सरासरी भाव व प्रचंड घडाचं वजन उत्पादन शेतकऱ्याला सावरून धरतं.

दोन वर्षांपूर्वी रावेर तालुक्यात 'निंबोल' या गावी केळीचं दिवसभराचं चर्चासत्र आम्ही, जैन उद्योग समूहानं घेतलं होतं. शंभर किलोमीटर प्रदेशात ठिबक सिंचन, प्रगत केळीचं तंत्रज्ञान, दोन वर्षांत तीन बहार व प्रसन्न शेतकरी पाहिले. निंबोल, तसेच यावर्षी वाघोद्याची बाग पाहिली. पस्तीस ते चाळीस किलोची रास.

अनेक बागांमध्ये. त्यांचं म्हणणं असं की, खूप खादाड अशा पिकाला आम्ही खूप काही देतो. तसं कमी पाणी देतो; परंतु सगळी ही एकरी उत्पादनाची क्रांती टिश्यूकल्चर बेण्यांची आहे. तीही चांगल्या टिश्यूकल्चरची. दहा रुपये रोप अधिक वाटत नाही; पण ते आणखी स्वस्त हवं, ते सामान्य शेतकऱ्यांसाठी व लाखोंनी निर्माण करावं. गोदरेज व काही उद्योगसमूह व गुजरात प्रदेशात टिश्यूकल्चर प्रत्येक संस्थेचं दहा-पंधरा लाख रोपांपेक्षा अधिक नाही. जैन उद्योग समूहाचं देखील साठ लाखांपेक्षा अधिक नाही. दोन कोटी रोपांनी काय होणार? गरज आहे ती किमान पाच कोटी टिश्यूकल्चरची. विश्वासाची व थोड्या कमी किमतीची.

-०-०-

# २८. या खानदेशाच्या मातीमधली सुवर्णकांचन लेणी

'सिंचनाची फड पद्धती' साक्रीला समक्ष बघावी व श्री. वसंतराव ठाकरेंच्या पुस्तकांचं स्वागत करावं, म्हणून मी कार्यक्रम ठरविला. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अंतर्गत गेल्या बारा वर्षांमध्ये दोन वेळा बोलता आलं. राज्यभरातल्या मराठीच्या प्राध्यापकांसमोर मराठी कवितेवर अडीच तास अधिक अडीच तास भाषण व दोन दिवस चर्चा. अतिशय छान चर्चा. त्यानंतर दोन वर्षांपूर्वी विद्यापीठानं सांगितल्यावरून शेतीची दोन व्याख्यानं. एकाच ठिकाणी. मी त्यासाठी साक्री गावाची निवड केली. दहा वर्षांपासून तरी मी ठरवतोय, साक्रीचं ऐतिहासिक जगविख्यात पाणी व्यवस्थापनाचं फड पद्धतीचं इंजिनिअरिंग एकदा समक्ष पाहून समजावून घेऊ.

मी साक्रीला जाणार त्याच्या अधल्या दिवशी धुळ्यात भरगच्च कार्यक्रम होते. तिथेच साक्रीचे बहुसंख्य शेतकरी, समाज कार्यकर्ते, राजकीय कार्यकर्ते, साहित्यिक भेटले व साक्रीला सकाळी सात ते दिवसभर शिगोशीग कार्यक्रम बांधले. खूपच प्रसन्न वाटलं. इथे फक्त शेती, पाणी एवढाच विषय पाहिजे, म्हणून मी आग्रह धरला. साहित्याचं सगळं धुळ्याला संपवलं. अपेक्षेपेक्षा तिप्पट लोक, विशेषत: शेतकरी, संबंध धुळे जिल्ह्यातून साक्रीला आलेले. पाण्याच्या प्रश्नासंबंधी, नवे पीक पाणी व शेतीच्या आर्थिक नियोजनांसंबंधी चर्चा करण्यासाठी शेतकरी आले. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या इतिहासातली ही अत्यंत महत्त्वाची थेट लोकजीवनाशी, त्यांच्या प्रश्नांशी हात घालणारी चर्चा व भाषणं.

मी मुद्दाम साक्री निवडलं. ते परकीय सत्तेमध्येसुद्धा देशाची व महाराष्ट्राची सिंचनाची जी प्राचीन पारंपरिक पद्धती होती, ती अतिशय आदर्श व आजही सर्वार्थानं अनुकरणीय अशी साक्री प्रदेशात पांझरा मोसम, हरणखारी, केळझर या नद्यांवरील फड पद्धत. अधिकाधिक सिंचन क्षेत्रावर न्याय्य पद्धतीनं पाण्याचं वाटप असणाऱ्या या पद्धतीनं आंतरराष्ट्रीय पातळीवर लक्ष वेधलं. आज पाण्याच्या प्रश्नांमध्ये व शेतीच्या

दुष्काळी विकलांग काळात भारतीय परंपरेमध्ये शेकडो-हजारो गावं आहेत. त्यांचे पारंपरिक पाणी, शेतीचे आदर्श दिशा देऊ शकतात.

भारत हा तलावांचा, बंधाऱ्यांचा व सिंचनाचा प्रगत देश म्हणून जगभर ख्याती होती. आज बराच खंड पडला ही गोष्ट वेगळी. या फड पद्धतीच्या बहुविध इतिहासाचा प्रत्यक्ष कागदपत्र, नकाशे व शासकीय संदर्भासह परिचय व्हावा म्हणून 'सिंचन सहयोगा'नं कृषिभूषण श्री. वसंतराव ठाकरे यांचं सिंचनाची फड पद्धती हे अतिशय महत्त्वाचं पुस्तक प्रकाशित केलेलं आहे. माझा त्यांचा पंचवीस वर्षांचा चांगला परिचय आहे. या पुस्तकानं मी त्यांच्या अधिक प्रेमात पडलो.

सुमारे एक हजार वर्षांपूर्वी खानदेशात यादवांची सत्ता अस्तित्वात आली. सेऊनचंद्र हा यादवांचा सुरुवातीचा राजा होता. यादव राजांनी बंधारा पद्धतीस, सिंचनास प्रोत्साहन दिले होते. इ.स. १३९६ ते १४०७ च्या दुर्गादेवीच्या दुष्काळाची प्रचंड झळ खानदेशाला बसली. त्यातून मार्ग काढण्यासाठी मलिक राजा फारुकीने शेती उत्पादन वाढविण्यावर व सिंचनावर जास्त भर दिला. कापूस व ज्वार या पिकांवर त्यानं भर दिला. ऐन-ए-अकबरीमध्ये लिहिलं गेलं आहे, की खानदेशचं प्रमुख पीक ज्वारी असून, काही ठिकाणी ज्वारी वर्षातून तीन वेळा घेतली जात असे. भात, ज्वारी, ऊस, कापूस ही पिकं पाटस्थळात घेतली जात होती. (अबू फजल १५९९ते १६००) त्यामुळे १६००मध्ये ही प्रगत सिंचनाची फड पद्धत होती.

खानदेशातील काही पाटस्थळं जशी मोगल काळातील असण्याची शक्यता आहे, तशी काही पाटस्थळं मराठा काळातील असण्याची शक्यता आहे. जुनी कागदपत्रं, गॅझेटियरचा आधारही आहे. दगडी बंधारा, फक्त बंधाराच नाही, तर त्यासोबत पाटचाऱ्या, भूमिगत बोगदे आणि नाले ओलांडण्यासाठी मोऱ्या, बंधाऱ्यांचा आकारही अर्धचंद्राकृती वैशिष्ट्यपूर्ण आहे. नदीच्या वळणावर, खडकाळ पायावर बांधलेला. बंधाऱ्याच्या दोन्ही बाजूस नदीच्या काठाने कालवे काढलेले. पुराचे पाणी बंधाऱ्याच्या आकारामुळे व्यवस्थित वळवून कालव्याद्वारे शेतीला पुरवणे शक्य व्हायचे. हीच 'फडपद्धत'. मुख्य कालवा, वितरिका आणि शेतचाऱ्या याला सारंगी म्हणत, अशी पाणी वहनाची रचना. काही बंधाऱ्यांच्या बाबतीत तर हे जाळं १०-१२ किलोमीटर इतकं पसरलेलं. प्रत्येक जाळ्याद्वारे प्रत्येक शेतकऱ्याला किती पाणी दिलं गेलं पाहिजे, याचा हिशेब होई. एका फडात एकच पीक घेण्याचा नियम आल्यामुळे सिंचन व्यवस्थापन सुलभ होत असे. आवर्तने पद्धतीने जमिनीचा कस टिकून राहायला मदत होत असे. कोण कधी किती पाणी घेणार हे 'फड कमिटी'

ठरवीत असे व त्याची शिस्त पाळली जात असे. पांझरा खोऱ्यातील कासारे बंधाऱ्यावरील तसेच मोसम खोऱ्यातील अंतापूर बंधाऱ्यावरील फडामध्ये शिस्त मोडणाऱ्यावर कारवाई केल्याचे उल्लेख आहेत.

या वळण बंधाऱ्याचे जनक कोण, याबद्दल कुठेही माहिती उपलब्ध नाही; परंतु बखरींमधील उल्लेखानुसार नदीकाठच्या गावांनी सामूहिक पद्धतीनं ही कामं केली असावीत. त्या काळाच्या सामुदायिक शेतीचे आदर्श कसे असावेत, असे मॉडेल म्हणून याची थोरवी सांगता येईल. १९८४ मध्ये अमेरिकेत 'फोर्डकॉलिन्स' येथे 'सिंचन व पाण्याचा निचरा' यासंबंधी जी १२ वी आंतरराष्ट्रीय परिषद झाली, त्यातही साक्री तालुक्यातील फड बागायतीबद्दल प्रबंध वाचला गेला होता. त्यानिमित्त जपानचा तज्ज्ञ 'इकोजी सिको' यास पाहणीसाठी इथे पाठविले होते.१९८७ ला येऊन पाहणी करून 'जगाने अनुकरण करावी, अशी योजना' म्हणून त्यानं प्रशंसोद्गार काढले. अशा कितीतरी इतिहासातल्या वास्तव गोष्टी. खानदेशच्या वैभवात अनेक क्षेत्रांत महत्त्वपूर्ण कार्य करून इतिहास घडविला. त्याचा सार्थ अभिमान ठायीठायीच्या इतिहासात वा गॅझेटियरमध्ये आहेच. आजच्या प्रश्नांसाठी, जगण्यासाठी दिशा देणारा नवं तंत्रज्ञान घेऊन अर्थसत्ता देणारा खानदेशच्या वैभवाचा तुरा म्हणून ही 'फडपद्धत' एक आहेच.

-o-o-

# २९. हातात गुंफिले हात नदीच्या काठी

जलसंधारणाचा अनेक पातळ्यांवर विचार करताना, त्यात लहान लहान योजनासुद्धा कधी खूपच उपयुक्त असं काही देऊन जातात. पाणलोट क्षेत्र विकास योजना राबविताना, त्यात प्रत्यक्ष त्या त्या ठिकाणी काम करताना, ती ठिकाणंच नव्या योजना सुचवितात. शेत तळे, लहान तलाव, लूस बोल्डरसारख्या केवळ टेकड्यांच्या उतारावरल्या घळ्यांमध्ये तिथलेच दगड आडवे उभे करून थोडंबहुत पाणी साठतं, त्याचा खर्च खूपच कमी आहे. भूमिगत बांध दगडांपेक्षा वाया गेलेला, विहिरीचा दगड व तिथलीच रेती वापरून नदीत भूमीअंतर्गत स्पीड ब्रेकर उभे केले. त्याचा तर खूप चांगला परिणाम विहिरीचं पाणी वाढायला दिसून आला. सिमेंट नाला बांध उंचीचे नंतर आले. ते थोडे खर्चिक असले, तरी ते अग्रक्रमानं प्रत्येक नदीनाल्यावर झालेच पाहिजेत.

मी जळगावहून एकदा जामनेरला जात असताना नेरीच्या पुढे दोन-तीन लहान लहान झरे, ओहळ, वाहतं पाणी थांबवून खंडित होते. थोडं पाणी कुठे कुठे साचलेलं होतं. त्यावर्षी पाण्याची खूपच टंचाई होती. गुरा-वासरांना प्यायला पाणी नाही. जानेवारी महिना असावा. ज्वारीचा कडबा पावसाळ्यात संपूर्ण काळा पडलेला होता. तसा वायाच गेलेला होता. गुरं, वासरं, म्हशी, बैल धावाधाव करून त्या झऱ्यातल्या लहान लहान पाणी डबक्यांकडे तहानेनं पळत होते, पाणी शोधत होते. मी गाडी थांबवून लहान पूलवजा फरशीवर झऱ्याच्या तिथे थांबलो. दोघा-चौघा शेतकऱ्यांना, गुरेवाल्यांना बोलावलं. ‘हे दोन-तीन कडब्याचे गूड या फरशीच्या तीन पाईपांमध्ये आडवे टाका व किनारीचा गाडी दोन गाडी गाळ टाकावा’ म्हणून विनंती केली. त्याची मजुरी मी देतो असं सांगितलं. दोनच दिवसांत फरशीचे खालचे पाईप असे बंद केले व साचलेल्या शेवाळी पाण्याचे लहान लहान साठे झऱ्यातली वाळू सरकवून लांबपर्यंत एक पारचारी तयार केली. दोन फूट, तीन फूट खोल, वाळूच्या अंतर्गत असलेलं पाणी हळूहळू प्रवाहित झालं. चांगलं प्रवाहित होऊ लागलं. फरशी पुलाजवळ तीन दिवसांत बराच मोठा पाणीसाठा झाला. आठवड्यात झऱ्याच्या

पात्रात मागे पंचवीस-तीस फूट पाणी साठलं आणि सगळेच ते बघायला आले. आनंदित झाले. महिनाभर हे पाणी उपयोगी पडलं. अगदी साधी गोष्ट. असे कितीतरी लहान नदीनाले. त्यांच्या रस्त्यावरल्या फरशी पुलाजवळ सिमेंटनं बांधकाम अर्धअधिक केलं तरी दोन महिने पाणीवाढ होऊ शकते. गुरांचं पाणी व विहिरीचं पाणी वाढतं. त्याचा खर्चही खूपच कमी. त्याच झऱ्याच्या फरशीवर सिमेंटनं पाईप दोन-तीन फूट उंचीपर्यंत बंद करायचं मी संबंधित अभियंत्यांना सांगितलं.

नाशिक, अमरावती, नागपूर, नांदेड, लातूर, औरंगाबाद अशा प्रत्येक महसूल विभागात जलसंधारणाच्या धडक बैठका श्री. नानासाहेब पाटील (त्यावेळचे जलसंधारण सेक्रेटरी) व मी घेत असे. त्यामुळे नेहमीच्या अडचणी व मर्यादा न सांगता अधिकारी काम करायला तयार व्हायचे. जिथे नवे-जुने रस्ते असतात त्या लहान, मध्यम पुलांजवळ अशी अडविण्याची योजना सहज करता येते. त्यात पुलाला कुठलाही धोका नाही, हे मी समक्ष पंधरा-वीस वर्षांत काम केलेल्या ठिकाणी पाहतो आहे. अगदी सहज, आहे त्या परिस्थितीप्रमाणे पावसाळ्यानंतर तीन महिने असं पाणी निर्माण होतं.

पुढे नवीन पूल रस्त्यावर करताना त्याला ब्रिज कम बंधारा अशी योजना मी शासनात आमदार असताना लावून धरली. नेहमीप्रमाणे त्याला अनेक अडचणी दाखवून अधिकारी, तंत्रज्ञ मंडळींनी विरोध दर्शविला. पळसखेडच्या पळसखेडे, लिहे सोयगाव नाल्याच्या रस्त्यावर मी केवळ अठ्याहत्तर हजार रुपये खर्चात ब्रिज क्रम बंधारा हाती घेतला. त्याला खूप अडथळे शासकीय पातळीवर व खुद्द अडाणी आमदारांकडूनही झाले. पूल पाच-सात वर्षांतच तुटून जाईल इत्यादी काही ते सांगत असत. त्यावेळचे मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक व श्री. ना. शरदराव पवार यांचा भक्कम आधार घेऊन मी हे काम साडेबारा लाख रुपयांत वर्षभरात पूर्ण केलं.

पावसाळा संपल्यावर पाणी येणाऱ्या बाजूनं लोखंडी फळ्या बसतील, असं लहान लहान बांधकाम आहे. तिथे फळ्या बसविल्यावर झऱ्याचं, नदीचं पाणी जवळपास एक किलोमीटर मागे सुंदर असं समुद्रासारखं उभं राहिलं. थेट मार्चपर्यंत. ब्रिज कम बंधारा रस्त्याच्या बांधकामाच्या मागे-पुढे पंचवीस-तीस विहिरी जिवंत झाल्या. बैलगाडी, एस.टी., गुरं-वासरं पुलावरून वर्षभर प्रवास करू लागले. पाणीसाठ्याच्या तीन महिन्यांच्या काळात पी.व्ही.सी. पाईप व इलेक्ट्रिक मोटारी आकडे टाकून योग्य त्या ठिकाणी अंधारात पैसे देऊन शेतकऱ्यांनी याच पाणीसाठ्यांवर दुबार रबी पिकं घेतली. आज पंधरा वर्षांत छान ब्रिज कम बंधारा

उभा आहे. आणखी पन्नास वर्षे त्याला कुठलाही धोका नाही. जिथे जसा नदीनाला, झरा असेल तिथे असं जाळं उभं केलं, तर रस्त्यावर होणाऱ्या पुलामुळे पाणी अडवून करोडो रुपयांचे काम सहज होऊ शकतं. मला तर परवा श्री. ना. मनोहर, भाऊ नाईक यांनीच हे कसं करता येत नाही, असं अधिकारी सांगतात, याचा पाढाच सांगितला, आत बोला? काय करणार?

-०-०-

# ३०. या तरुणाईचे हात हवे झाडांना

'जलसंधारण' व्हावं, पाणी निर्माण करावं, पिण्याचं पाणी व शेतीचं आठमाही पाणी असे दोनही प्रश्न एकमेकांमध्ये गुंतलेले आहेत. शासन त्याच्या योजनांमार्फत कार्यक्रम घेऊन मंदगतीनं काम करत आहे. त्यासोबतच कृषी व पाणी या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांना अधिक बळ देऊन कालबद्ध असं काही करावं, ते होत नाही. अशा संस्थांमधल्या काहींमध्ये दोष असतील. त्या काही काळ थांबवा; परंतु सर्रास अनेकांची अनुदानं व पैसा थांबवावा व दीर्घकालीन चौकशीसत्र सुरू ठेवावं हे 'जलसंधारणा'च्या दृष्टीनं उपयोगाचं बिलकुल नाही. केंद्राच्या व राज्याच्या अनुदानांच्या थांबण्यानं त्या त्या ठिकाणचं अर्धवट काम रेंगाळत राहातं, किमती, खर्च वाढतात. अनेक संस्था, सेवाभावी संस्था, कृषी जलसंधारण विभाग, लघुपाटबंधारे यातून जलसंधारणाचं काम युद्धपातळीवर व्हायला पाहिजे. त्यासाठी कायमस्वरूपी वेगळी तरतूद करायची नीती अवलंब करावी.

एका महत्त्वाच्या गोष्टीसंबंधी अधूनमधून लिहून येत असते. ते अधिक लिहून यावं व प्रत्यक्ष काम त्या पद्धतीनं व्हावं, ही इच्छा. उच्च माध्यमिक शाळा व महाविद्यालयं, विद्यापीठं यांच्या परिसरात अनेक ठिकाणी खूप जागा असते, मोकळी जागा असते. विद्यार्थ्यांना जे शिक्षण द्यायचं ते द्या. त्यासोबत परिसरातल्या जमिनीवर झाडं लावून श्रम करायला शिकवणं जरुरी आहे. शिक्षण महर्षी कर्मवीर भाऊराव पाटलांनी 'कमवा व शिका' असं घोषवाक्य संस्थेला दिलं. रयत शिक्षण संस्थेनं त्यावेळी व आजही या घोषवाक्याप्रमाणे पुष्कळ कामही केलं, करताहेत. ज्या विकलांग, आर्थिक परिस्थितीतून बहुसंख्य विद्यार्थी शिकायला येतात, त्यांना जवळपासच्या परिसरात मिळेल तिथे श्रम करण्याची सवय पाहिजे. श्रमाची किंमत व प्रतिष्ठा वाढवायला हवी. आपले घरचे किती श्रम व परिश्रम करून पोटासाठी, संसारासाठी व आपल्या शिक्षणासाठी करतात, हे लक्षात आलं पाहिजे.

प्रत्यक्ष सी.सी.टी. बांध, दगडांचे बांध, झाडांसाठी खड्डे व रोपं लावणं असं जुलै, ऑगस्ट व डिसेंबरमधल्या महाविद्यालय विद्यापीठातल्या राष्ट्रीय सेवा

योजनेतून परिसर व गावं विश्वासात घेऊन काम केलं, तर तिथली माणसं निश्चितच सहकार्याचा हात पुढे करतात. ‘राष्ट्रीय सेवा योजने’साठी थोडा पैसा महाविद्यालय, विद्यापीठांना मिळतो. त्याशिवाय वनखाते, कृषि खाते यांच्याशी जोडणी करून त्या त्या गावांच्या लहान लहान पाणलोट योजना आपण करू शकतो. तो गाव व परिसर दोन दिवस विद्यार्थ्यांना आनंदानं जेवण देणारच. देतात. तिथेच मग भाषणं, विचार, चर्चासत्र व गाणं-नृत्य इत्यादी करावं. छान सांस्कृतिक देवाण-घेवाण होते. चांगल्या आपुलकीची, नातेसंबंधाची जुळवणी होते. अनेक प्रश्न विद्यार्थी-विद्यार्थिनींना जवळून नव्यानं कळतात. पुस्तकातल्या शिक्षणासोबत असं तिथल्या जीवनाचं, जगण्याचं, प्रश्नांचं आकलन व जीवन शिक्षण आज जरुरी आहे. शेतीबाडी, रोजंदारी, दुबळेपण, स्त्रियांचे प्रश्न सगळं शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना माहीत पाहिजे. विद्यापीठीय शिक्षणासोबतच एका वेगळ्या विश्वातल्या आपल्याच लोकांचं आकलन नसेल, तर खऱ्या अर्थानं शिक्षणाची परिपूर्ती होऊच शकत नाही. खेडी, शेती, पाणी, पर्यावरण व लोकजीवन यातल्या यातनांचं व सुंदरतेचं दर्शन प्रत्यक्ष तिथे सहभाग देऊन करायला हवं. जमेल तेवढं.

महाराष्ट्रभर जर जुलै, ऑगस्टमध्ये दोन-तीन दिवस व डिसेंबरच्या काळात दोन-तीन दिवस राष्ट्रीय सेवा योजनेचं काम नीटपणानं तिथल्या लोकांना विश्वासात घेऊन शासकीय योजनांना सोबत घेऊन केलं, तर दरवर्षी दोनशे कोटी रुपयांचं जलसंधारणाचं व खेडी उभारणीचं मोठं सेवाभावी काम व नवनिर्माण होऊ शकतं. अतिशय आत्मीय पद्धतीनं व निर्धारानं हे करायची तयारी पाहिजे. ती कमी आहे. रयत शिक्षण संस्थेची अशी कामं मी पाहिली. मंचरसारख्या ठिकाणी पन्नास एकरांच्या डोंगर उतारावरची कामं पाहिली. संगमनेरची पाहिली. अनेक शिक्षण संस्थांच्या स्वत:च्या पाच-दहा एकरांच्या परिसरातली सुंदर झाडं, फळझाडं मी पाहिली. तिथल्याच विद्यार्थी-शिक्षकांनी ती उभी केली. आता त्यांनी परिसरात जायला पाहिजे व सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक उभारणीची सरमिसळ मोठ्या प्रमाणात करायला पाहिजे.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठामधल्या डोंगर टेकड्यांच्या चढ-उतारावर, खळग्यांमध्ये झाडं, कुरण विकास व लहान तलाव करून चांगली वनश्री व पाणी सौंदर्य दिसतं आहे. कुलगुरू श्री. एन.बी. ठाकरे, कुलगुरू श्री. एस.एम. पाटील व श्री. आर.एस. माळी या तीनही कुलगुरूंनी हे काम शिक्षणाइतकंच महत्त्वाचं मानून त्याची छान उभारणी केली. आणखी तिथे खूपच करता येईल. तेच काम महाविद्यालयांनी राष्ट्रीय योजनेत हाती घ्यावं. खूप लहान लहान गावातल्या शाळेत, महाविद्यालयात,

परिसरात प्रत्यक्ष तिथे जाऊन मी हे सुरू केलंय. त्याचं जाळं भक्कम व घनदाट व्हावं. त्यासाठी श्रमाला व घामाला विद्यार्थीदशेतच शिक्षणाची जोड मिळावी. झाडं, फळझाडं, संस्थेला, गावाला, खेड्याला, नदीनाल्याला हिरवं करून नवं पर्यावरण देतील. कोरड्या मनाला जगण्याला हिरवा आधार देतील.

-०-०-

# ३१. नवी लवलव कोंभांची, नवी पालवी झाडांना

१९९० साली श्री. शरद पवार मुख्यमंत्री असताना ‘शंभर टक्के सबसिडी-कोरडवाहू फलोद्यान योजना’ महाराष्ट्र शासनानं हाती घेतली. एका हेक्टरला साडेबारा हजार-पंधरा हजार तीन वर्षांत शासन चार हेक्टरपर्यंत देणार.

बावीस जूनला शासनात हा निर्णय झाला. मी त्यावेळी विधान परिषदेत आमदार होतो. मी खूप लक्ष त्यात घातलं व अधिकाधिक दोषमुक्त, शेतकरी अभिमुख अशी योजना मुख्यमंत्र्यांनी तयार केली. याच वर्षी काही कार्यक्रम घ्यावा, असंही ठरलं. तोपर्यंत बावीस जुलै उजाडला. जमेल तेवढा कार्यक्रम महाराष्ट्रभर घेतला. दुसऱ्या वर्षी प्रचंड प्रतिसाद.

रोपं कमी पडली. संत्रा, मोसंबी, आंबा, चिकू, बोर, चिंच, आवळा, पेरू, सीताफळ अशी जवळपास सगळी फळं त्यात घेतली. त्या त्या भौगोलिक प्रदेशात जी फळं करायची, त्यांची रोपं खूपच कमी पडली. मग कर्नाटक, आंध्र, गुजरातमधून वाहतूक खर्च करून रोपं आणली. ती खूपच महागात पडली. असं दोन-तीन वर्षं चाललं. ती महाग पडली यापेक्षाही दर्जेदार रोपं कमीच निघाली. काहींना पाच-सहा वर्षांतही फळं नव्हती.

ती काढून टाकावी लागली. अपरिमित नुकसान व मनस्ताप झाला. योजना आज चौदा वर्षे चाललेलीच आहे. फलोद्यानमध्ये महाराष्ट्र देशात पहिल्या-दुसऱ्या क्रमांकावर आहे. खूपच आर्थिक संपन्नता व मजूर रोजगारांची रोजंदारी, पैसा व्यवहार वाढला. फळझाडांमुळे मोठं पाणी अडवावं काम व पर्यावरण वाढ झाली. आपल्या जवळच्या शेतीपैकी किमान एकचतुर्थांश जमीन तरी फळबागांमध्ये यावी, तरच प्रपंच चालणार.

विदर्भात संत्रा रोगराई आटोक्यात येत नाही. बागा कमी झाल्या. चांगली संत्र्याची रोप नाहीत. नगर-पुणे, जालना, औरंगाबाद मोसंबीमध्ये येत आहे.

मोसंब्यांची, रोपांची चांगली केंद्रे वडिगोद्री, श्रीरामपरूची जवळपास नष्ट झाली.

खासगी मोसंबी मिळते; पण खात्रीची न्यूसीलर, सातगुडी नाही. बारामतीची शासकीय नर्सरी उत्तम मोसंबी रोपं देत आहे, ती किती पुरणार? त्यांचे शासकीय भाव सात-आठ रुपये, तर बऱ्या खासगी रोपवाटिकेत पंचवीस-तीस रुपये रोप. शेतकरी कसं घेणार? आंबा तीस रुपये, वीस रुपये सीताफळं. अडीच रुपये, पाच रुपये एवढा रोपाला फरक. पुन्हा खात्रीशीर रोप असेलच असं नाही.

किमान नर्सरी व वनखाते तसेच फलोद्यान नर्सरीसाठी शासनानं प्रमाणपत्र परवानगी दिली. त्याचा खूप गैरवापर करून शुद्ध रोपं दिली जात नाहीत. रोपं दीर्घकाळ न टिकता लवकर पाच-दहा वर्षांत बाग संपते. म्हणून त्याची तपासणी व चिकित्सा, किमतीचं नियंत्रण पाहिजे, ते नाही. शासनाचा चांगला व कडक तपासणीचा विभाग पक्का करावा.

लहान लहान रोपवाटिका चांगलं काम करतात. त्यांचा संसार उभा आहे. कलमं करून बांधून देण्यामुळे शेतकऱ्यांचे श्रम वाचतात, अशी रोपं आता राजरस्त्यावर सुरू झालेली आपण पाहतो. ‘शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी.’ बारमाही व खोटी रोपं बहुसंख्य १९९०-९४ च्या काळात आली, ती बाग नष्ट झाली.

बांबू, कडुनिंब, साग, निलगिरी, सुरू या झाडांची रोपं बांधाला, नदीनाल्याच्या किनारी प्रचंड लावली, जाळी म्हणून. त्यांचेही नवे वाण रोपवाटिकेत आलेत. चांगल्या रोपांची कितीही किंमत शेतकरी द्यायला तयार आहे. खात्रीशीर हवी. आयुष्यभरच्या संसाराचा हा खेळ आहे. चांगला व्हावा. पनवेलच्या स्वस्त, सुंदर शुद्ध रोपवाटिकांमधला.

श्री. प्रकाशभाई मोहाडीकर यांनी, पनवेलजवळ थोडं आतल्या बाजूला कुष्ठधाम आहे, तिथे पावसाळ्यातला एक दिवस ठरविला. त्या तिथल्या सेवाभावी कामाला भेट द्यावी, तिथल्या रुग्ण मंडळींशी छान गप्पा माराव्यात, गाणी गावी आणि त्यांना समजून घ्यावं म्हणून आम्ही तीनशेपेक्षा अधिक लोक, मित्रमंडळी मुंबईहून सकाळी सात वाजता निघून तिथं दहा वाजता पोहोचलो. सायंकाळी परत आलो. तिथे त्यांचं खूप आत्मीय, जिव्हाळ्यानं चालविलेलं काम, त्यांची सेवा पाहिली. रुग्णांच्या चेहऱ्यावरल्या स्मितरेषा व आनंद आम्हाला दिवसभर पुरून उरला. लहान टेकड्यांमधला झाडांचा, सेवाश्रमाचा तो परिसर स्वच्छ, निर्मळ, खूप बहरून गेलेला असा होता.

शंभर तरी साहित्यिक, कलावंत, समाजसेवेतली ज्येष्ठ मंडळी व कलासाहित्यातले रसिक लोक. फारच बहारदार मैफिल. सोबतीला स्व. रामकृष्णजी बजाज व त्यांचे मित्र होते. स्व. बाबूजी सुधीर फडके आणखी बरीच गाणी घेऊन आलेली गायकमंडळी, श्रीमती पद्मजा फेणाणी-जोगळेकर इत्यादी. खूपच नावं. बाबूजींचा कुष्ठरोगी मंडळी व पाहुणे, मित्र यांच्यासोबत गाण्याचा व मुलाखतीचा प्रसन्न कार्यक्रम. नंतर माझं कवितावाचन व मुलाखत. मध्ये श्री. प्रकाशभार्ंइंच्या तिथल्या काही कथा, कथाव्यथा. सोबतीला झिमझिम पाऊस, भरून आलेलं आभाळ व न संपणारा मित्र-मैत्रिणींचा धिंगाणा.

परिसरातल्या उंच निलगिरी, सागवान झाडांसोबतचं कडुनिंब व इतर औषधी वनस्पतीचं. कोणीतरी सांगत होतं, अगदी नवीन माहितीचं. त्यांच्यासोबत मी खूप फिरलो. औषधी वनस्पतीची झाडं, रोपं जवळपासच्या कुठल्या नर्सरीत होती. मला कुतूहल होतं. लक्षात आलं. आपण किती अडाणी, अनभिज्ञ आहोत.

किती किती वनस्पती औषधींनी भरलेलं जग, रोपं, उपाय इत्यादी ऐकलं. नंतर राहुरी कृषी विद्यापीठाच्या कौन्सिलवर होतो, तेव्हा विद्यापीठासमोर तीन त्या एकरांमध्ये त्या औषधी रोपवटिका व इतर आणून रस्त्याजवळ छान उभारल्या. आणखी खूप रोपं घेऊन कुठे कुठे पाठविली. आज पुन्हा रोपं, चांगली रोपं सापडत नाहीत. थेट आसामकडे वा अन्य ठिकाणी शोधा. एक दिवस मग मी त्या परिसरातल्या पंचवीस-तीस किलोमीटरच्या परिसरात घालविला.

आंबा, चिकू, नारळ मुख्यतः अशी अप्रतिम रोपं. दोन वर्षांची. मोठ्या पिशवीतली. मला तशी स्वस्त वाटणारी. काही मी घेतली. दोन गुंठे, चार गुंठे जमिनीवर साधं छत टाकून उभ्या असलेल्या रोपवाटिका. अगदी गरीब साधी माणसं. लहान कुटुंब. कितीतरी मेहनतीनं, विश्वासाची चांगली रोपं दरवर्षी विकतात. दोन-चार गुंठ्यांमध्ये खर्च जाता पंचवीस-पन्नास हजार रुपये मिळवतात.

काही फुलझाडांच्या रोपवाटिका तिकडे होत्या. गाड्या थांबत, रोपं घेऊन जात. महाराष्ट्रातल्या इतर भागांपेक्षा, कृषी विद्यापीठांपेक्षा निम्म्यानं स्वस्त, खात्रीशीर रोपं. त्यांच्याशी छान बोलता आलं. नवं पुष्कळ काही शिकता आलं. ती अडाणी माणसं.

-०-०-

# ३२. हे डोंगर होतिल नवी अजिंठा लेणी

'अजिंठा' लेणीचा परिसर घनदाट जंगल झाडीचा होता. परवापर्यंत अजिंठा डोंगर झाडांनी, पाऊसपाणी, झऱ्यांनी इतका व्यापलेला होता की, अडीच हजार वर्षांपूर्वी कोरलेली अजिंठा लेणी जवळपास दोन हजार वर्षे संपूर्ण झाकली गेली. पुन्हा अजिंठा लेणी पहिल्यांदा दिसली ती १८२४ च्या जवळपास. मग झाडांची तोडणी, तो परिसर मोकळा करणं असं प्रचंड काम. केवळ लेणी मोकळी करायला पंचवीस वर्षे लागली. इतकं घनदाट जंगल त्या ठिकाणी होतं. अजिंठा लेणीच्या चित्रांची प्रतिकृती करायला चित्रकार मेजर रॉबर्ट गिल याला त्या ठिकाणी, झाडीतून लेणी मोकळी झाल्यावर, १८४४ला पाठविण्यात आलं. थेट १९५५ला मी लहान असताना पाहिलं, तोपर्यंतही घनदाट जंगलझाडी तिथे होती.

आज बाहरे डोंगरावर व लाखच्या डोंगर परिसरात थोडी फार झाडी राहिलेली आहे. उदासवाणे काळे फत्तर व टेकाडं अंगावर येतात. दहा-पंधरा वर्षांत थोडीफार काळजी घेतली म्हणून. अजिंठा विकास कार्यक्रमामुळे आतल्या दुर्गम पाच-दहा किलोमीटरच्या परिसरात बऱ्यापैकी झाडी दिसते. वृक्षतोड कमी झालेली आहे. नवीन फार वनश्री लावली गेली असं नाही. निसर्गत: वाऱ्यामुळे, पशुपक्ष्यांमुळे नवी वनस्पती झाडं उभी राहिली. म्हणून तरी वाघूर नदीच्या वळणावळणाच्या थेट उंच उंच माथ्यावर आत छान वाटतं. 'अजिंठा विकास योजने'च्या अनेक चर्चा व उभारणीच्या काळात मी होतो. तीन कोटी झाडं डोंगराच्या अजिंठा परिसरात उभी करायची योजना, चर्चा होती. त्याचं कुठे काय झालं? का झालं नाही? पैसा होता तोही जपानचा. एकत्रित. मॉरिशसचं एकच मोठं जंगल मी पाहिलं, तशीच अमेरिकेतली काही घनदाट जंगलं पाहिली. तिथे हे कसं उभं राहू शकतं? संरक्षित राहतं? इजिप्तमध्ये नवं जंगल परिश्रमानं उभं करायला तिथलं शासन कोट्यवधी डॉलर्स खर्च करून त्याला अग्रक्रम त्याला देतं. भारतातून, महाराष्ट्रातून श्री. विनायकराव पाटील, श्री. अरुण निकमसारखी जंगल व वनश्रीमध्ये काम करणारी जाणती माणसं तिथे घेऊन जातात. इथे तर देवराष्ट्राचं, धो. म. मोहितेंनी राखलेलं, अभयारण्य असो, की

अजिंठा, कन्नड, बुलडाणा असं महात्मा गौतम बुद्ध, चक्रधर स्वामींच्या प्रत्यक्ष क्षेत्रातलं असो, यवतमाळ, पुसदचा परिसर असो, की सातपुड्याच्या तापी-नदीच्या सुंदर वाहत्या पाण्यालगतचा परिसर असो. आम्ही समूळ नष्ट करण्याचा विडाच उचललेला आहे. फारच थोडी चांगली माणसं, वनश्रीमधले फॉरेस्ट अधिकारी यासाठी चांगली धडपड करतात; परंतु बहुसंख्य वनाधिकारी पाच-दहा वर्षांत कोट्यधीश व्हायचं ठरवून कुऱ्हाडी घावांना मदत करतात, त्यांचं काय?

दोन-पाच वनाधिकाऱ्यांवर कारवाई झाली, धाडी टाकल्या हे आपण वाचतो, प्रत्यक्ष चोरीची लाकडं, सागवान, बांबू झाडं वाहून नेणारे पकडले जातात. केस चालते हे ठीक. त्यांचे मुख्य गब्बर चोरी पचवणारे शहाजोग संरक्षित राहतात, असं हे चक्र आहे. एक-दोन चांगले महसूल कमिशनर, कलेक्टर, वनाधिकारी येतात. मला घेऊन अजिंठा परिसरात झाडं लावतात, उत्सव करतात. हे चांगलंच. अगदी पायथ्याशी घाट चढताना पाच वर्षांपूर्वी शंभर एक झाडं आम्ही लावली. मी माझ्या शेतातून रात्री गच्चीवर बसून पाहतो. आठ-आठ दिवस उन्हाळ्यात अजिंठा डोंगरात आगी राहतात. झाडं, कुरणं, पशुपक्षी जळून भस्म होतात. हे नेहमीचंच चाललंय. सगळंच जंगल, डोंगर, नदीकाठ वनश्रीनं गच्च केले पाहिजेत. किमान सांभाळले पाहिजेत. नवी वनश्री उभारली पाहिजे. तरीपण 'अजिंठ्या'सारखे अनेक अर्थानं ज्याला जागतिक, ऐतिहासिक, सामाजिक, धार्मिक व औषधी वनस्पतींसाठी काही अनन्यसाधारण महत्त्व आहे, त्यासाठी अधिक मदत, सौंदर्य कल्पना व पर्यटन विकास याला धरून असायला हवी. राज्यकर्त्यांमध्ये त्यासाठीची दृष्टी नाही व आस्था तर बिलकुलच नाही. मी प्रत्यक्ष पाहतोय.

राज्याच्या व देशाच्या तिजोरीत यासाठी नेहमीच खडखडाट असतो, हे खरं असलं तरी जपाननं दिलेले पहिले दोनशे कोटी व यावर्षीपासूनच्या अजिंठा विकास योजनेसाठी दिलेले तीनशे चाळीस कोटी एवढ्या आलेल्या भरभक्कम रकमेतून यासाठी निश्चित पक्की अशी रक्कम खर्च करणं व ती तपासून पाहून भ्रष्टाचारविरहित ठेवणं शक्य आहे. तीनशेचाळीस कोटी घेऊन आलेल्या जपान सरकारच्या प्रतिनिधींसोबत त्या दिवशी अनेक अधिकाऱ्यांच्या ताफ्यांसोबत मुख्यमंत्र्यांनी सांगितल्यावरून मी होतो. मीही मांडणी केली; पण अन्य लोकांनी आणखी मला बळ का दिलं नाही? इतर गोष्टीही महत्त्वाच्या. रस्ते, गेस्टहाऊस डागडुजी, संरक्षण इत्यादी. पण हे त्यापेक्षा अधिक नको का? बुलढाणा परिसर व जाईचा देव चक्रधर परिसर, अजिंठा लेणी परिसर, वसई, वाडीचे लहान टुमदार किल्ले, घटोत्कच गुंफा, पलीकडचा पितळखोर लेणीचा परिसर, रुद्रेश्वर,

अमृतेश्वर अशा डोंगरांच्या आतल्या सात मंदिरांचे, नद्यांचे, ओहळांचे परिसर पर्यटन विकासामध्ये आहेत. तरीही काम झालेलं नाही. पैसा टाकलेला नाही. अजिंठा डोंगराचा हा असा किमान पन्नास-साठ किलोमीटरचा परिसर, सुंदर लेणी, लहान किल्ले, झोपडतांडे, आदिवासींची वस्ती व मंदिर देवदेवतांनी घंटानांद करणारा परिसर, जंगल खूप खूप समृद्ध व्हावा. लहान लहान पाणी योजना, पाझर तलाव व झाडी, औषधी वनस्पती पुन्हा उभारून हे खऱ्या अर्थाने पर्यटन केंद्र सबंध डोंगराचं करावं. मोठं. पर्यावरण व सोयगावसह खानदेशातील चाळीसगाव, पाचोरा, जामनेर हे तालुके, परिसर पुन्हा एकदा विहिरींनी, पाण्यानं जिवंत होईल. शेती व फळझाडांना मानवणारी इथली जमीन सोन्याची होऊन जाईल. काहीच अशक्य नाही.

-o-o-

# ३३. प्रार्थना, दयाघना

तरीही, हे आमच्या सार्वभौम आभाळा
तूच या सगळ्यांचा खराखुरा वाली
भविष्याचं सुख-दु:ख सगळं तुझ्याच हवाली
सार्वभौम शक्तिमान तूच आहेस संजीवक सर्वांचा
तुझ्याशिवाय निरर्थ सगळा दुनियेचा व्यवहार

दूरवर भरभक्कम कोसळत राहा
कोसळत राहा नांगरल्या रानात
दूरदूरच्या प्रदेशात...
नाहीतर काहीच उरणार नाही या संबंध देशात

तुझं अस्तित्व नसल्यावर बाप्पा -
माणसं विकल्या जातील बेहिसाब
त्यांची हाडंकाडं, मोडलेले संसार तू उभे कर नव्यानं
अवकाळी पाऊसभार कोसळू दे अंगावर
नदीनाल्यावर, पुन्हा एकदा या जायकवाडीवर -
अप्परवर्धा, उजनीसकट लहान लहान पाणलोटांवर
अथांग पाणी पाहू दे डोळे भरून
सगळे हरून गेले आहेत -
या वर्षा पाठोपाठच्या संहारक दुष्काळात
योजनांशिवायच्या राजकीय तळागाळात

हे दयाघन आभाळा,
तू का रागावलास बाबा इथलांवर?
एकविसाव्या शतकाच्या सुंदर स्वप्नांचं होईल ते होवो...
त्यांना कोण सांगणार ? कसं सांगणार ?
ते कोणाचं ऐकणार ?

रया निघून गेलेल्या शेतीचा नापीकपणा
अंगावर येईल जेव्हा भयाणभूत अंगांनी,
शंभर कोटींच्या वखवखल्या पोटांनी,
तेव्हा जागे होतील राज्यकर्ते खडबडून मोठ्यांदा -
भयभीत भेदरल्या भुताडासारखे
दगड धोंडे लोखंड भूखंड खाऊन
जगत नसतात देशातली सामान्य माणसं
हे त्यांना पुन्हा पुन्हा सांगता येत नाही
फार उंचावर इथला आवाजही पोहोचत नाही
शब्द विरून जातात वाऱ्यावर

सावलीपुरतंच आकाश पाहणारे हे आपलेच लोक
आणखीनच विद्रुप करतील इथल्या मातीच्या माणसांना
इथल्या खेड्या-पाड्यांना
हे दयाघना आभाळा,
तुझा काळा निळा शिरताज एकदा डोक्यावर घे
झाडून टाक मनातलं सगळं एकदा, खळखळून मोठ्यांदा
क्षमा कर मनापासून या देशातल्या दुबळ्यांना
भरभरून पावसातून उभा राहू दे हा देश...
ही माणसं, चिडीपाखरं -
घरट्यातून त्यांच्या जगू दे सुखानं. थोड्या समाधानानं...
अंधारातून प्रकाशाकडे जाण्याचा
तुझ्या चिरंतन आशीर्वाद हे... हे दयाघन आभाळा...

घुंगरांच्या तालावर पेरणी होईल शिवारभर...
हारी हारीवर दीप उजळतील, शेतीच्या बांधाबांधावर.
घरांचे उंबरठे हिरव्या चुड्यांनी अंगण सारवतील...
रांगोळी काढतील.
ढेकळांच्या गर्तेतून मातीचा सुगंध ओसंडून उन्मळेल...
पिंपळ पानावर
नदी नाल्यावर
पक्षी येतील समुद्र सोडून...
गातील गाणं राष्ट्रगीताइतकं सुंदर... शुभंकर...

तुझं एकट्याचं येणंही आम्हाला पुष्कळ
बाकीचं काहीच मागणी नाही मग कुणाजवळ...
तू ये...
पुन्हा एकदा पहिल्यासारखंच जरा मनावर घे
काळ्या निळ्या ढगांच्या गिर्रेबाज अवकाशात, चौखूर उधळून
लयबद्ध गाण्याची छान लकेर ऐकू दे
बैलांच्या शिंगावर मातीची शानदार कमान उधळू दे
पुन्हा एकदा लदबदल्या पिकांचे संसार आमच्या शेतांवर पाहू दे

होऊ दे सगळं आबादि आबाद...
शेतीवर सगळेच आम्ही... कष्ट करू बेहद्द... सगळ्यांसाठी
फक्त तुझे भरभक्कम आशीर्वाद दे

हे राजा,
या दुनियेच्या, सार्वभौम बळिवंत राजा
तुझ्या बरसाती युगाचा आता आरंभ होऊ दे
म्हातारीचे डोळे लखलख होतील पुन्हा तुळशी वृंदावनाजवळ
ती गोष्ट सांगेल, पुन्हा नव्यानं, बायाबापड्यांना, चिल्यापिल्यांना
सूर्यनारायणाला आरती करून भल्या पहाटे बायका कुंकू लावतील भाळावर
घरभर भरलेलं घरपण दिसेल, पुन्हा एकदा खेड्यांवर
आपापल्या खेड्यांवर माणसं येतील कंटाळून शहरातून
पुन्हा एकदा मातीतून मृद्गंध दरवळेल
आंब्याच्या झाडावर, झुंझरक्या पहाटे कोयल गाणं गात आहे.
रोहिणीच्या सावलीत मृगाचं नक्षत्र, संथ हलक्यानं पुढे सरकत आहे
वारुळं बांधून झाली भक्कम, मुंग्यांनी घरं केली बांधावर
तुझ्या स्वागताला उत्सुक सर्वदूर... वाटा वाटांवर...

तुला सामोरा येताना, तुला प्राणातून गातांना
कोट्यवधी प्राणांच्या प्रार्थना दयाघना...
भरभक्कम ये... घनगर्द ये...
चांगल्या युगाचा आरंभ घेऊन
या दुबळ्या माणसांना
माणूस म्हणून उभं राहायला तुझा आशीर्वाद दे...

हे दयाघन आभाळा... तू भरभरून ये.

-०-०-